साप्ताहिक

# माणूस

२८ जुलै ८४/दोन रुपये

## ऑलिंपिक ८४ उत्साह नेहमीचाच!

## भारताची भिस्त कोणावर?







साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : नववा

२८ जुलै १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेघा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार

पुणे वार्ता

## 'कॅपिटेशन फी' विरुद्ध

# बेमुदत संप ! बेमुदत भाषणे !

१९ जुलैला संध्याकाळी टिळक स्मारक मंदिरात परिसंवाद होता मी माझ्या एका मित्राला सभेला माझ्याबरोबर चल म्हणून सांगितले. त्याने विचारले, 'कोण कोण वक्ते आहेत ?' मी सांगितले. 'ग. बा. बेहरे, विद्या बाळ, सत्यरंजन साठे, नानासाहेब गोरे इ.' मग तो म्हणाला, 'अरे, मग सभेला कशाला जायला पाहिजे ? मी इथंच सांगतो कोण काय बोलेल ते !' आणि खरोखरच त्याच्या तोंडून एकेक वक्ता बोलू लागला.

ग. बा. बेहरे : सगळे राजकारणी महामूर्ख आहेत, भ्रष्टाचाराचं भिनलेलं बीज समूळ नष्ट व्हायला पाहिजे.

विद्या बाळ : कोणीही हुंडा घेणं हे लांछनास्पद आहे. पुरुषप्रधान समाजरचनाच बदलायला हवी.

सत्यरंजन साठे : भारताच्या राज्यघटनेने स्वीकारलेली मूल्यं पायदळी तुडविली जात आहेत.

नानासाहेब गोरे : समाजात ज्यांना आर्थिक-शैक्षणिक पार्श्वभूमी नाही, पिढयान पिढया अंधारात ठेवले गेले त्याचा विचार हवा.

मी त्या मित्राला म्हणालो, 'अरे, तुला सभेचा विषय कुठे माहीत आहे ? हा विषय पूर्णपणे वेगळा आहे. निवासी डॉक्टरांनी बेमुदत संप केलेला असून, तीन नवी वैद्यकीय महाविद्यालयं सुरू करण्याच्या शासनाच्या निर्णयाला त्यांचा विरोध आहे. कॅपिटेशन फी घेऊन या महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे म्हणून 'महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंटस डॉक्टर्स'ने (मार्ड) त्याच्या निषेधासाठी ही सभा आयोजली आहे.' तरी तो गंभीरपणे म्हणाला, 'हे सगळे वक्ते मी म्हणतो तसं बोलतील की नाही ते पहा.'

हे सगळं आमचं संभाषण डोक्यात ठेवून जेव्हा मी 'मार्ड'च्या सभेला गेलो तेव्हा मित्राचं भाकीत सुरुवातीपासूनच खरं ठरू लागलं. त्यातच बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी सभेला उपस्थित होते. त्याचे 'स्नेहसमेलन' वगैरे असावं असं वाटत होतं आणि त्यांचा एकदर दबदबा पाहून प्रत्येक वक्त्याने 'मार्ड'ला पूर्ण पाठिंबा देऊनच आपल्या भाषणाला सुरुवात केली आणि प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात मार्डचे कौतुक करत, मधेच उपदेशाचे डोस पाजत आपलं व्याख्यान पूर्ण केलं.

'मार्ड'च्या वतीने कोणती भूमिका मांडली जातेय याची मला उत्सुकता होती. काहीशा रागवल्याच्या आवेशात सदानंद बोरसे यांनी ही भूमिका मांडली. संपाबद्दल बोलताना ते म्हणाले की, 'आमचा अशा आंदोलनाचा निर्णय काही एकदम खासगी मेडिकल कॉलेजेस् काढण्याच्या निर्णयासारखा घेतलेला नाही. यापूर्वी २२ जूनला आम्ही लाक्षणिक संप केला आणि आता पूर्वसूचना देऊन बेमुदत संप करीत आहोत. आंदोलनाचे समर्थन करताना त्यांनी मांडलेले मुद्दे असे–

१) यापूर्वी जास्त डॉक्टरांची आवश्यकता आहे अशी कोणी मागणी केली तर मेडिकल कौन्सिल, केंद्रसरकार यांच्या मान्यतेचे कारण दाखवून नकार दिला जात असे. आज मात्र अचानक डॉक्टरांची गरज शासनाला कशी काय भासू लागली ?

२) केवळ डॉक्टरची शारीरिक उपस्थिती असली म्हणजे खेडयातला पेशंट बरा होणार नाही. हॉस्पिटल्स आणि इतर सोयी-सुविधा आधी निर्माण करायला हव्यात.

३) आम्ही शहरी-ग्रामीण असा भेद मुळीच करीत नाही. शासनानेच हा वाद उकरून काढण्याचा प्रयत्न चालवला आहे.

४) बी. जे. च्या सर्व विद्यार्थ्यांची आर्थिक माहिती आम्ही काढली. एकाचेही उत्पन्न (वार्षिक) २० ते २५ हजारावर नाही. कोणीही पैशाच्या जोरावर प्रवेश घेतलेला नाही.

५) याउलट नवीन विना-अनुदान तत्त्वावर सुरू होणारी महाविद्यालये कॅपिटेशन फीची थैली पाहूनच प्रवेश देणार. शिवाय शिक्षणाचा दर्जा कमी होणार ते वेगळेच.

'मार्ड'च्या प्रवक्त्यानंतर निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंतानी आपली हजेरी लावली. ग. वा. बेहरे यानी पालकाच्या प्रवृत्तीवर झोड उठविली ते म्हणाले, 'मॉटेसरीपासून घेतली जात असलेली कॅपिटेशन फी आणि डॉक्टरी हा पालकाना वाटत असलेला किफायतशीर धंदा; ह्या प्रवृत्ती निषेधार्ह आहेत. आपले शासन समतेच मूल्य मानते, त्यामुळे कर्नाटकात अशी महाविद्यालये सुरू झाली असताना आपणच मागे का? हा शासनाचा विचार असावा. बेहेरेंचा हा उपरोधिक सूर बऱ्याच टाळ्या मिळवून गेला आणि अशा प्रकारे सभेचा 'टेम्पो' चढल्यानतर सगळ्या वक्त्यानी सणसणीत भाषणे ठोकण्याची संधी साधली.

विद्याबाळ यानी दलितांच्या राखीव जागा आणि या राखीव जागांची गल्लत करू नका अशी सूचना केली. त्यानी प्रश्न उपस्थित केला की, 'डॉक्टरांची विश्वासाहर्ता आज किती आहे? लोकाना जागविणारे डॉक्टर तयार होतायत की नागविणारे? ह्याचाही विचार झाला पाहिजे' आणि बरंच इतर काही त्या बोलल्या.

अनिल अवचटांनी बेहरे यांच्याप्रमाणेच पालकांवर हल्ला चढविला. ते म्हणाले, 'डॉक्टर तयार करणे ही काय कारखान्यात साखर तयार करण्यासारखी गोष्ट आहे? पण अनेक पालक 'डॉक्टरकी' मुलावर लादत असतात.' आजच्या शिक्षणपद्धतीत बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन करून 'लोकसख्या वाढणार, त्यामुळे सीट्सही वाढवाव्या लागतील.' हा मतभेदाचा मुद्दा माडून, त्यानी आपले 'समतोल' भाषण पूर्ण केले.

सत्यरंजन साठे यांनी सागितले की, 'शासनाचे हे विधेयक विषमतेवर आधारलेले आहे. श्रीमंत व गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे दोन पर्याय आता उपलब्ध झाले आहेत. एक बी. जे. मध्ये प्रवेश घेणे किंवा या नवीन महाविद्यालयात; परंतु गरीब व हुशार विद्यार्थ्यांना मात्र एकच पर्याय आहे. म्हणूनच या नवीन उपक्रमाला तीव्र विरोध केला पाहिजे'

नानासाहेब गोरे अध्यक्षस्थानी होते. गुणवत्तेचा निकष लावताना आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमि लक्षात घेतली पाहिजे, यावर त्यांनी आपल्या भाषणात भर दिला.

या सगळ्या विचारमथनातून दोनच मुद्दे प्रकर्षाने जाणवले. एक कॅपिटेशन फीचा भ्रष्टाचार आणि दुसरे म्हणजे शिक्षणाचा दर्जा. आता पैसे घेऊन प्रवेश देणारे विधेयक भ्रष्टाचाराला वाव देणारे आहे यात शंकाच नाही; पण शिक्षणाच्या दर्जाचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा एवढाच विचार करून चालत नाही. शिक्षणावर आजची परीक्षापद्धती, शासनाचे एकंदर धोरण आणि समाजव्यवस्था ह्या सगळ्याचाच परिणाम होत असतो. कर्नाटकात पैसे भरून प्रवेश घेतलेले विद्यार्थी दुसऱ्या वर्षाला बी. जे. मेडिकलमध्ये प्रवेश घेतात तेव्हाही शिक्षणाचा दर्जा घसरतो. सेमिस्टर पद्धतीची अत्यंत चुकीची अमलबजावणी गेली अनेक वर्षं पुणे विद्यापीठाने चालविली आहे. त्यामुळेही शिक्षणाचा दर्जा घसरतो. लढा या व्यापक प्रश्नावर उभा करावा लागेल. अभाविपच्या अनिरुद्ध देशपाडचानी आपल्या भाषणात हेच आवाहन केले.

दुसऱ्या बाजूला राजकारण्याची कातडी निगरगट्ट आहे हेही खरे आहे. ते म्हणे आपल्या निर्णयावर '*Firm*' आहेत! का असणार नाहीत? हा थोडाच निवडणुकीवर परिणाम करणारा 'इश्यू' आहे किंवा जातीय दंगल आहे, की शासनाचे डोळे लगेच उघडावेत? खरे म्हणजे या आदोलनाच्या निमित्ताने शैक्षणिक धोरणासंबंधी पुनर्विचार व्हायला हवा; पण दादाना वेळ कुठे आहे? बंडोबाना थंड करण्याच्या उद्योगात त्यांची सर्व शक्ती खर्च होते आहे त्याला ते तरी काय करणार?

या कार्यक्रमात दिसून आला तो विद्यार्थ्यांचा प्रचड उत्साह. एखाद्या प्रश्नावर लढा देण्यासाठी विद्यार्थीवर्ग पुढं येणं ही चांगली बाब म्हणावी लागेल. हशा आणि टाळ्यांचा भरघोस प्रतिसाद देणाऱ्या, आक्रमक भाषण करणाऱ्या आणि पथनाट्यातून आपल्या प्रश्नाना वाचा फोडणाऱ्या विद्यार्थ्यांचाच हा कार्यक्रम होता आपल्या समाजातील किमान शैक्षणिक क्षेत्रातील कोणत्याही अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी हा त्यांचा उत्साह असाच कायम राहील अशी आशा करू या!

—निरंजन

# मुंबापुरी...

## □ शो मस्ट गो ऑन

भोसले, आदिक आणि शहेनशाह अतुले यांनी एव्हाना आपापले शूर मर्दाना मुखवटे अन बंडाचे क्रांतिकारी झेंडे खुटीला टागून ठेवले असतील. रिंगमास्टर व्ही. पी. सिंग यांनी असंतुष्टांच्या शोभिवत डरकाळ्या थंड केल्या आहेत. दादा आणि असतुष्टाच्यात सध्या दिलजमाई चालू आहे.

ही उधार-उसनवारची दिलजमाई किती काळ तग धरणार असा विखारी सवाल परवाच्या पत्रकारपरिषदेत एकाने व्ही. पी. सिंगना टाकला.

ते म्हणाले की, ही सोयरीक टेंपरवारी नसून परमनेट आहे. आता आली का पचाईत! दादाबरोबर जमवून घ्यायचं ठीक आहे हो; पण अजिबात कुठेच कोल्हेकुई करायची नाही अन मुकाट बसून राहायचं म्हणजे जरा जादाच झालं. हे असं मुखवटे काढून जगण आमच्या भोसले-आदिक-प्रभृतीता कस बरं जमेल?

महाराष्ट्र काँग्रेस (आय) पक्षातला असंतोष, बडाळ्या वगैरे आता तमाम पब्लिकला एक प्रचड अफलातून विनोद वाटतो. तसंच, व्ही. पी. सिंग याचा भोगळ आशावादही फुसका बारच ठरणारसं दिस्तंय.

आता दोनेक आठवडे लोटू देत. म्हणजे बघा पुन्हा कागदी वाघ कसे झुजायला लागतील. पुन्हा पुचाट डरकाळ्या फोडल्या जातील.

निमित्त काय तर म्हणे दादानी आमच्या माणसाना डावललं. मग अंतुले आपल्या मरीनड्राइव्हच्या घरी एक आलिशान प्रेसकॉन्फरन्स बोलावून पहिला भोंगा वाजवतील.

मागोमाग मम म्हणायला बाबासाहेब, आदिक, धोटे आहेतच. जमल्यास अंतुले दिल्लीला जाऊन येतील. भोसले इथच हात मारत बसतील. आदिक तर काय हल्ली प्लेनमध्ये बसतच नाहीत विमानात त्यांना भलभलते भास होतात म्हणे!

या सगळ्यावर कळस म्हणून वसंतदादा

संतापून मनातला किटाळ (पुन्हा वाचा, कि-टा-ळ !) धुऊन काढतील. लुटुपुटूच्या लढायाना ऊत येतो तो असा !

हायकमांड सध्या तरी दादाना डच्चू देण्यास तयार नाहीये. दादानी दिल्ली-वाल्यांना व्यवस्थित खिंडीत धरलंय. म्हणत असाल तर जातो, घ्या हा निघालोच, असा मानभावी पवित्रा घेऊन दादा मांड ठोकून आहेत.

दादांचं फार काळ मुख्यमंत्रीपदी राहणं पक्षाला श्रेयस्कर नाही दादांमुळे मराठा लॉबी फॉर्मात येईल हे कितीही खरं मानलं तरी दादाना काढून नवा माणूस आणणार कोण ? बरं, नवा माणूस आणला तरी पक्षातला कोणता ना कोणता तरी गट सदासर्वदा असंतुष्टच राहणार. तेव्हा, आहे त्यात आनंद मानावा असा सूक्ष्म, तरल, पारदर्शी अन तत्त्वज्ञानी दृष्टिकोन ठेवून पक्षश्रेष्ठीना दादांना कायम ठेवणे क्रमप्राप्त आहे—म्हणजे भोसले, अंतुले अन आदिक खुंटीवरचे मर्दाना मुखवटे पुन्हा चढवणार ! खरंच आहे, द शो मस्ट गो ऑन !

## ☐ रिबेरो–पाटील

पोलिस कमिशनर रिबेरो याची बदली होणार हे ऐकल्याने मुंबापुरीतील सर्व सज्जनाचे धाबे दणाणले होते. रिबेरो यांची हवाई अपहरण विरोधी दलाचे प्रमुख म्हणून नेमणूक होणार होती ; परंतु वसंतदादा सेठीकडे ही बदली रद्द व्हावी म्हणून हट्ट धरून बसले. बालहट्ट आणि दादाहट्ट याला नकार देणे कठीण आहे हे इंदिरा गांधीनाही ठाऊक आहे. यामुळे सेठीनी ही बदली रद्द केली आहे.

मुंबापुरीत रिबेरोवर ज्यांनी जिवापाड प्रेम केले त्यामध्ये भाऊराव पाटील नावाचे एक सत्शील गृहस्थ अग्रणी आहेत ! भाऊराव कॉंग्रेस आयचे आमदार असून ए. आर अंतुले याचे खंदे पाठिराखे आहेत ! मग ते सत्शील कसे असा तुम्हाला प्रश्न पडला असेल; परतु ह्या ठिकाणी हे ठासून सांगितले पाहिजे की, महाराष्ट्राचे थोर नेते बाबासाहेब भोसले, रामराम आदिक आणि मुंबापुरीतील तळागाळाचा माणूस ह्या तिघानीही कॉंग्रेस आय आणि अंतुले ह्याच्यावर निष्ठा व्यक्त केलेली आहे. (असे आम्हाला बी. आर. सी. सी. आयच्या ऑफिसमधून सांगण्यात आलेले आहे.)

तर अशा ह्या सज्जन आमदाराने रिबेरोना दिल्लीतील हे वरचे पद मिळवून देण्याची खटपट केली; परतु मुंबापुरीतील दुष्ट नागरिकानी त्याचा बेत हाणून पाडला. हल्ली मंत्रालयातही दादा करे सो कायदा असा प्रकार असल्याने भाऊराव पाटलाचे काही चालू शकले नाही.

एकोणिसशे ब्याऐंशीच्या ऑगस्टमध्ये झालेली पोलिसांची दंगल, गेल्या महिन्यात झालेली जातीय दंगल आणि हाजी मस्तान; करीमलाला ह्यांना झालेली अटक ह्या सर्व काळात रिबेरोनी ज्या तडफेने काम केले त्यामुळे जनमानसातील त्याची प्रतिमा फार उंचावली.

एकोणीसशे चौऱ्याहत्तरला तुरुंगातून सुटका झाल्यानतर हाजी मस्तान सत्कार्यात इतके आकंठ बुडालेले होते की, मुंबापुरीतील सर्व मासिकानी त्याची शेंदूर लावून पूजा करायचे बाकी ठेवले होते; परंतु त्याच्या महंमदअलीरोडवरील कार्यालयातच बॉंब सापडल्याने दंगलीच्या काळातील त्याच्या सत्कार्याचा स्फोट झाला ! आता आद्यगुरु सुकूर नारायण बाखियाप्रमाणे डॉक्टरचे सर्टिफिकेट घेऊन ते सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये केव्हा दाखल होतात याची आम्ही वाट पहात आहोत !

## ☐ सांस्कृतिक मुंबै

पावसाळ्यात मुंबईवाले सहसा बाहेर पडत नाहीत. अर्धा वेळ हपिसात अन अर्धा वेळ गाड्याच्या खोळंब्यामुळे फलाटावर पत्ते पिसत. घरच्या वाटेवर पाऊस लागला की लगबगीने घरी पाय टाकायचा अन टी. व्ही. समोर मांडी ठोकून बसायच...

पण परवा आकाशवाणी सभागृहासमोरची गर्दी बघून आम्ही मुखावलो. आकाशवाणीला 'खंडहर' लागलाय. शनिवारी दुपारच्या आणि संध्याकाळच्या शोला भलतीच गर्दी होती.

सई पराजप्याचा 'स्पर्श'सुद्धा लोकाना आवडलायस दिसतय. जुन्यात सध्या वहीदा रहमान–राजकुमारचा 'नीलकमल' नोव्हेंल्टित बरा गल्ला जमवून राहिलाय. अमिताभचा 'बॉम्बे टू गोवा' तोडी लावायला आहेच.

इंग्रजीतला 'विक्टर–विक्टोरिया' हा ज्युली एण्ड्रूजचा मनोहारी पिक्चर आवर्जून पाहावासा आहे. हिचकॉक–प्रेमीना 'आय कन्फेस' तितकासा भावणार नाही; पण द मास्टर्स टच् इज देअर !

'नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्स' ने गेल्या आठवड्याला राजाभाऊ कोगज्यांचं गाण सादर केलं. हजारीलाल या कथकच्या गुणी विद्वानानेही आपली हजेरी लावली. फिरोज दस्तूरजींच खूप दिवसानतर सेंट झेवियरमध्ये गाणं झाल आणि याच आठवड्यात गान–तपस्विनी मोगूबाई कुर्डीकरानी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केलं. मैफलीतले हे प्राचीन दीपस्तंभ आणखी खूप वर्षे तेवत राहोत हीच इच्छा.

## ☐ जाताजाता

केंद्रीय नभोवाणीमंत्री श्रीयुत एच. के. एल. भगत यांनी मुंबईच्या पत्रकारांना गेल्या मंगळवारी ताजमध्ये खाना दिला. भगत हॉलमध्ये प्रवेशताच त्यांना ऐकू न जाईल (पण आमच्या कानावर पडेल) अशा बेताने एकाने टाकलेला हा खास वाग्बाण :— 'आइये भगतजी, बीस कलमी कार्यक्रमके पिंडदान का भोजन आपकी प्रतीक्षा कर रहा है !'

—विष्णू जयदेव

राजधानी दिल्ली

# नव्या वर्षाचा श्रीगणेशा

अडीच महिन्यांची उन्हाळी सुट्टी संपून दिल्ली विद्यापीठ आणि त्याची संलग्न महाविद्यालये १६ जुलैला नव्या शैक्षणिक वर्षासाठी सुरू झाली. दिल्लीमधला हा जुलैचा दुसरा पंधरवडा मला नेहमीच फार आवडतो. नव्या स्वप्नांच्या चाहुलीने उजळलेले चेहरे खळाळणाऱ्या हास्याने माखून तरुण मुलेमुली विद्यापीठाच्या अवघ्या परिसरात फुलपाखरासारखी भिरभिरत असतात. एकमेकाना साद घालत असतात. मोठमोठ्याने गप्पा मारत असतात. नव्या मित्र–मैत्रिणी जोडत असतात. मजा असते. या उत्साहाच्या कारंज्यात आपलेही मन टवटवीत होते. मधली पधरा वर्षे ओलांडून मागे जाऊ पाहते.

यदा मात्र विद्यापीठाच्या नव्या वर्षाचा श्रीगणेशा अगदीच विचित्रपणाने झाला.

दिल्ली विद्यापीठात वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी प्रवेश–परीक्षेत यशस्वी व्हावे लागते. केवळ १२ वीच्या गुणांना काहीच महत्त्व नसते. प्रवेश–परीक्षा अतिशय गंभीरपणाने घेतली जाते. या परीक्षेला शेकडो मुलेमुली बसतात. प्रश्नाची उत्तरे तपासण्यात परीक्षकाच्या मूडप्रमाणे कमी जास्त दर्जा होऊ नये म्हणून गणकयंत्राची मदत घेतली जाते. उत्तरांच्या प्रतवारीप्रमाणे गुण दिले जातात आणि मुख्य म्हणजे चुकीच्या उत्तराना उणे गुण (मायनस मार्क्स) दिले जातात. त्यामुळे थापा मारण्याची, योगायोगाने बरोबर उत्तर आले तर पाहू, असा चान्स घेण्याची सोय नसते. चुकीच्या उत्तरामुळे बरोबर उत्तराचे गुणही कमी होतात. या प्रवेश–परीक्षेचा निकाल गुणांसह अधिकृतपणे जाहीर होतो व त्याअनुसारेच वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश दिला जातो.

हे सगळे प्रोसीजर ठीकच असते; पण यंदा त्यातच प्रचड घोटाळा झाला. दोनतीन प्रश्नाची चुकीची उत्तरे गणकयंत्राला दिली गेला. त्यामुळे त्या अनुसारे इमाने–इतबारे काम करणाऱ्या गणकयत्राने चुकीच्या उत्तराना पूर्ण गुण तर दिलेच; पण उलट, बरोबर असणाऱ्या उत्तराना उणे गुण दिले. त्यामुळे भलत्याच विद्यार्थ्यांना भरपूर गुण मिळाले आणि लायक विद्यार्थ्यांना अगदीच कमी गुण मिळाले. परिणामी जे खरोखरी लायक होते, त्याचा क्रमांक गुणवत्ता यादीत खूपच खाली गेला आणि त्याच्यापेक्षा कमी लायक असणाऱ्याचा क्रमाक वर लागला.

काही विद्यार्थ्यांनी नव्या नियमानुसार आपल्या उत्तरपत्रिकांची पुनर्तपासणी करून घेतली, तेव्हा हा घोटाळा लक्षात आला. मग विद्यापीठाने दुरुस्त गुणवत्ता यादी जाहीर केली. त्यामुळे घोटाळा आणखी वाढला. कारण पूर्वीच्या यादीत वरचे क्रमाक मिळविणाऱ्या कित्येकाचे क्रमाक आता खूपच खाली गेले. त्यामुळे त्याची वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाची शक्यता दुरावली. दरम्यान विज्ञान महाविद्यालयातील जागा भरल्या. त्यामुळे त्याना बी. एस्सी. साठी महाविद्यालयात प्रवेश मिळणेही मुष्किल झाले. त्यांची अवस्था 'न घर का न घाट का' अशी झाली !

अनेक उमेदीच्या मुलामुलीना स्वतःची काहीही चूक नसताना आशा–निराशेच्या आंदोलनावर अगतिकपणे झोके घ्यावे लागले त्यातल्या कित्येकाना त्यामुळे गंभीर समस्यांनाही तोड द्यावे लागले असेल. कित्येकांच्या आयुष्याच्या गणिताचे हिशेब चुकले असतील. कुणाकुणाचे वर्ष वाया जाणार असेल !

या सगळयाविरुद्ध विद्यार्थीवर्गात संतापाची लाट उसळणे साहजिकच होते. त्या आगीत तेल पडावे अशी आणखी एक गोष्ट घडली.

१९८० ते १९८२ या काळातील वैद्यकीय प्रवेशपरीक्षामधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता जस्टिस भार्गव याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली होती. या समितीचा अहवालही नुकताच उघडकीस आला. त्यामध्ये १९८० ते १९८२ या काळातील अनेक गैरव्यवहार उघड केले असून, त्याबद्दल विद्यापीठास दोष दिलेला आहे.

यदाच्या घोटाळयाच्या पार्श्वभूमीवर हा अहवाल उघड झाल्यामुळे वातावरण चागलेच प्रक्षुब्ध झालेले आहे. बसमध्ये, विद्यापीठाच्या आवारात, कँटिनमध्ये सर्वत्र प्राध्यापक, विद्यापीठ कर्मचारी आणि विद्यार्थी याच्यातील चर्चेचा हा एकच विषय आहे. नवीन प्रवेश घेणारे विद्यार्थी तर या बाबतीत जास्तच प्रक्षुब्ध होऊन बोलताना आढळतात.

१६ जुलैला पहिल्याच दिवशी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आपला प्रक्षोभ एका विलक्षण रीतीने व्यक्त केला. कुलगुरूच्या कार्यालयाजवळून आम्ही चाललो होतो. आणि एकदम ढोल–ताशाचे आवाज ऐकू आले. गलका ऐकू आला. पाठोपाठ विद्यार्थ्यांची मिरवणूक दृष्टिपथात आली. चौकशी करता, ती 'गाढव–यात्रा' असल्याचे सागण्यात आले. प्रत्यक्षात ऐन वेळी गाढव न मिळाल्यामुळे तीन घोडी मिरवणुकीत दाखल केलेली होती. त्याच्या अगावर 'मै गधा हूँ' असे मोठमोठे बोर्ड लावलेले होते! प्रवेशपरीक्षेच्या घोटाळयाला कुलगुरू, कुलसचिव आणि एक डेप्युटी रजिस्ट्रार हे तिघे जबाबदार असून, त्या तिघानीही राजीनामे द्यावेत अशी मागणी करणारे फलकही त्या तीन 'गाढवा' वर लावलेले होते.

विद्यार्थी–सघटनेचे अध्यक्ष श्री. अनिल सोनी यांनी एक प्रकटन प्रसिद्ध केले. त्यात म्हटले आहे की, भार्गवसमितीचा अहवाल सादर झाल्याबरोबर, तो दडपून टाकण्याचा प्रयत्न करण्याऐवजी कुलगुरूनी ताबडतोब राजिनामा द्यावयास हवा होता. विद्यार्थी–सघटनेचे माजी अध्यक्ष श्री. विजयकुमार गोएल यानी प्रसृत केलेल्या प्रकटनामध्ये तर असा आरोप केलेला आहे की, विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौन्सिलपुढे ठेवण्यात आलेला भार्गवसमितीचा अहवालही मूळ अहवालाची केवळ सक्षिप्त आवृत्ती आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, विद्यापीठातील अधिकाऱ्याच्या दडपणामुळे जस्टिस भार्गव याना आपला अहवाल फेरफार करून माडावा लागलेला आहे. ज्या मूळ अहवालावर, जस्टिस भार्गव आणि विद्यापीठाचे कुलपती श्री. हिदायतुल्ला यांच्या स्वाक्षऱ्या आहेत, तो मूळ अहवाल जनतेपुढे यावा, अशी मागणी या प्रकटनामध्ये करण्यात आलेली आहे ऑल इडिया ज्युनियर डॉक्टर्स असोसिएशनने जाहीर केलेल्या प्रकटनामध्येही भार्गवसमितीचा अहवाल वर्षभर दडपून ठेवल्याबद्दल कुलगुरूंना दोषी ठरविले आहे.

ह्या सर्व प्रक्षुब्ध वातावरणाची परिणामकारकता वाढविण्यासाठीच की काय, विद्यापीठ परिसरात पहिल्याच दिवशी कडेकोट पोलीसबदोबस्त होता. रॅगिंग हा कायद्याने दखलपात्र गुन्हा म्हणून जाहीर झाल्यापासून दरवर्षी सुरुवातीच्या दिवसांत विद्यापीठ परिसरात पोलीसबदोबस्त असतोच; पण यदा त्याचे प्रमाण विशेष नजरेत भरण्यासारखे होते. ठिकठिकाणी लाठीधारी पोलिसाचे गट भोवतालच्या तारुण्यमय वातावरणाशी विसंगत चेहरे करून बसलेले. कुलगुरूंच्या कार्यालयासमोर जरा अंतरावर एक मोठी पोलिसव्हॅन. तिच्याजवळ पिस्तुलधारी इन्स्पेक्टर उगीचच येणाऱ्या-जाणाऱ्याकडे संशयाने पहात उभा. व्हॅनमध्ये लाठीधारी पोलिसाची गर्दी. घोडयावर स्वार असलेल्या पोलिसाची पथके विद्यापीठपरिसरात गस्त घालणारी.

नवीन वर्षाचा श्रीगणेशा असा सतापाच्या उद्रेकाने आणि अस्वस्थतेने भरलेला होता.

— निशिकांत मिरजकर

# श्रीनगरनंतर आता धाव बंगलोरकडे !

अभय गोखले

जम्मू–काश्मीरमधील फरुक सरकारचे भवितव्य मी गेल्या महिन्यातील ' माणूस ' च्या अंकात वर्तविले होते. अर्थात फरुक सरकार हे लवकरच कोसळणार ही गोष्ट दिल्लीचे माजी नायब राज्यपाल जगमोहन याची जम्मुकाश्मीरचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली तेव्हाच स्पष्ट झाली होती. आणीबाणीच्या कुप्रसिद्ध पर्वात जगमोहन यांनी आपली उपयुक्तता सिद्ध केलीच होती. तेव्हा फरुकला धडा शिकविण्यासाठी जगमोहन याच्याइतका योग्य माणूस कॉंग्रेसवाल्याना शोधूनही सापडला नसता. आपल्याला हव्या त्या व्यक्तीची मुख्यमंत्रीपदी वर्णी लावण्यासाठी किंवा नको त्या व्यक्तीस डच्चू देण्यासाठी राज्यपालाचा छान प्रकारे उपयोग करून घेण्याची पद्धत हरयाणापासून सुरू झाली. हरयाणात देवीलाल यांना त्यांचा न्याय्य-हक्क असूनही मंत्रिमंडळ बनविण्यासाठी पाचारण न करता भजनलाल यांना संधी देण्यात आली. अर्थात माजी राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी यांनी मोरारजी मंत्रिमंडळाच्या पतनानंतर जगजीवन राम याना मंत्रिमंडळ बनविण्यासाठी पाचारण न करता चरणसिंगांना अग्रक्रम देऊन एक नवीन पायंडा पाडला व त्याचीच री काही राज्यात नंतर ओढण्यात आली असे म्हटले तर वावगे ठरू नये. सिक्कीममध्ये नरबहादुर भंडारीना बडतर्फ करण्यात आले तोही काही वेगळा प्रकार नव्हता.

विरोधी पक्षाची सरकारे असलेल्या राज्यांत राज्यपाल हा अपवाद वगळता नेहमीच मुख्यमंत्र्याची डोकेदुखी होऊन बसला आहे. बंगाल, आंध्रप्रदेश येथील मुख्यमंत्र्यांना याच समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मी मागेच म्हटल्याप्रमाणे फरुकचे सरकार कोसळवण्यास केंद्र सरकार फार पूर्वीपासून घायतावलेले होते. बी. के. नेहरू, विजयधर यांच्यासारखा फरुकबद्दल सॉफ्ट कॉर्नर असलेल्या व्यक्तीमुळे फरुक सरकार इतका वेळ टिकू शकले. शेख अब्दुलाइतकी लोकप्रियता परदेशात राहून मेडिसिन प्रॅक्टिस करणाऱ्या फरुकला मिळणे शक्यच नव्हते. एक वेळ असे वाटत होते की, फरुक भारतात येऊन राजकारणात पडेल की नाही, त्यामुळे शेखसाहेबानंतर त्याचे जावई जी. एम. शहा हेच जम्मूकाश्मीरचे मुख्यमंत्री (शेखसाहेबाचे वारसदार) होतील असे वाटत होते. १९८२ मध्ये सर्व नूरच पालटला. फरुक काश्मीरच्या राजकारणात रस घेऊ लागला व जी. एम. शहाची डोकेदुखी वाढली. शेखसाहेबाच्या आजारपणात त्यानी आपला कौल फरुकच्या बाजूने दिला व तेथून शहा व फरुक याच्यातील प्रेमाचे नाते संपले! बेगम अब्दुल्ला या पहिल्यापासूनच आपल्या जावयाच्या विरोधात होत्या. शेखसाहेबाची लाडकी कन्या व जी. एम. शहाची पत्नी बेगम खलीदा ही प्रथम शहा व फरुक याच्या भांडणात फारसा रस घेत नव्हती; परतु फरुक मुख्यमंत्रीपदी आल्यावर त्याने तिच्या नवऱ्याला जी वागणूक दिली त्यामुळे ती उघड–उघडपणे फरुक व आईच्याविरुद्ध नवऱ्याच्या बाजूने उतरली. जी. एम. शहा मुख्यमंत्री झाल्याने त्याची आता जीवनातील महत्त्वाकांक्षा पुरी झाली आहे. मग लवकरच त्याचा चरणसिंग झाला तरी त्याला वाईट वाटण्याचे कारण नाही. जी. एम. शहा मुख्यमंत्री झाला या गोष्टीला महत्त्व नाही तर फरुकचे मंत्रिमंडळ पाडण्यात कॉंग्रेस (इं) पक्ष यशस्वी झाला ही गोष्ट महत्त्वाची आहे. जी. एम. शहा हे केवळ कॉंग्रेस (इं) च्या खेळातील एक प्यादे आहे. फरुकला पाडून शहाला त्याच्या जागेवर बसविण्यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शहा हा नॅशनल कॉंफरन्सचाच आहे आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे शेख कुटुंबातीलच एक व्यक्ती आहे. शहाची बायको व शेखसाहेबाची कन्या बेगम खलीदा ही आपल्या भावाप्रमाणेच जम्मूकाश्मीरमधील जनतेवर आपले वजन राखून आहे व त्याचा फायदा शहाला मिळेलच. फरुकला उलथवून शहाला स्थानापन्न केल्यावर काश्मिरात फारशा दंगली झाल्या नाहीत याचे कारण शेखसाहेबांचा मुलगा जाऊन त्याच्या जागी कॉंग्रेस (इ) चा मुफ्ती मोहंमद सईद याच्यासारखा परका माणूस मुख्यमंत्रीपदी न येता शेखसाहेबाच्या लाडक्या कन्येचा नवराच मुख्यमंत्रीपदी बसला आहे. २६ आमदाराचा बलवान गट पाठीशी असलेला कॉंग्रेस (इं) पक्ष शहाला मुख्यमंत्री एरवी करण्याइतका मूर्ख नाही !

### फरुकची घोडचूक

मुख्यमंत्री फरुक याच्या पतनास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या याची पार्श्वभूमी तपासून पहावयास हवी. १९८३ च्या जम्मूकाश्मिरातील निवडणुका फरुकने स्वतःच्या बळावर जिंकून दाखवल्या. शेखसाहेबाच्या मृत्यूनंतर झालेल्या या निवडणुकांत इंदिरा गांधीना असे वाटले की, आता जम्मूकाश्मीरमधील निवडणुका जिंकणे आपल्या पक्षाला सहज शक्य होईल; परंतु इंदिरा गांधीचा हा आत्मविश्वास शेखसाहेबाच्या पुत्राने खोटा ठरवला ! फरुक हा बराच काळ परदेशात असला तरी तो शेखसाहेबांचा मुलगा होता. तेव्हा त्याला शेखसाहेबांच्या पुण्याईचा फायदा मिळणार ही गोष्ट ठळकच होती. मग इंदिरा गांधीनी जातीय राजकारण खेळून पाहिले व जम्मू विभागात हिंदूंची मोठ्या प्रमाणावर मते खेचण्यात त्या यशस्वी झाल्या; परंतु काश्मीरखोऱ्यात मात्र मुस्लिम मतदारानी त्याना दाद दिली नाही व फरुकचा पक्ष बहुमताने सत्तेवर आला ही गोष्ट इंदिरा गांधीना फारच अपमानास्पद वाटली व तेव्हापासूनच फरुकच्याविरुद्ध कारवायांस प्रारंभ झाला. येथे ही गोष्ट स्पष्ट करावयास पाहिजे की, कर्नाटक व आंध्रमधील इंदिरा कॉंग्रेसचे बालेकिल्ले जे जनतालाटेतही अभेद्य राहिले ते नतर आंध्रात एन. टी.

आरक्या लाटेत वाहून गेले तर कर्नाटकात गुडुरावच्या भ्रष्ट कारकीर्दीस कंटाळलेल्या तेथील जनतेने बंगारप्पा व जनतापक्ष यांच्या आघाडीस जवळ करून तेथेही कॉंग्रेस (इं) ला धडा शिकवला. ह्या दोन्हीही घटना इंदिरा गांधीच्या जिव्हारी खोल जखम करून गेल्या आहेत. तेव्हा काश्मीरनतर कर्नाटक व आंध्रचा नंबर लागला तर त्याबद्दल आश्चर्य वाटावयास नको. त्याबद्दल नंतर पाहू. जम्मू–काश्मीरच्या निवडणुकांत सत्ताधारी नॅशनल कॉंफरन्सने बरेच बनवाबनवीचे प्रकार केले असा कांग्रेस (इं) ने आरोप केला. अर्थात असा आरोप पराभूत पक्षाकडून नेहमीच केला जात असल्याने तो गंभीरपणे घेण्याची आवश्यकता नाही; परंतु त्याचबरोबर फरुकने निवडणुका जिंकण्यासाठी मौलवी फरुकसारख्या जातीयवादी व पाकिस्तानधार्जिण्या नेत्याची मदत घेतली हा जो आरोप कांग्रेसतर्फे करण्यात आला तो हास्यास्पद होता. कारण याच मौलवी फरुकने जर कॉंग्रेसला मदत केली असती तर तो पुरोगामी समजला गेला असता. फरुक अब्दुल्लावर तो अतिरेक्याबद्दल सहानुभूती बाळगत होता, देशविरोधी शक्तींना त्याने मोकाट सोडले वगैरे आरोप आता केले जात आहेत, त्यात काही तथ्यही असू शकेल; पण हा साक्षात्कार कॉंग्रेसला केव्हा झाला, तर तो इंदिरा कॉंग्रेसच्या विरोधात राहिला तेव्हाच. जम्मू-काश्मिरात, पंजाबमधील अतिरेक्यांना फारच सुरक्षित वाटत होते; परंतु त्याचा सर्वस्वी दोष फरुककडे कसा काय जातो? लष्कराच्या कारवाईपूर्वी सुवर्णमंदिर हे अतिरेक्यांना, खुन्यांना, दरोडेखोरांना, गुन्हेगारांना अत्यंत सुरक्षित स्थान वाटत होते. मग याबद्दल फरुक केंद्रालाही दोषी ठरवू शकतो. कारण केंद्रानेच सुवर्णमंदिरातील अतिरेक्यांवर कारवाई करण्यास बराच विलंब लावून परिस्थिती चिघळवण्यास अप्रत्यक्षपणे हातभार लावला. तेव्हा फरुकवर केले जाणारे सर्व आरोप हे केवळ तो एम. जी. आर प्रमाणे केंद्राच्या ताटाखालील मांजर होऊन रहात नाही म्हणून केले जात आहेत. तो जर केंद्राच्या हो ला हो करत राहिला असता तर त्याला हजार गुन्हे माफ झाले असते!

फरुकला काही गोष्टी जड गेल्या त्या टाळता आल्या असत्या. त्याने पाकिस्तानात गेलेल्या परंतु परत येऊ इच्छिणाऱ्या काश्मिरी नागरिकांच्या पुनर्वसनाचे जे विधेयक आणले होते ते चीड आणणारे होते. वेस्ट इंडीजविरुद्धच्या श्रीनगरमधील सामन्यात काही देशद्रोही व्यक्तींनी भारतविरोधी घोषणा दिल्या व बराच दंगा केला. या लोकांविरुद्ध कडक कारवाई करण्यात फरुकने कुचराई केली, काश्मीरमध्ये निरनिराळ्या भारतविरोधी शक्ती व पक्ष कार्यरत आहेत. अशा शक्तींविरुद्ध शेखसाहेबांनीही कडक कारवाई करण्यात नेहमीच चालढकल केली व फरुकनेही तीच पॉलिसी कायम ठेवली. अर्थात जी. एम. शहा यापेक्षा वेगळे काही करेल अशी आशा बाळगण्यात अर्थ नाही. फरुकने नेहमी विरोधी पक्षाच्या निरनिराळ्या परिषदांत रस घेतला, विरोधी पक्षाच्या ऐक्यप्रयत्नांना हातभार लावला. कॉंग्रेसच्या दृष्टीने त्याने केलेली ही घोडचूक होती. फरुकने मुस्लिमांचा अखिल भारतीय नेता अशी स्वतःची प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न केला, तो इंदिरा गांधींना रुचणारा व परवडणारा नव्हता. फरुक हा काही सद्‌गुणाचा पुतळा नव्हे! शेखसाहेबांचा मुलगा तसा असूच शकणार नाही; परंतु तो जातीयतावादी नाही हे नक्की. तो एक वेळ सत्तावादी असेल व त्याकरीता हिंदूंचाही अनुनय करण्यास मागेपुढे पहाणार नाही. फरुकने निवडणुका दणदणीतपणे जिंकल्याने फक्त कॉंग्रेसलाच धक्का बसला नाही तर शेखसाहेबांचे जावई जी. एम. शहा, शेखसाहेबांचे निकटवर्ती व माजी अर्थमंत्री डी. डी. ठाकूर यांचीही सद्दी त्यामुळे धोक्यात आली. फरुकने या दोघांनाही बाहेरचा रस्ता दाखवला. हे दोघेही फरुकच्या पतनाकरिता टपून बसले होते त्यामुळे त्यांना व इंदिरा कॉंग्रेसला एकमेकांचा आधार वाटत होता.

### कारवायांना ऊत

फरुकला पाडण्याच्या कारवायांना मग ऊत आला. त्याला सत्तेवरून खाली खेचण्याचे समर्थन करण्यासाठी त्याच्यावर निरनिराळे खोटेनाटे आरोप करण्यात आले. तेथील विरोधी पक्षात असणाऱ्या इंदिरा कॉंग्रेसने काही निरर्थक आंदोलने केली व हिंसाचार माजवण्याचा प्रयत्न केला. ज्या ठिकाणी इंदिरा कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आहे तेथे मात्र विरोधी पक्षाची आंदोलने राज्याच्या प्रगतीला खीळ घालणारी ठरतात. राज्यातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती बिघडली आहे, अतिरेक्यांना मोकळे रान मिळाले आहे, देशविघातक शक्ती जोमात आहेत अशी तक्रार करणारी पत्रे मग रोजच्या रोज केंद्रीय गृहमंत्र्याकडून फरुकला येऊ लागली. फरुकचे मंत्रिमंडळ बरखास्त करण्यासाठी पार्श्वभूमी तयार करण्यात येऊ लागली. आमदार फोडण्याचे जोरदार प्रयत्न झाले. या प्रयत्नात मग जी. एम. शहा, डी. डी. ठाकुर यांची मोठी मदत कॉंग्रेसला मिळू लागली. फरुकला पाडण्यात कॉंग्रेसला खरोखरच रस आहे हे समजल्यावर मग जी. एम. शहाने उचल खाल्ली. फरुकच्या जागी आपली वर्णी लावण्यात येईल हे प्रथम त्याने स्पष्ट करून घेतले. आता प्रश्न होता तो फक्त बारा आमदार फोडण्याचा. त्यापूर्वी फरुकविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक होते. त्या कामी त्याला स्वतःची पत्नी बेगम खलीदा हिच्याइतकी योग्य व्यक्ती सापडणे शक्यच नव्हते. शहाने मग काश्मीरच्या खोऱ्यात निरनिराळ्या ठिकाणी सभा आयोजित करून फरुकविरुद्ध प्रचाराची आघाडी उघडली. फरुक हा हुकुमशहा आहे, त्याच्या राजवटीत देशविघातक शक्तींच्या कारवाया वाढल्या आहेत, स्वतःच्या राज्याच्या विकासात लक्ष घालण्याऐवजी त्याला विरोधी पक्षाच्या ऐक्यपरिषदात जास्त रस वाटतो, त्याच्या हलगर्जीपणामुळे जम्मू–काश्मिरांत येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी झाली असून राज्याचे सर्वात मोठे उत्पन्न त्यामुळे कमी झाले आहे, शेखसाहेबांनी घालून दिलेल्या मार्गाने त्याचा राज्यकारभार चाललेला नाही, महत्त्वाचे निर्णय घेताना तो सहकाऱ्यांना विश्वासात घेत नाही, स्वतःच्या मनमानी कारभाराने तो नॅशनल कॉन्फरन्स बुडवायला निघाला आहे, असे विविध आरोप शहा व त्याची पत्नी बेगम खलीदा आपल्या सभांमधून करू लागले. त्यांना पाठिंबाही बऱ्यापैकी मिळाला. काही ठिकाणी फरुकच्या पाठिराख्यांनी शहा व त्याच्या पत्नीच्या सभा उधळवून लावण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या गाडीवर हल्ला केला, त्यांचा मार्ग रोखून धरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शहा व त्याच्या पत्नीचा विरोध आणखी दृढ बनला. शहा व ठाकूर या प्रमुख विरोधकांना कमकुवत लेखण्यात फरुकने मोठी चूक केली कारण त्याच्या पाठीमागे इंदिरा कॉंग्रेसचा

फौजफाटा होता हे फरुकला माहीत होते, तरीसुद्धा फरुक त्याबाबतीत गाफील राहिला. त्याने नॉमिनेट केलेल्या दोन स्त्रीआमदार बंडखोरी केलेल्या बारा आमदारांत आहेत यावरून त्याला, कोण आपला मित्र व कोण शत्रू हे पारखण्याचीही कला फारशी अवगत नाही हे स्पष्ट होते.

शहा व त्याच्या पत्नीचे भवितव्य हे आमदार फोडण्यावर अवलंबून होते मग पूर्वतयारी म्हणून त्यांनी एक परिषद भरवून फरुकसकट काही लोकांची नॅशनल कॉन्फरन्समधून हकालपट्टी केली व आपला गट प्रतिनिधित्व करत असलेली नॅशनल कॉन्फरन्सही असली असल्याचा दावा केला. पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल फरुकगटाने ११७ राज्यसमितीवरील सदस्यांची हकालपट्टी केल्याने शहा व त्याच्या सहकाऱ्यांना बराच पाठिंबा मिळत असल्याचे अप्रत्यक्षरीत्या स्पष्ट झाले. आता सर्व सूत्रे कांग्रेस (इ) पक्षाने आपल्या हाती घेतली. शहा याना बारा आमदार फोडणे शक्य होते; परतु त्याचा विचार बदलला तर ? त्याकरिता जगमोहन होतेच की. इतर राज्यात फुटलेल्या आमदारांना त्यांचा विचार बदलू नये म्हणून एखाद्या दौऱ्यावर नेतात. जगमोहन तेवढीही रिस्क घ्यायला तयार नव्हते. त्यानी या बाराही आमदाराना राजभवनावरच बसवून ठेवले. तरी बरे की, फुटलेल्या प्रत्येक आमदाराला कॅबिनेटदर्जाचा मंत्री नेमण्याचे आश्वासन देण्यात आले होते व नंतर ते पाळण्यातही आले; परंतु जगमोहन फरुकला खाली खेचण्याचा जणू विडाच उचलून आले होते. जगमोहननी शहाला पाठिंबा व्यक्त करणाऱ्या कागदपत्रावर या बारा फुटीर आमदारांच्या सह्या ताबडतोब घेतल्या. आता बाकी तीन कामे शिल्लक राहिली–दिल्लीशी सपर्क साधणे, पोलीसप्रमुखास बोलावणे धाडणे व फरुकला बरखास्त करणे. पोलीसप्रमुखास श्रीनगर व आसपासच्या प्रदेशाचा कडक बदोबस्त ठेवण्याची आज्ञा देण्यात आली. त्याकरिता पोलिसाची जादा कुमक आवश्यक होती. आता फरुकच्या आगमनाची जगमोहन वाट पाहू लागले. फरुक आल्यावर त्याला बारा जणांच्या शहाला पाठिंबा व्यक्त करणाऱ्या सह्यांच्या पत्रकाची फोटोस्टॅट कॉपी दाखवण्यात आली फरुकने त्या फुटीर बारा आमदाराना पहाण्याची इच्छा व्यक्त केली. जगमोहनने ते लगेच मान्य केले. कारण ते बारा आमदार राजभवनातच होते व शपथविधी झाल्याशिवाय त्याची तेथून सुटका नव्हती. त्यातील काही आमदार फुटणार हे फरुकला माहीत होते; पण त्याने नॉमिनेट केलेले आमदार त्यात पाहून त्याला धक्काच बसला; परंतु आता जगमोहनना वेळ नव्हता. आता फरुकने बहुमत गमावल्याने राजीनामा द्यायला हवा होता; पण फरुक त्याला बधणार नव्हता. त्याने आपले हुकमी कार्ड बाहेर काढले. त्याने तीन सूचना केल्या. विधानसभेचे ताबडतोब अधिवेशन बोलावून शक्तिपरीक्षण करावे, विधानसभा ॲनिमेटेड सस्पेन्शनखाली ठेवावी, निवडणूक घेण्यात यावी.

## विरोधी आरोपांची खैरात !

यातील दुसरा पर्याय जगमोहन यांनी स्वीकारायचे ठरवले. राज्यात राज्यपालाची राजवट आणून विधानसभा ॲनिमेटेड सस्पेन्शनखाली ठेवायची. त्याकरिता जगमोहननी फरुकची लेखी संमती मागितली; परंतु दिल्लीत त्या वेळेस वेगळाच घटना घडत होत्या. जगमोहननी आपली कामगिरी चोखपणे पार पाडल्याबद्दल सर्वचजण खूष होते. परंतु फरुकने सुचविलेल्या पर्यायाबद्दल विविध मते ऐकू येत होती. इकडे श्रीनगरमध्ये जम्मू–काश्मीर कॉंग्रेसचे अध्यक्ष मुफ्ती मोहंमद सईद हे अस्वस्थ होत होते. जगमोहन यांनी सुचवलेला पर्याय जर दिल्लीकरानी मान्य केला असता तर जी. एस. शहा व जगमोहन यांच्या परिश्रमावर पाणी पडले असते. मुफ्ती मोहंमद यांनी दिल्लीशी डायरेक्ट संपर्क साधला. जगमोहन यांची सूचना मान्य केली तर बारा आमदार परत फरुकच्या गोटात जातील, त्याचप्रमाणे शहाला फसवल्यासारखे होऊन अशी संधी कॉंग्रेसला पुन्हा कधीच मिळणार नाही ही भीती मुफ्ती मोहंमद यांनी हायकमांडजवळ व्यक्त केली. हायकमांडला या भीतीत तथ्य आढळून आले. शहाचा शपथविधी ताबडतोब उरकून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. फरुकला बरखास्त करण्यात आले. त्याने जेव्हा डिसमिसले ऑर्डर पाहिली तेव्हा तोही चकित झाला. कारण राज्यपालाची राजवट आणण्याची त्याची सूचना राज्यपालानी मान्य केली आहे या इंप्रेशनखाली तो होता. फरुकचे उच्चाटन करण्यात येऊन तेथे शहाची वर्णी लावण्यात दिल्लीश्वर शेवटी यशस्वी झाले !

फरुकला डिसमिस करण्याची राज्यपाल जगमोहन यांची कृती घटनाबाह्य असल्याची तक्रार विरोधी पक्षांकडून करण्यात येते. या कृतीचा निषेध करण्यासाठी व फरुकला पाठिंबा देण्यासाठी विरोधीपक्षानी एक परिषदही घेतली. नेहमीप्रमाणे ठराव झाले; परतु त्यात जोश नव्हता. पुढील कार्यक्रमाची आखणी नव्हती. केवळ दिखाऊपणासाठी पाठिंब्याचे नाटक झाले की काय अशी शंका येत होती. नाही म्हणायला घरचे सोडून लष्करच्या भाकऱ्या भाजणारे जॉर्ज फर्नांडिससारखे जनता पक्षाचे नेते पाठिंबा दर्शविण्यासाठी जम्मू–काश्मिरात जाऊन आले. जगमोहन यांचे वर्तन घटनाबाह्य होते हे कबूल करण्यास प्रत्यवाय नाही; परंतु अशी किती तरी घटनाबाह्य वर्तने कॉंग्रेस (इं) च्या राज्यपालानी केली आहेत त्याचे पुढे काय झाले ? केवळ निषेधाचे ठराव पास करून त्या घटना काळाच्या पडद्याआड गेल्या. विधानसभेचे ताबडतोब अधिवेशन बोलावून शक्तिपरीक्षण करण्याची फरुकची सूचना राज्यपालानी मानायलाच हवी होती. राज्यपालांची राजवट आणून विधानसभा ॲनिमेटेड सस्पेन्शनखाली ठेवण्याची फरुकची सूचना सुरुवातीला राज्यपालानी मानलीच होती की ! नव्याने निवडणूक घेण्याची फरुकची सूचनाही स्वीकारण्याजोगी होती; परंतु फरुकचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने नेमलेल्या एखाद्या व्यक्तीकडून मग ती राज्यपालही का असेना अशी लोकशाहीवादी अपेक्षा करता येईल का ? जम्मू–काश्मीर विधानसभेने मागे एक पक्षांतरविरोधी विधेयक पास केले आहे. त्याला आव्हान दिले गेल्याने तो विषय सध्या सुप्रीम कोर्टासमोर आहे. अर्थात पक्षांतर आणि फूट यावरून बराच खल माजविता येईल. बारा आमदारानी बडखोरी केली हे पक्षांतर की पक्षातील फूट हे प्रथम ठरवावे लागेल. अर्थात याची काळजी करण्याचे जगमोहन; जी. एम. शहा व कॉंग्रेस (इं.) हायकमांड याना कारण नाही. कारण फरुक गादीवरून गेलाय व शहा त्याच्या जागी आलाय हा आता इतिहास झालाय; पण या शहाचे भवितव्य काय ? जुलैच्या शेवटच्या आठवड्यात बहुधा विधानसभेचे अधिवेशन बोलावले जाईल व शहा

आपले बहुमत सिद्ध करून दाखवेल. कारण मधल्या काळात फरुकचे आणखी काही आमदार शहाला मिळालेले असतील; पण असे किती काळ चालणार? नजीकच्या भविष्यकाळात शहाचा चरणसिंग करण्यात येईल. राज्यपालास नव्याने निवडणुका घेण्याचा सल्ला देण्याच्या सूचना शहाला वरून करण्यात येतील. शहा हे एक बाहुले असेल व सर्व निर्णय वरून देण्यात येतील. बारा जणाना आपली कॅबिनेटमंत्री होण्याची खाज भागवून घेता येईल.

दरम्यान जनमत फरुकविरोधी करण्यासाठी आरोपाची खैरात करण्यात येईल. शहाचे राज्य म्हणजे आपलेच राज्य असल्याने राज्यातील सर्व यंत्रणा मुक्तपणे राबवून घेण्यात येईल २६ आमदाराच्या पाठिंब्याच्या मोबदल्यात येवढयाही सवलती नकोत? निवडणुकात काँग्रेस (इं) पक्ष विजयी झाला तर शहाला खड्याप्रमाणे बाजूला सारण्यात येईल. अर्थात शहा हे सर्व न ओळखण्याइतका मूर्ख आहे असे नव्हे; परतु आपली महत्त्वाकांक्षा थोडया काळापुरती तरी पुरी झाल्याचे समाधान चरणसिंग (पंतप्रधान), यशवंतराव चव्हाण (उपपंतप्रधान) याच्याप्रमाणे त्याला उपभोगता येईल त्यात तो खुष आहे.

जम्मू–काश्मीरमधील यशाने प्रोत्साहित होऊन तसा प्रयत्न कर्नाटक व आंध्र या बिगरकाँग्रेसी राज्यांत आता करण्यात येईल. लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी यात यश आल्यास दुधात साखरच पडेल. कर्नाटकात हेगडे सरकार पाडण्याचे प्रयत्न फार पूर्वीपासून निकराने चालले आहेत. त्यांना गती येईल. गुंडुराव, के. ए. पाटील, मोईली, श्रीकांतय्या बगारप्पा या बुजुर्ग नेत्यांनी आता मोर्चेबांधणीस नव्याने सुरुवात केली आहे. जनता पक्षात जे क्रांतिरंगाचे लोक आहेत त्याना माघारी वळवण्यात बंगारप्पा यशस्वी झाले तर हेगडेसरकार कोसळण्यास एक मिनिटही लागणार नाही. त्या बदल्यात बंगारप्पाना शहाप्रमाणे मुख्यमंत्रीपद मिळेल. अझीझ सैदसारखे जनतापक्षातील नेते कन्नडभाषा लादण्याच्या प्रश्नावरून नाराज आहेत. जनता पक्षाच्या आडमुठेपणामुळे त्याना पाठिंबा देणारा १८ आमदाराचा भारतीय जनता पक्षाचा गटही हेगडेसरकारवर नाराज आहे व त्याबद्दल त्यांच्याकडून नेहमी निषेधही नोंदवला जातो. तेव्हा हेगडेसरकार खाली खेचणे सोपे नसले तरी अवघड मात्र नाही. त्याकरिता जगमोहनसारख्या व्यक्तीचीही आवश्यकता नाही. निरनिराळ्या पोटनिवडणुकाच्या (कर्नाटकातील) निकालावरूनही हेगडेसरकारचे बस्तान नीट बसलेले नाही या गोष्टीस पुष्टी मिळते. अर्थात कर्नाटकात निवडणुका जिंकण्यासाठी काँग्रेस (इ)ला हेगडेसरकार पाडण्याची आवश्यकता नाही. कारण ते न पाडताही काँग्रेस (इ)ला कर्नाटकातील निवडणुका जिंकता येतील. जनतापक्षाने सत्ता असूनही संघटना बांधण्यासाठी तिचा उपयोग करून घेतलेला नाही भाजप व जनता यांच्यात समझोता होणे जवळजवळ अशक्य आहे आणि झाला तरी तो काँग्रेस (इ) चे पुनरागमन रोखू शकणार नाही. कुटिल कारवायानी हेगडेसरकार पाडण्यात आले तरच त्याचा फायदा जनता पक्षास मिळू शकेल.

आंध्रप्रदेशात सध्या तरी एन. टी. आर. ची बाजू मजबूत दिसते; परतु अर्थमंत्री एन. भास्करराव यांचे दुखणे एन. टी. आर.च्या पाठीशी आहेच. या एन. भास्कररावला साधारणत: साठ आमदारांचा पाठिंबा आहे. मात्र एवढयावरच भागणार नाही आणखी आमदार फोडावे लागतील. एन. टी. आर. च्या काही अव्यवहार्य निर्णयामुळे जनमत त्याला फारसे अनुकूल नसले तरी प्रतिकूल मात्र नाही. अर्थात भास्करराव काही किमया करू शकला तर शहाप्रमाणे त्याला मुख्यमंत्र्याच्या गादीवर काही काळ बसण्याचा चान्स मिळेल; परंतु आंध्रमध्ये हे सर्व कठीणच दिसतय. कारण आंध्रातील काँग्रेस (इ) नेतृत्वात दुफळी आहे जबर पराभवामुळे नेतृत्वास उभारी राहिली नसून नैराश्य पसरले आहे. विरोधी पक्षात रहाण्याची सवय नसल्याने जड जात आहे. अंजैय्या, वेंगलराव, ब्रह्मानंद रेड्डी, प्रभाकरराव, नरसिंहराव असे वेगवेगळे गट निर्माण झाले असून निष्ठावंत व बिगरनिष्ठावत अशी भांडणे सुरू आहेत. चेन्ना रेड्डीसारख्या वजनदार नेत्याने आपली वेगळी चूल मांडली आहे. तेव्हा आंध्रात जम्मू–काश्मीरचा प्रयोग यशस्वी होणे अवघड वाटत आहे

लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी जास्तीत जास्त बिगरकाँग्रेस सरकारे खाली खेचणे इंदिरा गांधींना अत्यावश्यक आहे. त्रिपुरा व बंगाल या राज्यात त्या हा प्रयोग करणार नाहीत. कारण तेथे वेगळे तंत्र वापरावे लागेल निरनिराळी आंदोलने उभारून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुढे करून अशी सरकारे बरखास्त करण्याचा प्रयत्न होणारच नाही असे छातीठोकपणे सागता येणार नाही पंजाबमधील सुवर्णमंदिरातील लष्कराच्या कारवाईनंतर बहुसंख्य हिंदूची मने त्यानी जिंकली आहेत. निदान राजकीय समीक्षकाना तरी तसे वाटते. या पार्श्वभूमीवर त्याचा पुरेपूर फायदा उठवण्यासाठी त्या लवकरात लवकर म्हणजे नोव्हेंबरअखेर निवडणूक घेण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळेच बहुधा पंजाबातील अतिरेक्यांनी पुन्हा डोके वर काढू नये व हिंदूची सहानुभूती तशीच कायम रहावी म्हणून इंदिरा गांधी शर्थीचे प्रयत्न करतील. त्याची परिणती म्हणजे पंजाबमधील लष्कर हे लोकसभा–निवडणुका पार पडेपर्यंत तेथेच राहील व त्याचे समर्थन करण्याकरिता दररोज निरनिराळ्या ठिकाणी अतिरेकी पकडण्याच्या, शस्त्रसाठे पकडण्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून छापवून आणण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्या दृष्टीने जम्मू–काश्मीरमधील घटना ही पहिले पाऊल असेल. अशी अनेक पावले लोकसभेच्या निवडणुकापूर्वी उचलण्यात येतील. □



जुलमी राजवटीच्या टाचाखाली दडल्या–चिरडल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ करणाऱ्या एका अलीकडच्या क्रांतीचा इतिहास

# फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू । किंमत बावीस रुपये

दुसरी आवृत्ती

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ३०.**



# फक्त हे एक तपाचे

आज दलित पँथरचा बारावा वर्धापनदिन· ३६५ गुणिले १२ गुणिले ३०/३१ गुणिले तास घटकापळे मिनिट–सेकंदस्. इतिहासाला एक दशकाला, तपाला काय महत्त्व असते ? इ. इ. पंडित म्हणतात; पण वेळेला काही सेकंदांचा निर्णय इतिहासाला वेगळे वळण लावू शकतो. वस्तुनिष्ठ भूमिकेतून हे चॅलेंज केले जाईल; पण मानवी निर्णयामुळे इतिहास बदलला आहे. प्रयत्नांमुळेही मार्क्सचे प्रयत्न, त्याअगोदर ल्यूथरचे, बेकनचे, गॅलिलिओचे, महंमदाचे, जीझस ख्राइस्टचे. त्यांच्या स्फूर्तीचा क्षण हा इतिहासाने पूर्वनिर्णित होता असं म्हणणं म्हणजे विश्वातील मानवी इतिहासाचा रोल नाकारण्यासारखं आहे.

आज एक तप पँथरने वाटचाल केली आहे. तप हा शब्दच मुळात चॅलेंज होण्यासारखा आहे. दशक का नाही ? तपश्चर्येमागचे तत्त्वच जिथे वादातीत नाही तिथे तप हा शब्ददेखील प्रोटेस्टस इव्होक करू शकतो. तप म्हणजे अध्ययन, मनन, चिंतन, प्रयत्न, मेहनत सर्व काही आणि एक कालखंडही असा 'तपाचा'. संस्कृती मान्य करायची असली तर काही कन्सेप्टस मान्य कराव्या लागतात. संस्कृती मान्य करण्याने तिच्यामागली धर्म, समाजव्यवस्था सर्व नीतिमूल्ये मान्य करायलाच पाहिजेत असे नाही. ॲरिस्टॉटल, हेरॅक्लिटस, पायथागोरस मान्य करताना गुलामसमाजव्यवस्था मान्य करायची आवश्यकता नसते हे कुणाला सांगायची गरज आहे काय ?

आपण आजही इलियड, आडेसि, व्हर्जिलची रोमन महाकाव्ये मोठ्या चवीने वाचतो की नाही ? मग रामायण, महाभारत का नाही ? राम मोठा होता की रावण हा कलाविषयक टीकाशास्त्राचा विषय होऊ शकतो, इतिहासाचा नव्हे.

परंतु पँथर्सना वाटलं आपण इतिहासासकट सर्वच घडवू शकतो. ताकद नसताना आणि हिंदुसंस्कृतीच्या दरवाजांवर धडका मारून ते हतबल झाले. हिंदुसंस्कृती इतकी दुर्बल नाही हे त्यांना कळलंच नाही आणि मग सईं संगारे भाष्य करीत राहिला की आम्ही बौद्ध धर्मयुद्ध करू.

बाबासाहेबानंतरचा रिपब्लिकन पक्ष म्हणजे दादासाहेब गायकवाडांची चळवळ सोडता गाडद्यामागूनची नळद्याची यात्रा होती. त्या प्रचंड वृक्षाच्या सावलीला वाढलेली रोपटी समाजाला–दलितसमाजाला कितीसा गारवा–ओलावा मिळवून देणार ? १९५६ ते ७२ हा काळ दलित चळवळीच्या दृष्टीने नुसता श्वास वा उसंत घेण्याचा काळ होता. त्या काळात निर्माण झालेले पुढारीपण पार्लमेंटरी राजकारणाच्या खबदाडात जगले. स्फूर्ती, आवेश, अनुउन्मेषशून्य अशा ह्या चळवळीच्या काळी बाबासाहेबांच्या तालमीत तयार झालेल्या जुन्या कार्यकर्त्यांच्या संचाने रिपब्लिकन चळवळ तगवली.

जातीजमाती अन् जुनाट बुरसटलेल्या धार्मिक समजुती अन् संस्कृतीने पछाडलेल्या ह्या हिंदवी समाजात–भारतात–दलितांच्या स्थितीत बाबासाहेबांनंतर तसा फारसा बदल झाला नव्हता. फक्त घटनेतून मिळालेल्या सवलतींच्या अन् तुटपुंज्या भांडवली लोकशाहीच्या आधारे दलित मानव आपली खुरडी वाटचाल करण्याचा लंगडा प्रयत्न करीत होता. त्या काळातील दलित पुढारीपणाला अखिल भारतीय काय पण अखिल जातीय नेतृत्वदेखील मिळाले नव्हते. ही चळवळ फक्त महारांची आहे हा शिक्का इतर दलितजाती सतत ह्या दुबळ्या चळवळीवर मारीत होत्या. तिच्यात सामील होण्याची गोष्ट सोडाच; पण तिच्या थोडेफार जवळ येण्याचाही प्रयत्न त्या जातीजमातींनी केला नाही. रिपब्लिकन पुढारीपणाच्या आकुंचित दृष्टिकोणामुळे आणि कार्यपद्धतीमुळे आपल्या उकिरड्याच्या ढिगाऱ्यावर मी मोठा, की तू मोठा याविषयी स्पर्धा करण्यापलीकडे रिपब्लिकन चळवळ फारशी पुढे गेली नाही.

## वैशिष्ट्यपूर्ण उगम

आणि नंतर ह्या वाळवंटी शांततेत अचानक नौबती झडल्या. दलितांवरील अत्याचार ही १९६० नंतरची नित्याचीच गोष्ट होती; परंतु १९७० च्या सुमारास महाराष्ट्रात व भारतात दलितांवरील अत्याचारांना भलतीच भयंकर उभारी आली. वाडा घडले, भूभाग घडले. दलिती स्त्रियांवर बलात्कार नित्याचेच झाले आणि अचानक दलितांमधील महारजमातीतील शहरी तरुणांनी उठाव केला आणि दलित पँथरची स्थापना झाली.

९ जुलै १९७२ या दिवशी दलित पँथरची स्थापना झाली.
नुकताच पुणे येथे नेहरू मेमोरिअल हॉलमध्ये पँथरचा १२ वा वर्धापनदिन साजरा झाला.
या निमित्त हा लेख. पँथरच्या १२ वर्षांतील वाटचालीचे हे एक आत्मपरीक्षणच !
कॉम्रेड जयंत प्रधान यांनी दोन वर्षांपूर्वी 'माणूस 'मध्ये ( ऑगस्ट, १९४२ ) लिहिलेला 'दोन कॉम्रेडस ' हा लेख वाचकांना आठवत असेलच.
पुस्तकरूपाने हे लिखाण लवकरच प्रसिद्ध होत आहे.

जयंत प्रधान

दलित पँथरचा उगम अतिशय वैशिष्टयपूर्ण होता. ज. वि. पवार आणि नामदेव ढसाळ ही कामाठीपुरा–वस्तीतील पोरं. दोघेही कविमनाचे कवी. त्यांच्या डोक्यातून दलित पँथरची कल्पना जन्माला आली. मध्यमुंबई-मधल्या कामाठीपुऱ्याच्या बकाल वस्तीत राहणाऱ्या ह्या तरुणांना आपल्या दलितसमाजावर होणाऱ्या अत्याचारांची अचानक प्रखर जाणीव झाली. थाळी आणि पळी घेऊन हे तरणेबांड विशी–बाविशीचे दलितकवी घराबाहेर पडले. काव्यात्मक मनांनी पेट घेतल्यानंतर त्यांना पब्लिक एक्स्प्रेशन ही फारशी दुर्गम गोष्ट नसते. कामाठीपुऱ्याच्या, भाजगावच्या आणि मध्यमुबईतील इतर झोपडपट्टयांमध्ये दलितवस्ती भरपूर आहे. त्यांनी आपल्यासारख्या धाडसी तरण्याबाड पोरांना जमा करायला सुरुवात केली. शहरात बेकार तरुणांना तोटा नसतो. त्यात दलिततरुणात बेकारी अठरा विश्वे वास्तव्य करून नादत होती. बृहन्मुबई नगरपालिका त्या हजारो दलिततरुणांना काम देण्यास समर्थ नव्हती. सुशिक्षित पोरे सरकारी नोकऱ्यांत थोडीफार घुसत होती; पण नवसुशिक्षित दलित बेकारांचा ओघ साभाळण्याइतका तो व्हेन्यू मोठा नव्हता.

त्यामुळे दलितांवरील अत्याचार ही मुख्य समस्या घेऊन उभे राह्यलेल्या ह्या दलित पँथरमागे वेगाने दलित–तरुण, विशेषत: महार-तरुण आकर्षिले गेले. पुढारी ठरवायला वेळ नव्हता. सात रस्त्याचा भाई संगारे त्यात आला. अविनाश महातेकराने आपल्या ओघवत्या वक्तृत्वाने आपले पुढारीपणही निश्चत केले. भाई संगारेने आपल्या डायरेक्ट हिंदूविरोधी वक्तव्याने सर्व तरुणांचे लक्ष स्वतःकडे वळवून घेतले. त्याचे धर्मविरोधी, हिंदुधर्मविरोधी उद्रेकी वक्तव्य त्या काळी दलित तरुणाना फारच अपीलिंग वाटत होते. ज्या धर्मीय समाजाने आपल्यावर हजारो वर्षे अत्याचार केले त्या समाजाविरुद्ध इतक्या उग्रपणे भाष्य करणारा भाई सगारे हा पहिला तरुण पुढारी होता !

झोपडपट्ट्यांतून कॉर्नर मीटिंग्स आणि जाहीर सभा सुरू झाल्या. मुबईमध्ये हजारो तरुण पँथरकडे आकर्षित होत गेले. शिवसेनेची चळवळ १९६९ च्या मुंबई दंगलीनतर बरीचशी पिछाडीला गेली होती. बहुसंख्य दलिततरुण माजी शिवसैनिक होते. खुद्द नामदेवने काही काळ शिवसेनेचे वारे खाल्ले होते.

दलित पँथर – त्यातील पँथर हा शब्द त्याचा निर्देशक आहे. अमेरिकेतील ब्लॅक पँथर ह्या निग्रो चळवळीतून आपली स्फूर्ती घेतली होती. १९६७ च्या अमेरिकेमधील प्रमुख दक्षिण शहरातील नीग्रोंच्या दंगली सर्व जगाच्या मनात ताज्या होत्या.

भारतातील दलितसमाज आणि अमेरिकेतील नीग्रोसमाज ह्याच्यात बरेचसे साधर्म्य आहे. फरक एवढाच की, अमेरिकेतील नीग्रोसमाज हा बाहेरून, आफ्रिकेतून आणून अमेरिकेतील मळधात कामाला लावलेल्या गुलामापासून निर्माण झालेला आहे, तर भारतीय दलित एतद्देशीय वन्य आणि स्वतंत्र जमातींना गुलाम करून घडविला गेला आहे प्रत्येक दलितजातीला वेगळी वाशिक चेहरेपट्टी फिजिऑनॉमी आहे. शरीराची विशिष्ट घडण आहे. महार, मातंग आणि इतर मागास जमाती सरावलेल्या नजराना तावडतोब ओळखता येतात.

१८६४ साली लिंकनच्या प्रयत्नांमुळे 'मुक्त ' झालेला नीग्रोसमाज अद्यापही अमेरिकेत (भारतीय दलितासारखा थोडाफार) सामाजिक गुलाम आहे. फरक आहेत, पॅटर्न थोडे वेगळे; पण दलितत्व हा कॉमन धागा आहे.

लिंकन, ल्यूथरच्या चळवळीतून असे अमेरिकन नीग्रोसमाजाला किंचित आर्थिक सामाजिक 'स्वातंत्र्य ' लाभले तसेच फुले–आंबेडकराच्या चळवळीमुळेही येथील दलितसमाजाला लाभले; पण येथे दलितांची स्थिती खेडयांत निग्रोहून अधिक हीनदीन आहे. पूर्वापारपासून गोरासमाज निग्रो कुक्सच्या हातचे अन्न खात आला आहे. त्याना घरात नोकर म्हणून वांवरू देत आला आहे; परंतु भारतात दलिताच्या हातचे अन्न अद्यापही घरातून खाल्ले जात नाही. त्याना घरात नोकर म्हणून आजही खेड्यात वा शहरात काम करण्यास मुभा नाही. बाकी बाबतीत अमेरिकन नीग्रोत आणि भारतीय दलितात बरेच साम्य आहे.

अमेरिकन नीग्रोंच्या ब्लॅक पँथर ह्या चळवळीने प्रथमपासून हिंसकमार्ग आक्रमला. स्वत:ला एकूण अमेरिकन समाजात मानाचे स्थान मिळवण्यासाठी सुरू केलेल्या या

'स्वातंत्र्य' चळवळीने गोऱ्या समाजाशी कोणतीही तडजोड करण्यास नकार दिला. ब्लॅक लिबरेशन ही त्याची घोषणा होती. जशी दलितचळवळ पँथरनंतर अधूनमधून दलितस्थानची मागणी करीत असते तशी. दोन्ही चळवळींना हे ज्ञात होते व आहे की, 'स्वातंत्र्य' हे राजकीय नाही तर सामाजिकच होऊ शकते.

तर येथील पँथर्सनी अमेरिकन पँथर्सपासून स्फूर्ती घेतली हे एकूण खरे.

त्यानंतर शहरी पँथर्सना एकत्रित करून ज्या ग्रामीण भागात अत्याचार झाले त्या ठिकाणी मोर्चेवजा धाडी घालण्याचे यशस्वी कार्यक्रम झाले. १९७२ नी १९७३ मध्ये.

## फेमस आर्टिकल

त्यानंतर राजा ढालेचे साधनामधले फेमस आर्टिकल प्रसिद्ध झाले. 'ज्या देशात दलितांना माणुसकीची वागणूक मिळत नाही त्या देशाच्या ध्वजाला काय किंमत द्यायची?' असा खडा सवाल राजाने 'ग्राम्य' भाषेत त्या आर्टिकलमध्ये केला होता. त्याच्यावर बराच गदारोळ माजून, काल-परवापर्यंत मराठी टीकाकाराच्या स्वरूपात वावरणारा राजा अचानक एका रात्रीत पुढारी झाला. पँथरचा एक नेता झाला!

त्यानंतर वरळीची दंगल घडली.

निमित्त लोकसभा-पोटनिवडणुकीचे झाले; परंतु दंगलीचा खरा निवडणुकीशी काही संबंध नव्हता. रामराव आदिक विरुद्ध रोझा देशपांडे अशी ती लढत होती. निवडणुकीवर बहिष्कार घालावा ही पँथर्सची भूमिका होती. त्या काळी नामदेवदेखील हिंदू देवदेवतांवर टीकात्मक भाष्य भाषणांतून करीत असे. वातावरण अशा प्रक्षोभक भाषणांमुळे तापत गेले आणि ७४ जानेवारीत त्याचा अचानक स्फोट झाला!

त्यानंतर वरळीत रणधुमाळी सुरू झाली. १९६२ सालापासून १९६७ पर्यंत मी कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून वरळीत काम केले होते. वरळीत दंगली छोट्या प्रमाणावर चालत; पण त्या आतर्जातीय नव्हत्या. बी. सी. कांबळे गट व आर. डी. भंडारे गट यांच्यात या किरकोळ दंगली होत. दोन्ही बाजूची मंडळी दगडविटांचा भरपूर वापर करीत. जातीय अशी ही वरळीतील पहिलीच दंगल असावी. हल्लीच्या काळातली पोलीस आणि शिवसैनिक विरुद्ध हारूण पँथर्स अशी ही लढत होती.

त्यात राजा ढाळे दंगलीच्या वेळी वरळीत गेला. पोलिसांनी मागचापुढचा विचार न करता राजाला लाठ्याकाठ्यांनी चोपून काढले. दुसऱ्या दिवशी सर्व पेपरांत राजाचे बँडेज केलेल्या डोक्यासहित, हातकड्या घालून पोलिसांनी चालवलेले फोटो आले. ओव्हरनाइट राजा ढाळे महाराष्ट्रातील दलितांचा हीरो बनला. राजा तसा फार धीट. समोर काही घडले तर पळायचे नाही ही त्याची ठाम भूमिका असायची.

त्यानंतर दंगल बरीच चिघळली. न भूतो न भविष्यति इतकी. सतत आठदहा दिवस. वरळीचा कामगारविभाग त्यात संपूर्ण इन्व्हॉल्व्ह झाला होता. दंगलीच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रात मथळे गाजवत असताना डी. बी. सी. लंडनवरून त्या देण्यात आल्या आणि दीड वर्ष वयाची छोटीशी दलित पँथर जगभर प्रसिद्ध झाली. परदेशहून अमेरिकन व युरोपियन वार्ताहर तिचा वास काढीत मुंबईत दाखल झाले.

राजा ढाले इत्यादि पुढाऱ्यांना पकडल्यावर नायगाव डी. डी. चाळी येथेही दंगलीचे लोण पसरले. भोईवाड्याच्या मैदानावरून वरळी दंगलीतील अत्याचारांविरुद्ध आणि पुढाऱ्यांच्या अटकेबद्दल एक मोर्चा काढण्यात आला. नामदेव ढसाळ, लतिफ खाटिक यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. परळच्या नाक्यावर मोर्चा आला असता बाजूच्या चाळीतून मोर्चावर शिवसैनिकांनी दगडफेक केली. त्यात एक मोठा धोंडा लागून भागवत जाधव नावाचा मोर्चातील दलित तरुण जागच्या जागी ठार झाला. त्याचे पडसाद महाराष्ट्रभर उमटले. ठिकठिकाणी निषेध-मोर्चे, सभा झाल्या. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देखील. मोर्चावर पोलिसांनी जबरदस्त लाठीमार करून तो निर्दयपणे मोडून काढला त्यात लतिफ खाटिक इत्यादि पुढाऱ्यांना फार जबरदस्त मारण्यात आले आणि पकडून भोईवाड्याच्या लॉकपमध्ये बंद करण्यात आले.

याच काळात आम्हा प्रोग्रेसिव्ह मंडळींचा दलित पँथरशी संबंध आला. कमलाकर सामंत हा कम्युनिस्ट पार्टीचा वकील आणि सुनिल दिघे हे अगोदरपासून पँथरशी थोडेफार संबंधित होतेच; पण भोईवाड्याच्या केसनंतर इतर चार-पाच कम्युनिस्टमंडळी पँथरच्या मदतीसाठी पुढे झाली. दलित पँथरच्या पुढाऱ्यांच्या 'जातीयवादी' आणि हिंदु देवादिकांविरुद्धच्या प्रक्षोभक भाषणांमुळे त्यांच्यावर बऱ्याच फौजदारी केसेस लावण्यात आल्या होत्या. वरळी व भोईवाड्याच्या दंगलीनंतर त्या बऱ्याच वाढल्या. आम्ही कायदेशीर आणि आर्थिक अशा स्वरूपाची बरीच मदत पँथर्सना या काळात केली. केसेसच्या निमित्ताने नाशिक, पुणे, मुंबई, औरंगाबाद येथे माझे, वकील म्हणून पँथर्सबरोबर कोर्टातून जाणे-येणे सुरू झाले. त्या निमित्ताने पँथर्सचे कार्यकर्ते व पुढारी आमच्याबरोबर हिंडू लागले. घरी ये-जा करू लागले. त्यानंतर आम्ही थोडेफार सल्लागार या नात्यानेही पँथरमध्ये वावरू लागलो.

मुंबईच्या दंगलीवर चौकशी-आयोग नेमण्यात आला. त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही; परंतु दलित पँथर त्यामुळे महाराष्ट्रभर फैलावली आणि गुजराथ, यू. पी., बिहार इत्यादि ठिकाणांहून तिला चांगला रिस्पॉन्स मिळू लागला. नामदेव ढसाळ, ढाले, भाई संगारे गुजराथ-दिल्लीपर्यंत फिरून सभा घेऊन आले.

पँथरच्या समोर ठोस असा काहीच कार्यक्रम नव्हता. नामदेवने ते काम हाती घेतले. सुनिल दिघे या नक्षलवादी तरुणाने त्यात त्याला बरीच मदत केली. सुनील पँथरच्या कार्यकारिणीत होता. त्याचा नामदेववर बराच प्रभाव पडला. सर्व पॅन्थरपुढाऱ्यात नामदेवचाच कल डावीकडे जास्त होता. राजा ढालेचा कल बुद्धिझमकडे, धार्मिक पद्धतीने होता भाई संगारेचादेखील. नामदेवला धर्माचे प्रथमपासून वावडेच होते. लौकरच पँथरचा जाहीरनामा तयार झाला.

## नामा जाहीर

पँथर्सना मदत करणाऱ्यात कम्युनिस्ट कार्यकर्तेच अधिक पुढे होते. महाराष्ट्रातील इतर राजकारकारण्यांनी स्वतःला दलित पँथरपासून दूरच ठेवले होते. एक तर हिंदु पुढारीपण व लोक त्याच्याकडे त्यांच्या हिंदु-

विरोधी घोषणा व वागण्यामुळे (दलित पँथरच्या) विरोधातच होते. एकूण चळवळीत पँथरला दलित म्हणूनच वागवले गेले. रिपब्लिकन पुढारीही तिच्याकडे भीती व शंकापूर्ण भूमिकेतून पाहात होते.ही अँग्री यंग पोरं आपलं नेतृत्व काढून घेतात की काय ही भीती त्यांना होती. पँथरच्या सभातून रिपब्लिकन पुढाऱ्याच्या एकूण दीड दशकाच्या कारकीर्दीवर राजकीय व वैयक्तिक जबरदस्त टीकेची झोड उठवण्यात येत असे. बहुतेक संपूर्ण महार तरुण पँथरमागे संघटित झाला होता. पुण्यातील व मुंबईतील मातंग तरुणही पँथरकडे वळला होता; परंतु व्यक्तिगत पातळीवरून कम्युनिस्ट विचारांच्या कार्यकर्त्यांकडूनच दलित पँथरला भरपूर सहकार्य मिळाले.

त्या सुमारच्या अशाच एका मोर्चात बरेचसे कम्युनिस्ट व पुरोगामी तरुण सामील झाले होते. त्याच्यासमोर भाषण करताना नामदेवने कम्युनिस्ट–चळवळीवर बरीच टीका केली आणि 'तुम्ही कसले कम्युनिस्ट? मी हाडाचा खरा कम्युनिस्ट आहे' असे उपरोधपूर्ण उद्गार काढले. त्याला वर्तमानपत्रातून बरीच प्रसिद्धी मिळाली. राजा ढाळेने त्याचे बरेच भांडवल केले.

त्यातच सुनिल दिघेच्या मदतीने नामदेवने तयार केलेला जाहीरनामा महाराष्ट्रभर प्रसृत झाला होता. दलित पँथरचा जाहीरनामा म्हणून. तो कोणत्याही डाव्या पक्षाला शोभण्यासारखा होता. राजा त्याला 'जाहीरनामा' नाही, तो. तो 'नामा जाहीर' आहे असे म्हणू लागला. नामदेव कम्युनिस्ट आहे, असा ठपका त्याने नामदेववर ठेवावयास सुरुवात केली. दलित चळवळीत सर्व काही चालते; पण कम्युनिस्ट असणे म्हणजे महारोगी असण्याइतके भयकर मानले जाते. त्यातच अनिल अवचटने मनोहरमध्ये एक लेख लिहून या सर्व गोष्टीच्या जाहीर चर्चेला वाचा फोडली. नामदेवची कम्युनिस्टांशी जवळीक समाजवादी मंडळींना काटयासारखी बोचत होती. पँथरमधील दुहीवर अनिल अवचटने अवचट असे भाष्य करून पँथर–पुढाऱ्यांत पडू घातलेल्या फुटीला गती दिली.

दलित पँथर हे खरे राजा ढाळेचे अपत्य नव्हते. तो 'साधना'मधील लेखाने मागाहून चळवळीत आला होता. वृत्तीने तो राजकीयही नव्हता. संघटनात्मक जबाबदारी त्याला त्या काळात फारशी समजली–उमजली नव्हती. तो वृत्तीने खरा टीकाकार, साहित्यिक–टाइप आणि इंडिव्हिज्युअॅलिस्ट. 'इंदिरा गांधी ही एक स्त्री आहे. स्त्री दलित आहे. तर तिच्याविरुद्ध निदर्शने करू नयेत' अशा तऱ्हेची तिरपगडी वक्तव्ये तो अॅटरँडम करीत असे. नामदेवशी त्याने जवळ–जवळ हाडवैर धरले. संघटनेवर त्याचा काय परिणाम होईल त्याचा त्याने फारसा विचार केला नाही. आपण एक व्यक्ती व आपल्या पाठीमागे दलित मास ही त्याची विचार करण्याची प्रवृत्ती होती. नामदेव कम्युनिस्ट नव्हता व नाही. मार्क्सवादाचा त्याने चोकसपणे अभ्यास केला होता. त्यातल्या काही गोष्टी त्याला पटत होत्या; पण त्याविषयी व कम्युनिस्टाविषयी त्याची भूमिका टीकात्मक होती. दलितप्रश्नावर भारतीय कम्युनिस्टांनी कोणतीच भूमिका घेतली नाही व कार्य केले नाही, ही त्याची भूमिका होती.

त्यातच सुनिल दिघेने आपल्या नेहमीच्या स्वभावाला अनुसरून गटबाजीचे राजकारण खेळायला सुरुवात केली होती. नामदेव जास्त पॉवरफुल होऊ नये म्हणून त्याने इतर पुढाऱ्याना हाताशी धरायला सुरुवात केली. त्याचा नामदेवला राग येऊन त्याला नामदेवने पँथरमधून काढून टाकायला लावले; पण त्याला काढल्यामुळे नामदेव राजाच्या हल्ल्यापुढे एकटा पडू लागला.

त्याच सुमारास पुण्याला एक इंदिरा गांधीची सभा उधळून आम्ही (नामदेव, संगारे इ. मंडळीसह) मुंबईला परतलो होतो. वडाळ्याच्या आंबेडकर कॉलेजच्या हॉस्टेलवर राजाचा मुक्काम असे. राजा सभा उधळण्याच्या कार्यक्रमाविरुद्ध होता. त्याचे आणि नामदेवचे त्या दिवशी बरेच वाजले. आपल्या उपरोधिक आणि टिंगलबाजीच्या भाषेने राजाने नामदेवला बरेच डिवचले. तेव्हापासून फूट उघड झाली!

## पहिली फाटाफूट

अशा रीतीने नुकतीच उभारीला येऊ घातलेली पँथर चळवळीतली पहिली मोठी फूट पडली. कारण राजा ढाले व नामदेव ढसाळ हे पँथरचे दोन मुख्य पुढारी होते.

'रिपब्लिकन' मासमध्ये म्हणजे दलितचळवळीत ही प्रवृत्ती पहिल्यापासून भिनली होती. काही जमवण्याआधी आणि घडण्याआधी तुझे की माझे, तू तू–मी मी सुरू होते. बहुधा ह्या फुटी विचारांवर कमी तर व्यक्तिमत्त्वावर जास्त अशा आधारलेल्या असतात. राजा व नामदेवमधील फूट अकाली झालेली सकारण फूट होती. दोघाच्या विचारात जरूर तफावत असली तरी त्यांच्यात अॅडजस्टमेंट होण्यास वाव होता. राजाच्या घाईमुळे संघटना विनाकारण फुटली. देशभर पँथरच्या उभारणीला वाव होता. ती चळवळ म्हणूनच अस्तित्वात होती. एक राजकीय संघटना म्हणून नव्हती. त्यामुळे दोन वेगवेगळे जमाव दोघाच्या पाठीमागे गेले आणि प्रत्येक फुटीत होते ती गोष्ट घडली. राजकीय फुटीत एक न्यूट्रल मास निष्क्रिय बनला. अनेक कार्यकर्ते नर्व्हस होऊन घरी बसले!

राजाने आपला मास मुव्हमेंटच्या नावाखाली वेगळा संसार थाटला. या नावात राजाची कॅरेक्टर लपलेली आहे. एक लीडर आणि त्याच्या मागे मास त्याची चळवळ. भाई संगारे याने हळूहळू आपल्या वेगळ्या सवत्या सुभ्याला सुरुवात केली आणि सहा-एक महिन्यात मास मुव्हमेंट व दोन दलित पँथर्स अस्तित्वात आल्या. नामदेवचा सुरुवातीला मुंबई–पुणे भागात जोर होता. पुण्यात त्याच्या संघटनेने बराच काळ जोर धरला आणि १९८२ पर्यंत ती टिकून राहिली. मुंबईत मात्र भाई संगारेने हळूहळू नामदेवला खिंडार पाडले.

याला प्रमुख कारण म्हणजे नामदेवचे वैवाहिक जीवन. ७४ साली नामदेव जोरात असताना त्याचे लग्न झाले. अमरशेखची कनिष्ठ कन्या मलिकाशी. ह्या लग्नाला काही अंशी मी जबाबदार होतो. ओरिजिनल कल्पना माझी. चळवळीतल्या माणसाची

**बहुधा या फुटी विचारांवर कमी तर व्यक्तिमत्त्वांवर अधिक**

मुलगी; चळवळीतल्या, माणसाबरोबर तिचे चांगले जमेल; ती त्याला पूरक ठरेल आणि त्याच्या कार्याला आणि जीवनाला आधार ठरेल असे वाटले होते; परंतु आम्ही मलिकाच्या वैचारिक पिंडाचा नीट विचार केला नव्हता. तिनेही फारसा केला नव्हता. सोळा वर्षांची पोरगी, तो कितीसा करणार? अनिल बर्वे आणि मी दोघांनीही वर्ष–दोन वर्षे थांबण्याचा सल्ला दिला. नामदेव घाईला आला होता. इतका की रजिस्टर सिविल मॅरेजची महिन्याची नोटीस देण्यासही तो थांबायला तयार नव्हता शेवटी अगदी घिसाडघाईने एकमेकांस हार घालून लग्न उरकण्यात आले !

मलिका वयाने कोवळी, तब्येतीने नाजूक आणि विचाराने अद्याप पुरती फॉर्म न झालेली. लग्नानंतर तिची स्वतःची भूमिका व विचार स्पष्ट होऊ लागले. अमरशेखच्या आयुष्यातील उत्तरार्धात, समृद्ध काळात ती जन्मली, वाढली, खूप रिच आयुष्य भोगलेली. तिला स्थैर्याची सवय होती. उच्च राहणीमानाची देखील आपल्या आईचे सुरुवातीला हाल झाले. तिला अस्थिर आयुष्य जगावे लागले हे दोन्ही बहिणींना, प्रेरणा व मलिका यांना चागले माहीत होते. याउलट नामदेवचा स्वभाव. चळवळ म्हणजे आयुष्य आणि घरीदारी चळवळ. घरात कायम कार्यकर्ते पडलेले मलिकाचे खाजगी जीवन नाहीसे झाले. कोणतीही बाई हे फार काळ सहन करणे कठीण होते– तसला पिंड नसताना. तिला स्वतःचे वेगळे अस्तित्व; करिअर करायची होती तिचे आणि नामदेवचे खटके उडू लागले. वेगळे राहण्यापर्यंत मजल गेली. त्यात मूल झालेले; पण दोघे एकमेकाला सोडूही शकत नव्हते. ह्या सर्व गोष्टीचा आणि नंतरच्या त्याच्या तडजोडीचा नामदेववर आणि दलित पँथरवर फार दूरगामी परिणाम झाला.

कार्यकर्ते त्यांना मिळालेल्या वागणुकीमुळे नामदेवच्या घरापासून तुटू लागले. त्याचा फायदा भाई संगारेला मिळाला. भाई संगारे तसा फारशी डीप वैचारिक बेस नसलेला पुढारी. स्थानिक लेव्हलवर तो तसा इफेक्टिव होता आणि नामदेवसारखा तो अफाट जगणारा नव्हता. नामदेवचे सर्वच प्रचंड प्रमाणावर, मोगली फौजासारखे चालायचे. पाच–सात कार्यकर्त्यांच्या लवाजम्याशिवाय त्याची हालचाल नसे. त्यामुळे खर्चालाही सुमार राहात नव्हता आणि नामदेवही तसा लहानपणापासून लाडात वाढलेला. वडील मटन बीफ मार्केटात काम करीत. नामदेव एकुलता एक. रोज सकाळ–संध्याकाळ बीफ, खिमा मिळे. त्याशिवाय दहाएक रुपये खर्चायला. त्या काळात दहा रुपये म्हणजे छोटी रक्कम नव्हती. शिवाय मध्यमवर्गीय मित्रपरिवार भरपूर. साधारण सुस्थितीतील मित्र नामदेवला पैसा पुरवीत. आजचे बघायचे आज व उद्याचे उद्या, हा त्यांचा खाक्या. त्यामुळे पैशाचा कायमचा प्रश्न असायचा आणि एवढ्या हालचालींना तो पुरत नसे, मग उरायची सोयच नव्हती.

हळूहळू म्हणजे १९८० सालापर्यंत मुंबईत नामदेवची पँथर संपुष्टात येत होती. काही विभाग त्याच्याकडे होते, काही भाई संगारेकडे.

त्यातच १९७६ पासून रामदास आठवलेने वेगळे काम करायला सुरुवात केली. रामदास सुरुवातीला राजा ढालेचा असिस्टंट होता. अगदी पर्सनल. नतर तो वेगळा झाला. भलताच चिवट कार्यकर्ता. त्याने हळूहळू मुबईत जम बसवला. नंतर त्याला औरंगाबादचा गगाधर गाडे भेटला. गंगाधरचा औरंगाबादेत जवळजवळ सवता सुभा होता. त्यांना अरुण काबळे हा इंटलेक्च्युअल भेटला आणि भारतीय दलित पँथरची स्थापना होऊन ती वाढीस लागली. फारशी वैचारिक बेस नसलेल्या ह्या पँथरने लौकरच जोम पकडला. मुबईत त्याच्या अनेक वेगळ्या छावण्या झाल्या. प्रथम लोकाची कामे करून देत राहणे एवढाच त्यांचा प्रयत्न होता. नंतर वेगवेगळ्या आर्थिक योजना राबवून आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी आयुष्यात सेटल करण्यास सुरुवात केली. कोणाची ट्रक, कोणाचा मॅटॅडोर, कोणाचा धंदा अशा रीतीने शेकडो कार्यकर्ते सेटल झाले. त्यामुळे त्याचा आर्थिक पाया मजबूत होता.

पुण्यात नामदेवची पँथर जोरात राहिली. त्यात जयदेव गायकवाड आणि एल. डी. भोसले यांच्या प्रयत्नाचा मोठा वाटा होता.

१९८१ साली पँथरच्या एकीकरणाचा जोराचा प्रयत्न झाला. भाई संगारे आणि अविनाश महातेकर यांच्याबरोबर बोलणी सुरू झाली. मुंबईत दादरला किंग जॉर्ज शाळेच्या हॉलवर अधिवेशन भरवले गेले. मधल्या काळात भारतीय दलित पँथरजवळ गेलेला पुण्याचा अनिल काबळेही अधिवेशनाला हजर होता. ठरावावर ठराव पास झाले; पण कमिटी व पदे ठरवताना हॉलच्या मागच्या खोलीत झालेल्या वेगळ्या बैठकीत ही एकी टिकणार नाही हे स्पष्ट दिसत होते. भाई संगारेचे म्हणणे मी मुंबईत जोरात असून मला कमिटीवर जास्त पदे व मेम्बर्स द्यायला हवे होते. थोडक्यात म्हणायचे म्हणजे हॉलबाहेर पडल्यावर एकी संपली !

नामदेवचे एक आहे. संघटनेला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तो काही तरी कार्यक्रम टाकत असतो. मग तो कितीही जुजबी असो. त्या निमित्ताने कार्यकर्ते बिझी राहतात. कामाठीपुऱ्यात शेतकरीपरिषद असो किंवा खेडमंचरला शेतकरीमेळावा असो, सगळीकडे तेच ते शहरी कार्यकर्ते मनोभावाने हजर असतात. संघटनेचा दैनंदिन कार्यक्रम तसा अनिश्चितच असतो. अत्याचाराविरुद्ध लढणे हे ध्येय असणारी संघटना बारा महिने अठरा काळ बिझी राहू शकत नाही. महात्मा फुले विकास महामंडळाकडून दलितांना कर्ज मिळवून देणे आणि स्थानिक लेव्हलवर झोपडपट्टी व इतर प्रश्नांवर कार्यक्रम घेत राहणे यापलीकडे विधायक कार्यक्रम संघटना फारशी करीत नाही.

## दहावा वर्धापनदिन

१९८२ चा दलितपँथरचा दहावा वर्धापनदिन हा पँथरच्या वाटचालीतला टर्निंग पॉइंट ठरला. नामदेवने सर्वपक्षीय पुढाऱ्यांना पाचारण केले. त्यात प्रकाश आंबेडकर (बाबासाहेबांचे नातू) याना बोलावण्याचे प्रयोजन समजले नाही. प्रकाशने पुण्याच्या लेव्हलवर एल. डी. भोसले व जयदेव गायकवाडशी संपर्क साधण्यास सुरुवात केली होती. एल. डी. भोसले गेले कित्येक वर्षे महाराष्ट्र पँथरचा अध्यक्ष. जयदेव सेक्रेटरी आणि इंटलेक्च्युअल. दोघांना मला वाटते प्रकाशकडून अगोदर फीलर्स आले होते फुटून पँथरबाहेर पडण्यासाठी. नक्की सांगता येत नाही. ते दोघेही तसे नामदेवच्या आजारपणानंतर वैतागलेले होते. नामदेवला

१९८१ त मायस्पिनिया ग्रॅविसचा प्रचंड अॅटॅक येऊन गेला होता. त्या रोगात सर्व नर्व्हस् निष्क्रिय पडू लागतात आणि त्याचा शरिरावर पॅरालिसिससारखा परिणाम होत जातो. या आजारात नामदेवचे ऑपरेशनही झाले. पार त्याच्या जिवावर बेतले होते. प्रचंड खर्च झाला. मुख्यमंत्रीनिधीपासून सहानुभूतिदारापर्यंत सर्वांकडून पैसे आले. पुण्याहून एल. डी. आणि जयदेवनी बरेच पैसे ऑर्गनाईझ केले. ते संघटनेच्या ताकदीबाहेरचे होते. आजारानतर नामदेवने एक–दोन विपरीत राजकीय भूमिका घेतल्या. भाजपला पाठिंबा, रा. स्व. सघ ही सास्कृतिक सघटना आहे इ. इत्यादी. त्यामुळे बरेच कार्यकर्ते नाराज होते. नतर पाठिंबा काढून घेण्यात आला. तसे पाहायला गेले तर भा. ज. प. आणि रा. स्व. सघ हे दलित पँथरचे मुख्य शत्रू. त्यामुळे नाराजी जास्त होती.

९ जुलै १९८२ ला प्रकाश आबेडकरने 'पँथरची गरज नाही. तिचे कार्य संपले असून ती विसर्जित करावी' अशा आशयाचे वक्तव्य नेहरू मेमोरिअल हॉलच्या स्टेजवरून केले. एल. डी. भोसलेनी त्याला साथ दिली. तिथेच पँथरच्या दुसऱ्या फुटीस सुरुवात झाली. नामदेवला एल. डी. व जयदेवमधील बदल जाणवला होता. त्याने एल. डी. च्या राजीनाम्याची मागणी केली. त्याला एल. डी. ला काढून जयदेव गायकवाडशी तडजोड करायची होती. जयदेवची त्याला तयारी नव्हती.

पुढील वर्ष–सहा महिन्यांत एल. डी. भोसले व जयदेव गायकवाड दलित पँथरमधून बाहेर पडले. त्यानी तसे जाहीर केले नाही; पण त्यांनी प्रकाश आबेडकरबरोबर काम करायला सुरुवात केली. १९८३ साली बाबासाहेबाच्या पुण्यतिथीला त्यांनी आपण नवीन रिपब्लिकन पक्षात प्रवेश करीत असल्याचे जाहीर केले.

नवीन रिपब्लिकन पक्ष व दलित पँथर यांच्यात भूमिकावाईज कोणतेही साधर्म्य नाही. एक लिबरल लोकशाही पक्ष म्हणून ( जुना रिपब्लिकनपक्ष ) नांदला. त्याहून ह्या नवीन पक्षाची भूमिका वेगळी नाही. जयदेव व एल. डी. भोसलेंनी पक्षांतर करून काय साधले व पक्षातर करताना कोणता विचार केला हे लक्षात येत नाही. बाबासाहेबाचा नातू व त्याच्याशी सहकार्य करू, यापलीकडे त्याच्या बोलण्यात व वागण्यात फारसे काही दृष्टीस आले नाही.

परंतु एल. डी. भोसले व जयदेव गायकवाड पुण्यातील पँथरचे प्रमुख पुढारी. त्याच्या पक्षांतरामुळे पुण्यातील पँथरचे अनेक कार्यकर्ते निष्क्रिय बनले. त्या दोघाबरोबर फारशा कार्यकर्त्यांनी पक्षांतर केले नसले तरीही दलित पँथरची पुण्यातील ताकद या घटनेमुळे बरीचशी खच्ची झाली !

अशा या बॅकग्राउंडवर दलित पँथरचा बारावा वर्धापनदिन नुकताच साजरा झाला!

दलितचळवळीला दलित पँथरच्या उद्रेकाची, चळवळीची नितात गरज होती हे निःसशय. जुने रिपब्लिकन पुढारीपण केव्हाच खच्ची झाले होते. समाजाला ते आत्मविश्वास व धाडसी पुरोगामी नेतृत्व देऊ शकत नव्हते, ते पँथरने दिले. सत्तरचे दशक पँथरने गाजवले आणि त्यानतर तिला ओहोटी लागली !

### उद्रेकी स्वरूप

दलित पँथरकडे एक राजकीय पक्ष म्हणून पाहणे म्हणजे त्याच्याविषयी गैरसमज करून घेण्यासारखे आहे. ती एक कवीच्या स्फूर्तीवर चाललेली *स्वाभिमानी उद्रेकी चळवळच आहे.* एका संपूर्ण पिढीला त्या चळवळीने समाजात मान ताठ करून चालायला शिकवले. स्वत:च्या ताकदीची जाणीव दिली. रूलिंग क्लास व कास्टसमोर ताटाखालचे माजर बनून राहणे योग्य नाही हे त्या चळवळीने दलिताना शिकवले. ती एक सर्वांगीण सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जागृतीची चळवळ होती. तिने दलितसमाजाला दिलेला वारसा निदान महाराष्ट्रात तरी नाकारता येणार नाही.

१९७२–७६ ह्या काळातील सत्तर टक्के दलित पँथर्स हे कवी होते. त्यापैकी नामदेव ढसाळ हे चळवळीचं निश्चितच स्फूर्तिस्थान होते. कवी म्हणून अर्वाचीन काळात नामदेवला तोड नाही ! मराठी भाषेला व कवितेला त्याने एका संपूर्ण नव्या रस्त्यावर नेले. कवीही राजकारण खेळू शकतात. कविताही राजकारण व सामाजिक ब्रह्म हा आपला विषय ठेवू शकते, हे नामदेवने सिद्ध करून दाखवले. नामदेव हा आपल्या समकालीनात त्यामुळे हेड अॅण्ड टॉलर आहे. एक प्रोटिअन ( जबरदस्त ) कलावंत म्हणून त्याने आपले स्थान मराठी साहित्यात कायम केले आहे.

नामदेव तसा पिंडाने राजकारणी नाही. कवी म्हणूनच तो अधिक मोठा आहे. राजकीय पक्ष स्थापन करणे आणि एक संघटकाची भूमिका बजावत राहणे हे त्याच्या स्वभावात नाही. एका चळवळीचा प्रणेता म्हणून त्याने आपल्या आयुष्यातील एक महान कामगिरी बजावण्याचा प्रयत्न केला आहे. स्वभावात नसताही.

तर मग नामदेवचा स्वभाव कसा हे थोडेफार समजून घेणे आवश्यक आहे. तसाच दलित पँथरच्या इतर पुढाऱ्यांचाही.

नामदेवचा अन् माझा ७४–७५ सालात फार जवळून सबंध आला. कारण अनिल बर्वेने मला दलित पँथरच्या चळवळीत ओढल्यापासून मी माझ्या स्वभावधर्मानुसार पँथर्समध्ये गुतत गेलो. अनिलच्या मते ( त्या काळच्या ) पँथर्सची चळवळ ही आधुनिक क्रातिकारक चळवळीचे बीज होते.

जानेवारी १९७४ मध्ये अनिल जेव्हा *माझ्या घरी एका सकाळी धावत आला तेव्हा* त्याचे उद्‌गार पुढील प्रकारचे :

" जया, उठ, काळा कोट चढव ! अरे, एक नवीन क्रांतिकारक फोर्स उभा राहिला आहे दलित पँथरच्या स्वरूपात. त्याला योग्य वळण देण्याची आवश्यकता आहे. तू त्याच्यात वकील म्हणून दाखल हो ! काल त्यांना पकडून भोईवाडा लॉकपमध्ये बद केलंय. तू त्याना जामिनावर बाहेर काढ. त्यांच्यावर भरपूर केसेस आहेत. त्यानिमित्ताने तुझा त्यांच्याशी जवळचा संबंध येईल. ते तुझं ऐकू लागतील. मग बाकीचं काम सोपं आहे ! "

अनिल त्या काळी अतिशय सिम्प्लिस्टिक विचार करणारा माणूस होता नक्षलवादी खटल्यात दोन वर्षे तुरुगात राहून आल्या-

**भा. ज. प. आणि रा. स्व. संघ हे तर दलित पँथरचे मुख्य शत्रू !**

नंतर आणि नक्षलवाद्यांना अगदी जवळून बघितल्यानंतर त्याचा क्रांतिकारक म्हणून त्यांच्याविषयी भ्रमनिरास झाला होता. त्यानंतर अमरशेखच्या ज्येष्ठ कन्येशी-प्रेरणेशी—माझ्याच प्रेरणेपोटी लग्न करून त्याने स्वत:चा ससार जेकबसर्कलला अमरशेखच्या घरी थाटला होता. क्रांतीची खाज मिटली नव्हती, लेखक, पत्रकार आणि नाटककार म्हणून तो गाजत असला तरी त्याच्या मनातली धग अजून शांत झाली नव्हती !

मी भारतीय काय परंतु जागतिक कम्युनिस्ट चळवळीच्या भवितव्याविषयी एव्हाना (म्हणजे ७४ पर्यंत) साशंक झालो होतो. माझा मार्क्सवादावर नवीन कॉन्ट्रिब्युशन करून त्यात आमूलाग्र बदल घडवून आणण्याविषयी अभ्यास चालला होता. मला प्रॅक्टिकल फील्डमध्ये पडण्याची इच्छा नसतानाही मी अनिलच्या आग्रहास्तव पँथर्ससाठी फील्डमध्ये उतरलो.

जामीन झाले. लॉकपमध्ये नामदेव व राजा भेटले. भाई संगारेही भेटला, ही पँथरचळवळीतील तीन प्रमुख नोटेबल व्यक्तिमत्त्व!

## तीन व्यक्तिमत्त्वे

*नामदेव* काळासावळा, उंचापुरा, ५ फूट ८-९ इंच आणि सडपातळ. अतिशय एक्स्प्रेसिव चेहरा व डोळे. सतत हसणारा, सतत कशाचा तरी नवीन प्रकारे शोध घेण्यात दंग. चाल राजपुत्राच्या थाटाची. मी कोणी तरी आहे, या जगाचा खरा नाकारलेला मालक आहे, माझ्या पायाखालची धरती ही मूळची माझीच आहे, जरी आज ती मला नाकारली जात असेल तरी, या वृत्तीची.

राजा खरा डाउन टू अर्थ. अर्थली माणूस. या मातीचा, जगाचा, व्यवहाराचा. बुटका आणि सर्व बुटक्याचा आत्मविश्वास स्वत:कडे राखून असलेला आणि अतिशय बेमुर्वतखोर! सतत समोरच्याशी मतभेदापोटी टक्कर घ्यायला तयार. मिस्किल डोळे व चेहरा. प्रसंगी रागीट. हातातल्या वेड्यांचं त्याला काहीच वाटत नव्हतं !

भाई संगारे तसा दिसायला सॉफ्ट माणूस. चांगले नाकडोळे, मध्यम उंची आणि बॉर्न लीडर. जन्मजात पुढारी; पण सॉफ्टनेस चेहऱ्यापुरता मर्यादित. त्याचे सामाजिक राजकीय व्यक्तिमत्त्व अतिशय मिलिटंट होते.

ह्या तिघांनी खरी पँथरचळवळ घडवली आणि अक्षरश: आपल्या व्यक्तिमत्त्वाने घडवली. ती नवीन दलित आशाकांक्षाचे मूर्तिमंत रूप होती.

जामीन झाले. केसेसना तारखा पडू लागल्या. तिघाचे खूप कोड—कौतुक होत होते. तिघातही जबरदस्त पर्सनल मॅग्नेटिझम. तो पाहून मी स्वत:विषयी थोडा खजिल झालो. चळवळीत आठ—दहा वर्षे काम करून मला माझ्यात बिलकुल पर्सनल मॅग्नेटिझम नाही हे जाणवले होते. थोडीशी असूयाही जाणवली.

पण हे तात्कालिक आपला जबरदस्त हिस्टॉरिकल रोल पँथरच्या संदर्भात खेळण्यासाठी मी अनिलच्या आग्रहास्तव बाहेर पडलो होतो आणि पुढील वर्षभरात हा रोल मी बजावण्याचा खूप प्रयत्न केला.

नामदेव, भाई संगारे घरी येत. कायम हिंडणारे. खाण्या-पिण्याचा ठिकाणा नाहीच. बरोबर आठ-आठ दहा-दहा कार्यकर्ते घेऊन असत. मग माझी बायको त्याना जेवायचा आग्रह करी. मंडळी रेडी असत. हॉटेलापेक्षा घर बरे! मग कधी माझ्या पैशानी तर कधी त्यांच्या मटण, मासे. अंड्याची जेवणं होत. आंघोळ करायसाठी पाणी तापवण्याच्या भांड्यात बिर्याण्या होत. शेवटी नीलाला-माझ्या बायकोला —खायला काही उरत नसे. कधीकधी मग मागून ती पिठल—भात करून खाई.

दलितचळवळीशी संबंधित ही आमची तिसरी पिढी. आमचे आजोबा मावळातले उरोड—आंबेगावचे सरदार आंबेगावकर. इंजिनिअर म्हणून त्यांनी मुळशीधरण बांधण्यात काम केलं होतं. मावळात आले की बाबासाहेब कायम आमच्या आजोबाकडे उतरत असत. मग आमची मोठी मावशी त्यांना त्यांच्या आवडीचे सी. के. पी. प्रतीचे मटणवडे करून खायला घालत असे.

माझ्या वडिलाची आर. डी. भंडाऱ्याशी व रिपब्लिकन कार्यकर्त्यांशी बऱ्यापैकी घसट होती. सर्व मंडळीचे आमच्या घरी येणेजाणे असे.

त्या सर्व संपर्कातून मला तिघाही पँथर पुढाऱ्याचा स्वभाव स्पष्ट माहीत झाला. त्यापैकी खरा राजकारणी कोणीच नाही हेही समजले; पण तिघेही जातिवत पुढारी वाटले

नामदेवबरोबर मी खूप फिरलो. गाडीत तो त्याच्या कविता ऐकवी. नवीन उत्स्फूर्त कविता बोलून दाखवी. त्याच्याइतका कवी मी जन्मात पाहिला नाही. त्याच्या 'गोलपिठा'वर तर मी वेडा झालो होतो. ओळीच्या ओळी माझ्या जिभेवर होत्या.

या सर्वावरून मी माझी वरील विधानं केली आहेत. इतक्या जवळिकीनंतर आजही माझी नामदेवशी, भाई संगारेशी दोस्ती कायम आहे राजा माझा मित्र झाला नसला तरी आम्ही बरेच ओळखतो एकमेकांना.

दलित तरुणांतले कार्यकर्ते अचाट आणि अफाट होते. प्रत्येकाला व्यक्तिमत्त्व होते जे उच्च वर्गीयात आणि वर्णीयांत फार क्वचितच आढळतं. मी महाराष्ट्रभर दोन्ही पँथर्संच्या हजारो कार्यकर्त्यांना ओळखतो. त्या सर्वांना नीट संघटित आणि एज्युकेट केलं गेलं असतं तर एक वेगळंच चित्र उभं राहलं असतं. पुढारीपणाचं अतिस्तोम आणि नामांतरादि भावनिक इश्यूजवर ताकद खर्च केली गेली नसती तर आणि फाटाफूट झाली नसती तर ही चळवळ कोणत्या थराला आणि शक्तीला पोचली असती हे सांगण कठीण आहे !

अर्थात प्रेशर पॉलिटिक्स खेळण्याची आवश्यकता, सरकारी धाकदपटशा, केसेस, त्याही फौजदारी, करप्शन—वैयक्तिक विशेषत:, त्यामुळे हे शक्य झाल नाही.

पण सांगा कोणती डावी चळवळ आज टिकून आहे? कम्युनिस्टपार्टीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. समाजवाद्यांची तर हाडही शोधून सापडणार नाहीत ! इव्हन उजव्या चळवळींना इंदिरेने धुळीस मिळवलं आहे. अशा या जबरदस्त मोनॉपोली कॅपिटॅलिझमच्या शक्तिशाली भांडवलशाही समाजात पँथरचं जे काही टिकून आहे ते खूपच आहे असं मला वाटतं.

## ७४ ते ८४

वर्धापनदिन साजरा झाला. त्यात केशव मेश्राम यांनी अध्यक्षपद भूषवलं. ते सयुक्तिकच होतं. एक कलावंत साहित्यिक म्हणून मेश्राम यांचं कॉन्ट्रिब्युशन जगजाहीर आहे मराठी व दलित वाङ्मयाला.

सर्वांत नोटेबल नामदेवचं भाषण. त्याच पुण्याच्या नेहरू मेमोरियलमध्ये प्रकाश आंबेडकरने नामदेवच्या पाठीत सुरी खुपसली होती दहाव्या वर्धापनदिनी. 'मी प्रकाशला जमीनमुक्तीसंदर्भात व्यासपीठावर बोलावलं आणि त्यानं पँथर डिझॉल्व्ह करावी, तिची आवश्यकता संपली आहे असं वक्तव्य केलं याला काय म्हणावं?' नामदेवचा सवाल.

नामदेवसारखं भाषण फार कमी पुढारी करू शकतात. अत्यंत उत्स्फूर्त, झंझावाती, शिवराळ पण मुद्देसूद.

मेळावा संपल्यानंतर मी नामदेवला भेटतो. सलामदुवा होते.

'नामदेव, माणूसमध्ये ह्या सोहळ्याच्या निमित्ताने पँथरवर कव्हरस्टोरी लिहितोय. काय लिहू?' मी.

'मी काय सांगू? तू लेखक आहेस. तुझ्या मनात असेल ते लिहिणार; पण एक गोष्ट सांग. मी माझ्या भाषणात जिच्यावर जास्त भर दिला ती.' –नामदेव म्हणतो.

'कोणती? पुन्हा एकदा ऐकू दे.'

'दलित आणि सवर्ण यांनी एकमेकाला समजून घेऊन जवळीक साधून वर्णभेद मिटविल्याशिवाय वर्गसंघर्ष शक्य नाही. तो करायचा असेल तर ही सांस्कृतिक क्रांती साधायलाच पाहिजे!'

१९७४. नामदेवने बराच प्रवास केला आहे.

□

---

लाखो क्रीडाशौकिनांची प्रतीक्षा

# लॉस एंजलिस ऑलिंपिक

## नवनवीन विक्रमांचे मानकरी कोण असतील?

सीमा कुलकर्णी

---

ऑलिंपिक–दर चार वर्षांनी होणारा क्रीडाक्षेत्रातील सर्वांत मोठा सोहोळा; पण लागोपाठ दुसऱ्यांदा या सोहोळ्याला बहिष्काराचे गालबोट लागतेय. ८० च्या मॉस्को ऑलिंपिकवर अमेरिकेने बहिष्कार टाकला होता आणि यंदाच्या लॉस एंजलिस ऑलिंपिकमध्ये आपण भाग घेणार नाही असं रशियानं जाहीर केलंय. ऑलिंपिक–चळवळ हजारो वर्षांपूर्वी सुरू झाली ती ग्रीक राज्यांमधल्या युद्धांना आळा बसावा, क्रीडास्पर्धांतून निरोगी स्पर्धाची भावना निर्माण व्हावी म्हणून; पण आधुनिक ऑलिंपिकमध्ये मात्र हा हेतू बहिष्काराच्या या वापरामुळे पूर्णपणे नामशेष होणार की काय अशी भीती निर्माण झालीय.

अर्थात बहिष्कार आधुनिक ऑलिंपिकला नवीन नाही. यापूर्वीही एखाद्या गोष्टीच्या विरोधात हे तंत्र वापरण्यात आलेलं आहे. उदाहरणच द्यायचं तर १९५२ व ५६ साली अनुक्रमे तैवान व चीन एकमेकांच्या विरोधात स्पर्धेबाहेर पडले होते. वंशभेदाचा पुरस्कार करणाऱ्या द. आफ्रिकेवर इतर राष्ट्रांनी जवळजवळ बहिष्कार टाकला आहे. तरीही त्यांच्या पैशाच्या आमिषाला भुलून काही आंतरराष्ट्रीय संघ वा खेळाडू त्या देशाच्या दौऱ्यावर जातातच. न्यूझीलंडने असाच आपला रग्बी संघ द. आफ्रिकेच्या दौऱ्यावर पाठवला. त्याच्या निषेधार्थ १९७६ च्या ऑलिंपिकमधून आफ्रिकी देशांनी आपले अंग काढून घेतले होते; पण या साऱ्या बहिष्कारांपेक्षाही मागच्या वेळेस अमेरिका व आता रशियाने टाकलेल्या बहिष्काराचं स्वरूप अधिक गंभीर आहे. अमेरिका व रशिया या दोन महासत्तांतील वाढती घातुक स्पर्धा आता खेळीच्या मैदानापर्यंत येऊन पोचली आहे असा याचा अर्थ होतो

रशियाच्या अफगाणिस्थानातील हस्तक्षेप.चा निषेध म्हणून अमेरिकेने मॉस्को ऑलिंपिकवर बहिष्कार टाकला होता. अर्थात आताचा रशियाचा निर्णय म्हणजे केवळ त्याला प्रत्युत्तर असं मात्र म्हणता येत नाही. ते त्याचं फक्त एक कारण असू शकेल. रशियाने बहिष्कार का टाकला हे सांगताना खेळाडूंची सुरक्षितता धोक्यात असल्याचं निमित्त पुढं केलं आहे. यात कितपत तथ्य आहे? तर अमेरिकेतली आणि त्यातही लॉस एंजलिसमधली सुव्यवस्था गेल्या काही वर्षांत अधिकाधिक बिघडत आहे हे सत्यच आहे. ऑलिंपिक काहीही गैरप्रकार न घडता पार पडेल अशी हमी द्यायला तिथले पोलिसही तयार नाहीत; पण असं असूनही अमेरिकेच्या सुरक्षा–व्यवस्थेवर विसंबून इतर देश आपल्या खेळाडूंना तिथं पाठवत असताना रशियानेच का माघार घ्यावी? अमेरिकेत कट्टर रशियाविरोधी अशा काही संघटना आहेत. त्यांच्या प्रचाराला बळी पडून आपले काही खेळाडू 'लोखंडी पडदा' फाडून अमेरिकेचं मुक्त जीवन जगण्यासाठी देशांतर करतील अशी भीती रशियाला वाटते. ही भीती अगदीच खोटी आहे असं म्हणता येत नाही. त्याशिवाय गेल्या ४ वर्षांत रेगन सत्तेवर आल्यापासून त्यांनी रशियाविरोधी जी भूमिका घेतली आहे त्याबद्दल

त्यांना धडा शिकवण्यासाठीही हा निर्णय रशियाने घेतला असावा असं मानायला भरपूर जागा आहे. अमेरिकेनेही रशियन खेळाडूंना स्पर्धेसाठी अमेरिकेचा व्हिसा घ्यायला लागेल (ऑलिंपिक सनदेत तसा उल्लेख नाही) असे सांगून, त्यांच्या ऑलिंपिक चिटणिसाला हरकत घेऊन आगीत तेलच ओतले. परिणामी रशिया आणि पू. जर्मनी, क्यूबा इ. मित्र देशांनी स्पर्धेतून अंग काढून घेतले आणि राजकीय क्षेत्र व स्पर्धेपासून पूर्णपणे अलग रहावी अशी अपेक्षा असणारी ऑलिंपिक–चळवळ पुन्हा एकदा राजकीय हत्यार म्हणून वापरली गेली. आता तर ब्रिटनच्या द. आफ्रिकेशी असणाऱ्या संबंधांचा धिक्कार म्हणून आफ्रिकी देशही ऑलिंपिकमधून बाहेर पडणार अशी बातमी आहे.

## सर्वात महागडं ऑलिंपिक

अर्थात वरवर पाहिलं तर या सगळ्याचा लॉस एंजलिसवर काही परिणाम झालेला नाही. ऑलिंपिकची तयारी धूमधडाक्यात चालू आहे. उलट या वेळेस तर बहिष्कार जमेस धरूनही ऑलिंपिकमध्ये भाग घेणाऱ्या देशांची संख्या विक्रमी असेल (सुमारे १४१) असं सांगण्यात येत. लॉस एंजलिसला एकूण २१ खेळांच्या स्पर्धा होतील. त्यात हॉकी, बॉक्सिंग, जलतरण, इक्वेस्ट्रिअन इ. चा समावेश असेल. शिवाय टेनिस व अमेरिकेतील तुफान लोकप्रिय खेळ बेसबॉल यांचाही प्रदर्शनीय खेळ म्हणून सहभाग असेल. लॉस एंजलिस ऑलिंपिकचा खर्च अफाट आहे. आतापर्यंतच्या ऑलिंपिकमधलं हे सर्वात महागडं ऑलिंपिक असेल ! हा खर्च भरून निघण्यासाठी खाजगी संस्थांची मदत घ्यायचा प्रस्ताव आयोजकांपुढे होता. त्याला प्रचड प्रतिसाद मिळाला. ए. बी. सी. टी. व्ही. ने २२५ कोटी देऊन ऑलिंपिक टी. व्ही. वर दाखवायचे हक्क विकत घेतले. अर्थात याच्या कित्येक पटींत त्यांना ते परत मिळतील हा भाग वेगळा. मैदानाबाहेरच्या वस्तूंबरोबर, खेळासाठी लागणारे सामानही आदिदास, सुपर टर्फ इ. कंपन्यांनी पुरवले आहे. अर्थातच याचा त्यांना जाहिरातीसाठी बराच उपयोग होईल जपानची फूजी कंपनी ऑलिंपिकची अधिकृत छायाकार आहे तर कोका-कोला हे स्पर्धेचं अधिकृत पेय आहे. लॉस एंजलिसच्या व्यापाऱ्यांचं उखळ या काळात चांगलंच पांढरं होणार आहे. स्पर्धेसाठी हजारो प्रेक्षक येतील याचा अंदाज घेऊन रहाणे, खाणे, टेलिफोन इ. च्या किमती आत्ताच भरमसाट वाढवल्या आहेत.

या सऱ्यांवर बहिष्काराचा परिणाम किती होईल कुणास ठाऊक; पण खेळाडूंना मात्र हा बहिष्कार चांगलाच जाणवणार आहे. रशिया, पू. जर्मनी, हंगेरी या देशांचे खेळाडू नसतील तर ऑलिंपिकमधील स्पर्धा अतिशय मर्यादित होईल आणि अशा स्पर्धेत मिळवलेल्या पदकाने खेळाडूंना तरी काय समाधान मिळणार ? कारण तुल्यबळ प्रतिस्पर्धी असला तरच त्याच्यावर मात करण्यात मजा असते. त्यामुळे विक्रमाच्या बाबतीतही खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम व्हायची शक्यता आहे. रशिया आणि त्याच्या मित्रांच्या बहिष्काराने कोणकोणत्या खेळांच्या दर्जावर परिणाम होईल याचा सहज आढावा घेतला तरी दिसतं की, जवळजवळ सगळेच खेळ यामुळे प्रभावित होतील. कोमर, पिसारेन्को यासारखे उत्कृष्ट वेटलिफ्टर्स या वेळेस स्पर्धेत नसतील. मुष्टियुद्धात सर्वात जास्त उणीव भासणार आहे ती क्यूबाची. क्यूबाच्या मुष्टियोद्धयांनी आतापर्यंत ऑलिंपिकवर जे वर्चस्व गाजवले ते पाहता, या वेळी मुष्टियुद्धाच्या स्पर्धा नीरस होणार अशी चिन्हं दिसताहेत. ॲथलेटिक्समध्ये जागतिक विक्रम नोंदवलेली रशियन धावपटू स्वेतलाना उल्मासोव्हा, ४०० मी. हर्डल्समध्ये रशियाचीच ॲना ॲम्ब्रिझन, तसेच पू. जर्मनीच्या चपळ महिला-धावपटूंची उणीव नक्कीच भासेल. जिमनॅस्टिक्समध्येही रशियाची अनुपस्थिती बरीच जाणवणार आहे. जलतरणातही पू. जर्मन मुली नसल्याने अमेरिकेला तीव्र स्पर्धक फारसं कुणी उरलेलं नाही !

## काही ' ग्रेट ' खेळाडू

जगातल्या उत्तमोत्तम खेळाडूंतील स्पर्धा पाहून, डोळ्यांचं पारणं फिटायचं भाग्य लॉस एंजलिसला लाभणार नसलं तरी अगदीच स्थिती निराशाजनक आहे असं नाही. स्पर्धा कमी असली तरीही काही खेळात चांगली कामगिरी पाहायला प्रेक्षकांना मिळेलच. रशिया नसला तरी चीनच्या जिम्नॅस्टकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा बाळगता येते. प. जर्मनीचे जलतरणपटूही कदाचित काही



वंडरबॉय कार्ल लुइस

□

तरी चमत्कार करून दाखवतील. खरी स्पर्धा होईल ती हॉकीत. मागच्या ऑलिंपिकवर हॉकी खेळणाऱ्या बहुतेक देशांनी बहिष्कार टाकला होता. हे सगळजण (अर्थातच रशिया सोडून) आता खेळतील. त्यामुळे या स्पर्धेतली चुरसही वाढली आहे.

विरोधी स्पर्धक कसाही असो, कामगिरीवर त्याचा काहीही परिणाम न होणारे काही ' ग्रेट ' खेळाडूही लॉस एंजलिसात खेळतील. ते कोणते विक्रम करतात हे पाहण्यासारखं ठरेल. त्यातला एक म्हणजे कार्ल लुइस. अमेरिकेचा हा खेळाडू म्हणजे खरोखर एक आश्चर्य आहे. १००मी., २००मी., लांब उडी आणि ४००मी. रीले यात तो खेळेल. यापैकी पहिल्या तीन स्पर्धांत तो विश्वविक्रम मोडायची उमेद बाळगून आहे. ४०० मी. रीलेत खेळताना जागतिक विक्रम त्यानं कधीच मागं टाकलाय. कार्ल लुइस म्हणजे विजय असं समीकरणच आहे. त्यामुळं तो जिंकणार हे नक्कीच; पण विक्रमांचं त्याचं स्वप्नं पुरं होतंय का बघायचं अशीच खात्री देता येईल ती अमेरिकेच्याच ट्रेसी कॉलकिन्स या महिला जलतरणपटूबाबत. गेल्या ५ वर्षांत उच्चपातळीवर खेळून चक्क ४७ पदकांची लूट करताना तिनं जॉनी नेसमुल्लरचा विक्रमही मोडला आहे. मागच्या वेळेस अमेरिकेच्या




डेली थॉम्पसन

□

बहिष्कारामुळे सुवर्णपदक मिळवायची हुकलेली संधी या वेळेस मात्र ती साधणार हे नक्की. डेकॅथलॉनमध्ये ब्रिटनच्या डेली थॉम्पसनकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. सेबेस्टिअन कोवस्टीव्ह ओव्रेट हे जुने प्रतिस्पर्धीही इथं खेळतीलच. याशिवाय ऑलिंपिक गाजवतील अमेरिकेची मेरी डेकर आणि द. आफ्रिका सोडून इंग्लंडचं नागरिकत्व पत्करल्याने वादग्रस्त ठरलेली जोला बड. या दोघींची गाठ ३००० मी. च्या शर्यतीत पडेल. इथं सुवर्णपदकं कोण जिंकेल, याचा अंदाज करणं तसं धाडसाचंच ठरेल. याशिवाय या दोघी अनुक्रमे १५०० आणि २००० मी. मध्येही धावणार आहेत-

पण हे झालं परदेशी खेळाडूंबद्दल. भारताची स्थिती ऑलिंपिकमध्ये काय आहे ? स्वप्नरंजन न करता बोलायचं तर एक हॉकीशिवाय भारताला ऑलिंपिकमध्ये पदकांची फारशी आशा करता येईल अशी परिस्थिती आज नाही. कारण एकच.. योग्य मार्गदर्शनाची उणीव आणि ज्या देशात ऑलिंपिक दोन आठवड्यांवर आलं असतानाही स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंची अंतिम यादी जाहीर होत नाही आणि खेळाडूंची एक तुकडी स्पर्धेसाठी गेल्यावरही भारतीय



ट्रेसी कॉलकिन्स

□

पथकाचं नेतृत्व कोणी करायचे याचा घोळ संपत नाही त्या देशात खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळणार कसं ? पथकाबरोबर अधिकारी पाठवण्यात जी ढवळाढवळ करण्यात आली त्यामुळं मिल्खासिंगनी निवड-समितीचा राजीनामा दिला हे योग्यच केलं. राजकारण्यांनी खेळाच्या मैदानालाही आपल्या डावपेचांचा आखाडा बनवल्यावर कोणत्याही खऱ्या क्रीडाप्रेमीनं हेच केलं असतं.

भारतीय संघात बॉक्सर्स, ॲथलिट्स्, नेमबाज इ. चा समावेश आहे. पैकी नेमबाजी आणि मुख्यत: क्यूबाच्या बहिष्कारामुळे बॉक्सिंग यात चांगली कामगिरी करायची संधी आहे असं म्हटलं जात असलं तरी पदक मिळविण्यासाठी ती उपयोगी ठरेल असं नाही. ॲथलेटिक्समध्ये भारताचं आशास्थान म्हणजे पी. टी. उषा. तेही ४०० मी. हर्डल्समध्ये. उषा ही भारताची आजची सर्वोत्तम धावपटू असली तरी या स्पर्धेत अंतिम फेरीत जाण्याइतपत तिची मजल जाईल असं वाटतं. तिनं एखादं पदक मिळवलं तर तो एक गोड धक्काच ठरेल. महिलांच्या रीले संघाकडूनही चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

## आशा– हॉकीवरच

पण भारतीयांच्या खऱ्या आशा केंद्रित झाल्या आहेत त्या हॉकीवर. मॉस्कोत प्रमुख प्रतिस्पर्ध्यांच्या अनुपस्थितीत हॉकीसुवर्णपदक मिळवणारा भारत आता या सगळ्यांच्या उपस्थितीत ही करामत पुन्हा करतो का याकडे सगळ्या शौकिनांचे डोळे लागले आहेत. हे काम अवघड असले तरी अशक्य खासच नाही. कारण गेल्या १–२ वर्षांत भारताच्या खेळात खूपच सुधारणा झाली आहे. एक ऑस्ट्रेलिया सोडला तर सगळ्या संघांना त्यानं हरवलं आहे. त्यामुळे खेळाडूंचे मनोधैर्यही वाढले असणार. खेळाडूंची कामगिरी सुधारायचं कारण म्हणजे गेले काही दिवस बालकिशनसिंग ह्या एकाच शिक्षकाकडे प्रशिक्षणाची कामगिरी आहे. शिवाय ४+४+२ या नवीन पद्धतीने खेळण्याचाही खेळाडूंना फायदा झाला. स्पर्धेत भारताच्या गटात ऑस्ट्रेलिया, प. जर्मनी, स्पेन, मलेशिया हे संघ असले तरी उपांत्य फेरी गाठणे भारताला जड जाऊ नये. सुवर्णपदकांच्या सर्वांत जास्त आशा अर्थातच ऑस्ट्रेलियाला आहेत; पण तरीही आपल्या चांगल्या आक्रमणाद्वारे त्यांच्यावर दबाव ठेवला व अचूक नेमबाजी साधली तर भारत त्यांच्यावरही मात करू शकेल. कर्णधार झफर इक्बाल आणि महमद शहीद या प्रमुख फॉरवर्डसवर भारताची मोठी भिस्त आहे. त्यांचा एकमेकांशी मेळ कितपत जमतो यावर भारताच्या खूपशा आशा अवलंबून असतील. एशियाडमध्ये पाकिस्तानकडून सपाटून मार खाल्ल्यावर बरोबर दहाच दिवसांनी एसांडा हॉकीस्पर्धेत पाकवर डाव उलटवणारे भारतीय खेळाडू त्याच जिद्दीने खेळले तर सुवर्णपदक खिशात घालणे त्यांना कठीण नाही. तर असं आहे हे ऑलिंपिक. बहिष्काराने त्यातली रंगत कमी झाली असली तरी त्याबद्दलची उत्सुकता तिळमात्रही कमी झालेली नाही. २८ जुलैपासून लॉसएंजलिसनगरीत सुरू होणाऱ्या या स्पर्धेकडे नवनवीन विक्रमांच्या प्रभावी कामगिरीच्या आशेने लाखो क्रीडाशौकीन डोळे लावणारच आहेत !



लॉस एंजलिस ऑलिंपिक

# भारताची आशास्थाने

किरण गोखले

गेल्या ९ ऑलिंपिकमध्ये हॉकीतील ८ पदके (५ सुवर्ण) व १९५२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये खाशाबा जाधवने कुस्तीत कमावलेले कास्यपदक सोडले तर इतर सर्व क्रीडाप्रकारात स्वतंत्र भारताची कामगिरी निराशाजनकच राहिली आहे. १९७६ च्या मॉट्रिअल ऑलिंपिकमधून तर भारताला पदकाशिवायच परतावे लागले. लॉस एंजलिस ऑलिंपिकमध्ये भाग घेणारे ४९ खेळाडूंचे भारताचे पथक जेव्हा २८ जुलैला उद्‌घाटन-सोहळ्यातील संचलनात उतरेल तेव्हा भारत या ऑलिंपिकमध्ये किती पदके गाठीला बांधणार हाच प्रश्न भारतीय क्रीडारसिकाना सतावत राहील.

केवळ कुटुंब-नियोजनातच नव्हे तर ऑलिंपिक-पदकाबाबतही 'दो या तीन बस' हे भारताचे घोषवाक्य असल्याचे गमतीने म्हटले जाते. हॉकी, अॅथेलेटिक्स, कुस्ती, मुष्टियुद्ध, नेमबाजी, वेटलिफ्टिंग व यॉटिंग या सात क्रीडाप्रकारात भारतीय खेळाडू भाग घेणार असले तरी ऑलिंपिक–पदकाच्या भारताच्या साऱ्या आशा मुख्यत: हॉकी व अॅथलेटिक्स आणि कुस्ती या खेळांवरच केंद्रित झाल्या आहेत. रशिया व त्याच्या १३ मित्रराष्ट्रांनी, अमेरिकेच्या दोस्तराष्ट्रांनी मॉस्को ऑलिंपिकवर टाकलेल्या बहिष्काराला प्रत्युत्तर म्हणून लॉस एंजलिस खेळांवर बहिष्कार टाकला आहे. बहिष्कार टाकणाऱ्या राष्ट्रांतील दर्जेदार खेळाडूंच्या अनुपस्थितीचा फारसा फायदा मात्र भारतीय खेळाडूंना होणार नाही. कारण भारतीय खेळाडू व आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या दर्जातील प्रचंड तफावत!

हॉकी व कुस्ती हे दोन खेळ भारतात वर्षानुवर्षे खेळले जात आहेत व आतापर्यंतची सर्व ऑलिंपिक-पदकेही भारताने या खेळातच मिळविली असल्याने १९८४ च्या लॉस एंजलिस ऑलिंपिकमध्ये भारताने या दोन क्रीडाप्रकारात चमक दाखवावी अशीच क्रीडारसिकांची अपेक्षा आहे.

## हॉकी

१९८० च्या मॉस्को ऑलिंपिकमध्ये पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रेलिया, हॉलंड व पाकिस्तान या हॉकीतील बड्या राष्ट्रांच्या गैरहजेरीत आपण हॉकीचे सुवर्णपदक पटकावले खरे; पण त्यानतर मात्र दिल्लीतील आशियाई खेळात पाकिस्तानने अंतिम सामन्यात आपल्याला ७–१ असा न भूतो मार दिला!

या वेळी रशियाचा संघ स्पर्धेसाठी पात्र असूनही बहिष्कारामुळे खेळणार नाही; पण हॉकीतील सर्व बलाढ्य राष्ट्रांच्या उपस्थितीमुळे या वेळी हॉकीच्या सुवर्णपदकासाठी अटीतटीचा सामना होणार हे नक्की. आपल्या गटात सध्या हॉकीत सर्वश्रेष्ठ असणारा ऑस्ट्रेलिया व पश्चिम जर्मनी यांचा समावेश आहे तर पाकिस्तानला मात्र त्याच्या गटात हॉलंड व न्यूझीलंड या त्यामानाने कमजोर संघाशी सामना करावयाचा असल्याने उपांत्य फेरी गाठणे सुलभ जाणार आहे.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये कौलालंपूर येथील राजा अझलान शाह कप, ऑस्ट्रेलियातील एसाडा कप, कराची येथील चॅम्पियन ट्रॉफी, डिसेंबरात झालेली दहा राष्ट्रांची हॉंगकॉंग सुवर्णमहोत्सवी स्पर्धा व नुकतीच बर्लिनची चार राष्ट्रातील स्पर्धा जिंकून ऑस्ट्रेलियाने सध्या आपण हॉकीतील अजिंक्य संघ असल्याचे सिद्ध केले आहे.

## भारत–सुवर्णपदक मिळवणार?

लॉस एंजलिस येथे भारताची बहुधा दोन वेळा ऑस्ट्रेलियाशी गाठ पडेल. एकदा साखळी-सामन्यात व दुसऱ्यादा आपण अंतिम फेरीत प्रवेश केला तर. पश्चिम जर्मनी, स्पेन, मलेशिया व यजमान अमेरिका या आपल्या गटातील इतर संघाचा सध्याचा दर्जा बघता त्याना हरवून आपल्या गटात ऑस्ट्रेलियापाठोपाठ निदान दुसरे स्थान पटकावणे भारतीय संघाला अवघड जाऊ नये. दुसऱ्या गटात पाकिस्तान प्रथम क्रमांकावर येईल असे मानले तर आपली गाठ त्याच्याशी उपांत्य फेरीत पडण्याची शक्यता आहे व मग जर आपण पाकिस्तानला हरवू शकलो तर मग आपल्याला ऑस्ट्रेलियाला अंतिम फेरीत हरवून सुवर्णपदक राखण्यासाठी आजपर्यंतचा सर्वोत्कृष्ट खेळ खेळावा लागेल.

दिल्लीतील दारुण पराभवातून भारतीय हॉकी संघ बराच सावरला आहे तरुण खेळाडूंची भरती (भारतीय ऑलिंपिक संघाचे सरासरी वय २३ आहे.) बालकिशन सिंगसारखा मेहनती प्रशिक्षक व दिल्लीतील अॅस्ट्रो-टर्फवरील गेल्या दीड वर्षातील सराव यामुळे आपल्या हॉकीसंघाची ताकद नक्कीच वाढली आहे.

पूर्वीच्या ५–३–२ या पद्धतीऐवजी ४–२–३–१ ही पद्धत स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आघाडीच्या फळीतील एक खेळाडू आता बचावफळीत आल्याने, हा संघ चार फळ्यामध्ये खेळेल व त्यामुळे संघाचा बचाव भक्कम होईल अशी आशा आहे. अॅस्ट्रो टर्फवर चेंडू अतिशय वेगात जातो. त्यामुळे प्रतिपक्षाचे खेळाडू मागे फिरून आपल्या अर्धभागात चेंडू घेऊन जाताना मागे फिरून त्याना गाठणे, आघाडीच्या फळीला अवघड जाते. म्हणून मधली फळी व बचाव फळी यात जादा कुमक असणे आवश्यक ठरते. आघाडीच्या फळीतील चौघानी प्रतिपक्षाच्या गोलावर आक्रमण करण्यावरच पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे व बचावाची फारशी फिकीर करू नये, हाच या पद्धतीने खेळण्यामागचा उद्देश आहे; पण पाकिस्तान व ऑस्ट्रेलिया मात्र अजूनही ५–३–२ याच पद्धतीचा वापर करीत आहेत.

गेल्या काही दिवसातील भारतीय संघाची कामगिरी निश्चितच उल्हासजनक आहे. चॅम्पिअन ट्रॉफीतील असमाधानकारक कामगिरी सोडली (पण तेथेही आपण पाकिस्तानला हरवले होते,) तर कौलालपूर व हॉंगकॉंग येथे भारताने ऑस्ट्रेलिया व पाकि-

स्तानच्या खालोखाल तिसरा क्रमांक मिळविला तर एसाडा येथे व नुकत्याच बर्लिनला झालेल्या ४ राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात अंतिम फेरीपर्यंत धडक मारली व बर्लिनला तर ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करताना त्यांना कडवी लढत दिली. गेल्या काही सामन्यांत पाकिस्तानशी झालेल्या ५ सामन्यांपैकी २ भारताने जिंकले तर ३ सामने बरोबरीत सुटले.

आज भारताकडे झफर इकबाल (कर्णधार), महमद शहीद, मर्विन फर्नांडिस व मार्सेलस गोम्स हे दर्जेदार आघाडीवीर आहेत. आघाडीची ही फळी, मधल्या फळीतील हरदीप, बचावफळीतील विनीतकुमार व गोलरक्षक यांचा खेळ कोणत्या दर्जाचा होतो यावरच भारतीय हॉकी संघाचे यशापयश अवलंबून आहे.

मैदानी गोलाला ( फील्ड गोल ) हॉकीमध्ये फार महत्त्व असते, कारण एका संघाने मैदानी गोल चढवला की, प्रतिपक्षाची बचावफळी व गोलरक्षक यांच्यावर मानसिक दबाव येतो व त्या दडपणाखाली ते चुका करण्याची शक्यता वाढते मैदानी गोल करण्याच्या बाबतीत पाकिस्तानचे प्रभुत्व निर्विवाद असले तरी गेल्या काही सामन्यामध्ये भारताच्या आघाडीच्या फळीने काही चांगले मैदानी गोल लावले आहेत. पेनल्टी कॉर्नर्सचे गोलात रूपांतर करण्याचे तंत्र अजूनही आपल्याला आत्मसात करता आलेले नाही व त्याचा परिणाम आपल्या कामगिरीवर नेहमीच होत राहिला आहे कोलालपूर येथे आठवडाभर चाललेल्या स्पर्धेत भारताला तब्बल ४७ पेनल्टी कॉर्नर्स मिळाले; पण त्यांपैकी केवळ तिनाचेच भारत गोलात रूपांतर करू शकला. लॉस एंजलिसच्या तेज सुपर टर्फवर पेनल्टी कॉर्नर्सचे फटके प्रतिपक्षाच्या गोलात घुसवणे भारताला शक्य होईल काय ?

आज भारताची बचावफळी चांगलीच मजबूत आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आघाडीच्या फळीने लावलेला एखाद-दुसरा मैदानी गोल व पेनल्टी कॉर्नर्सचे गोलात रूपांतर करण्याची आपली क्षमता यावरच आपण उपांत्य सामन्यात पाकिस्तान किंवा हॉलंडला नमवून अंतिम सामन्यांत ऑस्ट्रेलियाला पराजित करणार काय? या प्रश्नाचे उत्तर खेळावर अवलंबून आहे.

सुवर्णपदक मिळविण्याची क्षमता असलेला भारतीय संघ लॉस एंजलिसमध्ये हॉकीतील सुवर्णपदक मिळविणार काय? या प्रश्नाचे निश्चित उत्तर देणे अवघड आहे आपल्या प्रतिस्पर्धी संघाचीही जोरदार तयारी चालू आहे; पण काहीही असले तरी हा संघ भारताला या ऑलिंपिकमध्ये एक पदक–सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य मिळवून देणार हे निश्चित !

## कुस्ती

कुस्तीमधील बहुतेक सर्व म्हणजे दहापैकी आठ वजनी गटात भारतीय मल्ल लढत देतील. रशियन व मंगोलियन पहेलवानांच्या अनुपस्थितीमुळे कुस्तीतील स्पर्धेची तीव्रता जरी थोडीफार कमी झाली असली तरी मॅटवरील ग्रीको–रोमन कुस्तीच्या तंत्रात अजूनही मागे असलेल्या भारतीय मल्लांना पदक मिळविण्याचा पराक्रम गाजविणे फारच अवघड जाणार आहे.

दिल्लीच्या आशियाई खेळातील सुवर्णपदकविजेता सतपाल गुडघ्याला झालेल्या दुखापतीमुळे ऑलिंपिकमध्ये उतरणार नाही. सतपाल आता फारसा तरुणही राहिलेला नाही. मराठी मल्लांनी तर ऑलिंपिकची धास्तीच घेतलेली दिसते ऑलिंपिक संघात निवड होण्याची आशा असलेला एकमेव मराठी मल्ल रामचंद्र सारंगला चाचणी स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत दुर्दैवाने डोक्याला दुखापत झाली. तशा स्थितीत तो दुसऱ्या फेरीतही लढला; पण त्याला गुणावर पराभूत व्हावे लागले व त्याची लॉस एंजलिसची संधी हुकली. युवराज पाटीलने तर काही फालतू कारण दाखवून कुस्तीमधील आपल्या परदेशी प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध नव्हे तर भारतीय कुस्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांविरुद्धच कोल्हापुरात बसून शड्डू ठोकणे पसंत केले.

शंभर किलो गटात उतरणारा दिल्ली एशियाडचा रौप्यपदकविजेता कर्तारसिंग हाच केवळ कुस्तीमध्ये काही तरी चमकदार कामगिरी करू शकेल, असे म्हणता येईल. कर्तारसिंग हा एक उत्तम प्रतीचा मल्ल. दिल्लीत एशियाडमध्ये उत्तम खेळ करूनही केवळ दुर्दैवाने अंतिम फेरीत तो गुणांवर पराभूत झाला व त्याला रौप्यपदकावरच समाधान मानावे लागले. गेल्या वर्षी त्याने दिल्लीत राष्ट्रीय अजिंक्यपदस्पर्धेत ९० किलो गटात विजय मिळवून मोतीलाल नेहरू स्मृतिचषक पटकावला. या वर्षी तर त्याने पुण्यात पाकिस्तानच्या मोहमद तारिद मोहमद याकूब विरुद्ध आव्हान–कुस्तीत केवळ २५ मिनिटांत विजय मिळविला. रशियन व मंगोलियन पहेलवानांच्या गैरहजेरीत भारी वजनगटात कर्तारसिंग आपला सर्व अनुभव व ताकद पणाला लावून भारताला कुस्तीतील आजपर्यंतचे दुसरे ऑलिंपिक पदक मिळवून देऊ शकेल.

## ॲथलेटिक्स

भारताचे ॲथलिट व आंतराष्ट्रीय दर्जाचे ॲथलिट यांच्या गुणवत्तेतील तफावत लक्षात घेता लॉस एंजलिसमध्ये भारतीय ॲथलिट चांगली कामगिरी करू शकतील असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

पण तरीही या वेळी भारत ॲथलेटिक्समध्ये एखादे पदक मिळविण्याचा चमत्कार करू शकेल, अशी आशा केल्यास ती अवास्तव म्हणता येणार नाही.

ॲथलेटिक्समध्ये उतरणाऱ्या भारतीय संघात या वेळी ५ महिला व ३ पुरुष खेळाडूंचा समावेश आहे. महिलांच्या ॲथलेटिक्समध्ये भारत काही करू शकतो काय याकडेच रसिकांचे लक्ष राहील.

महिलांपैकी गीता झुत्शीची निवड काहीशी वादग्रस्तच म्हणावी लागेल. दिल्लीतील आशियाई स्पर्धेतील पदकामुळे ३००० मीटर्स धावण्याच्या शर्यतीसाठी तिची निवड करण्यात आली. सध्या ती गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेत सराव करत आहे; पण २७ वर्षांची गीता झुत्शी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तरुण व वेगवान धावपटूंना लढत देऊ शकेल, अशी अजिबात शक्यता नाही. अमेरिकेत नुकत्याच झालेल्या एका स्पर्धेत तिने हे अंतर तोडण्यास १० मिनिटे १२ सेकंद घेतले. अमेरिकेच्या मेरी डेकर किंवा दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या पण ब्रिटिश झेंड्याखाली ऑलिंपिकमध्ये उतरणाऱ्या झोला बड या ३००० मीटर्समधील प्रमुख महिला-धावपटूंशी स्पर्धा करण्यासाठी तिला ९ मिनिटांची वेळ गाठावी लागेल. दोन–तीन सेकंदांच्या फरकाने जेथे सुवर्णपदक अप्राप्य ठरते, तेथे एक मिनिट १२ सेकंदांचा

वेळ कमी करणे तिला जवळजवळ अशक्यप्रायच आहे.

महिला ॲथलेटिक्समध्ये भारताला पदकाच्या अंधुक आशा आहेत त्या केवळ दोन प्रकारात. एक म्हणजे ४०० मीटर्स अडथळ्यांच्या शर्यतीत धावणाऱ्या पी. टी. उषाकडून व ४x४०० मीटर्स रिलेशर्यतीत.

केरळच्या पी. टी. उषाने काही दिवसांपूर्वीच ४०० मीटर्स अडथळ्यांच्या शर्यतीत भाग घेण्यास सुरुवात केली व आशियाई सुवर्णपदक विजेत्या वळसम्मापेक्षा सरस कामगिरी करून दाखविली. नुकत्याच मुंबईत झालेल्या राष्ट्रीय ॲथलेटिक्सस्पर्धात तिने ४०० मीटर्स अडथळ्यांची धाव ५८.५ सेकंदात घेतली तर आंतरराष्ट्रीय पात्रता वेळ ५८.७ सेकंद आहे.

गेले काही दिवस पी. टी. उषाची धाव अधिकाधिक वेगवान बनत आहे व आपल्या वेगात ती दोन–तीन सेकंदांनी काटछाट करू शकली तर तिच्याकडूनही ॲथलेटिक्समधील भारताच्या पहिल्या-वहिल्या पदकाची अपेक्षा करता येईल.

४x४०० मीटर्सच्या रिलेसाठी पी. टी. उषा, वळसम्मा व शिनी अब्राहम या केरळच्या तीन महिलांची निवड योग्यच म्हटली पाहिजे. कारण सध्या त्या देशातील सर्वांत वेगवान महिला आहेत; पण चौथी रिले-खेळाडू म्हणून निवडण्यात आलेल्या वंदना रावची कामगिरी अजून पाहिजे तशी झालेली नाही. भारताच्या रिलेच्या साखळीतील वंदना राव कच्चा दुवा आहे. आपल्या वाटची धाव ती किती वेगात पार करू शकते यावरच भारताच्या ४x४०० मीटर्स रिले संघाचे भवितव्य अवलंबून राहील. कारण इतर तिन्ही खेळाडूंकडून उत्तम कामगिरीची अपेक्षा आहे. निदान अंतिम फेरीत या संघाने प्रवेश मिळवावा असे वाटते.

चार्ल्स बोरोमिओ ( ८०० मीटर्स ), चांदराम ( २० किलोमीटर्स चालणे ) व गुरुतेज सिंग (भालाफेक) हे ॲथलिट भारताच्या पुरुष ॲथलेटिक्स संघात सामील आहेत. चार्ल्स बोरोमिओ व चांदराम हे दिल्ली आशियाई खेळात गाजलेले खेळाडू. बोरोमिओ सध्या अमेरिकेत सराव करत आहे; पण ८०० मीटर्सच्या शर्यतीत आपल्या प्रतिस्पर्धांना तो आव्हान देऊ शकेल असे वाटत नाही.

नोव्हेंबर १९८३ मधील आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत चांदरामने सुवर्णपदक मिळविताना २० किलो मीटर्सचे अंतर १ तास ३१ मिनिटांत तोडले. सध्या आशियातील एका प्रमुख चालपटूत त्याची गणना होत असली तरी लॉस एंजलिसमध्ये पदक प्राप्त करण्यासाठी त्याला त्याहून फारच सरस कामगिरी करून दाखवावी लागेल व सध्याच्या परिस्थितीत ते त्याला जमेल असे वाटत नाही.

गुरुतेज सिंगला भालाफेकीतील मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा अनुभव मिळावा एवढीच माफक अपेक्षा आहे. १९८४ च्या लॉस एंजलिस ऑलिंपिकमधील भारताची ही आशास्थाने हॉकी, कुस्ती व ॲथलेटिक्स याव्यतिरिक्त इतर ४ क्रीडाप्रकारांतही भारतीय खेळाडू आपल्या नशिबाची परीक्षा अजमावणार आहेत. या क्षेत्रात कौरसिंग (हेवी वेट, मुष्टियुद्ध) व रणधीर सिंग (ऑलिंपिक ट्रॅप नेमबाजी) या दोघांकडून बऱ्यापैकी कामगिरीची अपेक्षा करता येईल. अर्थात ऑलिंपिक पदकापासून ते बरेच दूर असतील असे दिसते. नेमबाजीत इतर नेमबाजांकडून काहीच अपेक्षा नसताना रणधीर सिंगबरोबर इतर ७ नेमबाज लॉस एंजलिसची वारी करीत आहेत हे आश्चर्यजनक आहे.

या वेळी प्रथमच काही भारतीय खेळाडूंकडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची अपेक्षा केली जात आहे लॉस एंजलिस ऑलिंपिकमधील भारताची ही आशास्थाने हे ऑलिंपिक भारताच्या दृष्टीने आतापर्यंतचे सर्वांत यशस्वी ऑलिंपिक बनविणार काय हे समजण्यासाठी अजून काही दिवस वाट पहावी लागेल. □

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# वेगळ्या खोल्या

नुकताच अचानक एक वेगळ्या खोल्यांचा प्रयोग संपला. प्रयोग असं आता म्हणायचं मोठ्ठं नाव देऊन; पण खरं तर मुलांच्या गरजा बदलतील तसं घर बदलायचं हे त्यामागचं धोरण होतं. त्यात एक मजेशीर गोष्ट लक्षात आली त्याबद्दल सांगायचंय.

मुलांचे वडील आर्किटेक्ट. घरात भिंती नसाव्यात ही त्यांना पटलेली गोष्ट. त्यामुळे घराच्या खोल्या करायच्या त्या केव्हाही हलवता येण्याजोग्या पार्टिशननी, चाकांवर बसवलेल्या कपाटांनी किंवा उचलून ठेवता येतील अशा लहान लहान कपाटांनी बनवलेल्या भिंतींनी. याचा खूप फायदा वारंवार होतो. कधी स्वैपाकघर मोठं करून त्यातच दिवाण ठेवून पाहुण्यांची बसायची सोय करता येते. अगदीच अनोळखी माणसांना चमत्कारिक वाटू नये म्हणून दिवाणखाना छोटा स्वतंत्र ठेवता येतो. खूप मित्रमंडळींनी एकत्र जमून गप्पा मारायच्या कार्यक्रमासाठीसुद्धा मधलं सगळं हलवून मोठ्ठी खोली करता येते.

मुलं रांगती होती तेव्हा त्यांच्या सोयीसाठी मुद्दामच जमिनीवर फारसं सामान ठेवलं नव्हतं. ती चालू लागली तेव्हा त्यांना धरता येण्याजोगं सामान ठेवलं होतं. मुलं लहान असताना त्यांचे स्वतंत्र छोटे पलंग मोठ्या पलंगाला लागून ठेवले होते. रात्री एकदोनदा उठणं, शूचे कपडे बदलणं ही

मदत तेव्हा लागायची.

मुलं आणखी मोठी झाली तेव्हा त्यांनी स्वतंत्र झोपावं म्हणून त्याची खोली वेगळी केली. दोघांचे पलंग एकमेकांजवळ ठेवले होते आणि अभ्यास–खेळणंही पलंगावरच चालायचं. मित्रमंडळीसकट पलंगांवर धुडगूस असल्यानं चादरी पण रोज प्रेक्षणीय व्हायच्या.

साधारण पाच–सहा महिन्यांपूर्वी असं लक्षात आलं की, मुलं एकमेकांशी फार भांडतात. खेळताना, अभ्यास करताना सारखं एकमेकांजवळ असल्यानं हे होतं का काय अशा विचारानं त्यांना विचारलं, तुमच्या दोघांच्या दोन वेगळ्या खोल्या करायच्या का? अगदी आनंदाने उड्या मारत हो म्हणाले. दोन खोल्या लहान-लहानच झाल्या. मध्ये पार्टिशन होतं.

आपापल्या खोल्या मुलांनी सजवल्या. मुलांनी ओम् वगैरे काढून भिंतीवर चिकटवला. त्याखाली क्रिकेटियर्सचे फोटो. आवडती चित्रं. आपली अभ्यासाची टेबल–खुर्ची खोलीत कोपऱ्यात बसवली. पुस्तकं लावून ठेवली. तो मुलांसाठी छोटी लायब्ररी चालवतो. त्याची पुस्तकं एका छोट्या शेल्फवर मांडून ठेवली.

मुलगी पण छोटी खोली पाहून खूष झाली. तिला अभ्यासाच्या टेबलाचं वगैरे खास कौतुक नव्हतं. तिच्या खोलीत सतरंज्या, चादरी, उशा ठेवायचं मोठं कपाट आलं होतं. ते रिकामं करून तिनं स्वतःला, मैत्रिणींना आणि मांजराला बसायला, खेळायला खोली केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ही मुलगी रंगीत रंगीत पातळ कागदांच्या लांब लांब नक्षीदार पट्ट्या करून पार्टिशनवर चिकटवत होती. 'वा! छान संजावट चाललीय' असं म्हटलं. मग ती म्हणाली, 'मी ह्या पट्ट्या का लावते आहे कळलं का?' 'छान दिसावं म्हणूनच ना?' मी विचारलं. 'नाही' म्हणाली. पट्ट्या चिकटवल्यावर तिनं पंखा सुरू केला. त्या पट्ट्या वाऱ्यानं हलू लागल्या. खुसखुस आवाज करू लागल्या. फार गंमत वाटत होती ते बघून. सगळी भिंत जिवंत झाल्यासारखी वाटत होती. मुलगी म्हणाली 'काल रात्री मी एकटी झोपले न या खोलीत तर मला एवढी भीती वाटली. खिडकीतून खूप भुतं येतायत असं वाटलं. म्हणून मी ही मला सोबत निर्माण केलीय.'

दोन–चार दिवस स्वतंत्र खोल्यांची मजा लुटल्यावर नवे शोध लागू लागले. पार्टिशनवर चढून एकमेकांच्या खोलीत जाणं सुरू झालं. कपडे बदलताना, मुद्दाम दुसऱ्याने डोकावणं सुरू झालं. मुलांना खेळायला जरा मोठी जागा लागायची. मग ती इतर खोल्यांमध्येच मित्रांना घेऊन खेळत बसायची. त्यांच्या खोल्या तशाच.

रात्री गोष्ट सांगायची तर पंचाईत व्हायला लागली. कोणाच्या खोलीत झोपून गोष्ट सांगायची? मग तू नेहमी असंच करतेस. त्याच्याच खोलीत जातेस, अशा तक्रारी सुरू झाल्या.

मुलीच्या खोलीतला पलंग जरा रुंद होता. त्यावर मग दाटीवाटीनं झोपणं सुरू झालं. एरवी माझं सगळं स्वतंत्र हवं म्हणणारा मुलगा काही तरी निमित्त काढून तसं पाहिलं तर कमीपणा स्वीकारून मुलीच्या खोलीत झोपायला निमित्त शोधू लागला. त्यांना कितीही भांडले तरी एकमेकांची सोबत हवीशी वाटायची.

त्यानंतर आमच्या लक्षात आलं की; मुलगा घरात ठरतच नाही. सारखा मित्राकडेच अभ्यासाला जातो. परवा काही तरी निमित्तानं मी त्या मित्राच्या घरी गेले. छोटीशी एक खोली. त्यात स्वैपाकाचा ओटा, पलंग ठेवलेला, भिंतीवर सगळीकडे सामान आणि उरलेल्या कोपऱ्यात ही दोघं मुलं अभ्यास करत बसलेली. त्या मुलांची आई त्यांच्या समोरच बसून पोळ्या करत होती.

मी जरा मुलाच्या नजरेनं त्या खोलीकडे पाहिलं. खूप मजेशीर वाटलं. सगळी माणसं एवढ्या जवळ वावरतायत. मित्राची आई काम करताना काय काय करतेय् बघता येतंय्. मी विचार करतच घरी आले.

रात्री आम्ही दोघं याबद्दल बोलत होतो. मी म्हटलं मला वाटतं मुलांना माणसांचा सहवास हवा असतो. माणसं आपल्याभोवती असावीत असं वाटत असतं. मोठी घरं, स्वतंत्र खोल्या मुलांवर दडपण आणत असतील का? म्हणून मग टेबलाखाली घर करून मोठ्या कपाटाचं घर करून मुलं आपला परिसर छोटा करून घेत असतील का? छोट्या खोल्याची त्यांना गंमत वाटली असेल; पण एकटं झोपावं लागणं त्यांना शिक्षा वाटत असावी. काही वेळ दोघंही हट्ट करून आमच्याच खोलीत झोपून जात. रात्री उचलून त्यांच्या खोलीत ठेवलं तर रागवत.

मुलांच्या मनात असं पण येत असेल नाही का किती स्वार्थी आहेत आई–वडील! त्यांना मात्र एकमेकांची सोबत हवी आणि आपण मात्र एकटं झोपायचं!

मुलीला झोपवण्यापूर्वी गोष्ट सांगताना मी तिच्याजवळ झोपायची. ती मला घट्ट धरून ठेवून म्हणायची 'मला झोप लागल्यावर उठून गेलीस तर बघ. मी उद्या बोलणार नाही तुझ्याशी!'

मग ती युक्त्या काढायची, म्हणायची आपण दोन खोल्या करू. एक मुलांची खोली एक मुलींची. आपण दोघी इथे झोपू. ते दोघं तिकडे झोपतील.

आमची नावं अनिल, शोभा, शोनिल, आभा आहेत ना, तर मुलगा म्हणायचा शो शो एका खोलीत अ अ एका खोलीत असं झोपायचं किंवा म्हणायचा ओळीनी एका खोलीत झोपायचं. उचीप्रमाणे. म्हणजे मग तो माझ्याजवळ यायचा आणि मुलीला त्याच्यापलीकडे झोपावं लागायचं. मग मुलगी युक्ती काढायची आणि पटकन् आम्हा दोघांच्यामध्ये झोपून म्हणायची आता अ अ शो शो असं ओळीनं झालं आणि मुलाला चिडवायची, मला बघ एका बाजूला शोभा दुसऱ्या बाजूला अनिल! तुला फक्त शोभाच!

हे सगळं आठवून, बोलून मुलांना विचारलं तुम्हाला एक मोठी खोली परत करायची का? आणि मोठे जोडलेले पलंग? मग सगळ्यांना त्याच्यावर झोपता येईल. एकत्र अभ्यास करत बसता येईल.

होऽऽऽम्हणून जोरदार उत्तर आलं आणि मग मधलं पार्टिशन काढून टाकलं.

सध्या दोघं आनंदात आहेत. मित्रांसकट सगळ्यांनी एकत्र अभ्यास करणं, दंगा करणं सुरू झालंय्. कदाचित काही दिवसांनी याचाही कंटाळा येईल त्यांना. पुन्हा दोन खोल्यांची कल्पना निघेल–

पण मुलांना माणसाचा, एकमेकांचा

सहवास हवा असतो आणि अगदी शारीरिक सहवाससुद्धा. लहानपणापासून बाळाची वेगळी स्वतंत्र खोली ही कल्पना पाश्चात्यांच्या नवरा–बायकोच्या गरजांना अवास्तव प्राधान्य देण्यातून निघाली असेल का? की बाळाला निर्जंतुक सगळं पुरवण्याच्या अट्टाहासातून? की त्याला स्वतंत्र व्यक्ती बनवण्याच्या घाईतून? इथे तर आपल्याला दिसतंय की दहा–बारा वर्षांच्या मुलांनाही आई–वडलाच्या कुशीत झोपावं असं वाटत आहे.

लहानपणी आमचं घर छोटंच होतं. आम्ही मोठे झालो तसं चारही भावंडं आणि आई–वडील घरात बसलो की घर भरून जायचं. आई म्हणायची, 'पोरं मोठी झाली. आता मोठं घर घ्यायचं बघा.' वडील म्हणायचे, 'अग, घर लहान आहे म्हणून तर सगळे एकमेकाना दिसतात. प्रत्येकाच्या वेगळ्या खोल्या झाल्या की प्रत्येकजण आपापल्या खोलीत बसून राहील. माणसं एकत्रच यायला हवीत!'

आता वाटतं–खरंच! वेगळ्या अर्थानीही घरात भिंती नसाव्यात हेच खरं! □

---

## पुस्तके

# 'यशवंत : ५०'

### वि. ग. कानिटकर यांनी संपादित केलेली छोटी पुस्तिका

---

१९५८ किंवा १९५९ सालची गोष्ट असेल. मी त्या वेळी पोदार कॉलेजमध्ये लेक्चरर होतो आणि कॉलेजजवळच्या अध्यापकनिवासात राहत होतो. मी घरी नसताना दारावर टकटक झाली म्हणून कुसुमनं दार उघडलं तेव्हा एका चमकदार डोळ्यांच्या तरुणानं विचारलं, 'हे देशपांड्यांचं घर का?' हो. 'कोल्हापूरचे प्राचार्य भणगे आपल्याकडं आले आहेत काय?' होय, आले आहेत. 'त्यांनी मला मुलाखतीसाठी बोलावलं आहे. गणिताच्या लेक्चररसाठी मी त्यांच्याकडे अर्ज केला आहे.' घरी मीही नव्हतो आणि भणगेही नव्हते. कुसुमनं ह्या तरुणाला बसायला सांगून त्याची पूसतपास केली व भणगे घरी असतील त्या वेळी परत यायला सांगितलं. ही हकीकत भणगे परत आल्यावर कुसुमनं त्याना सांगितली तेव्हा त्यांनी गमतीनं तिला म्हटलं, 'तुमची काय शिफारस आहे? तुम्ही सांगत असाल तर त्याला घेतो.' कुसुम म्हणाली, 'अहो घ्याच. फार स्मार्ट आणि हुषार मुलगा वाटला.'

हा स्मार्ट मुलगा नंतर पुन्हा आला आणि भणग्यांनी त्याला जे काही प्रश्न विचारले त्याची उत्तरं देताना मलाही तो न्याहाळायला मिळाला आणि माझं मतही त्याच्याविषयी खूप अनुकूल झालं एवढंच मला आता आठवतं आहे. ह्या पहिल्या भेटीत कानिटकरला हसण्याची संधी मिळाली की नाही हे मला आठवत नाही; पण तो हसला असलाच पाहिजे असं वाटतं. कारण पुढं ध्यानात आलं त्याप्रमाणे तो विनोदबुद्धीनं तुडुंब भरलेला असायचा आणि मधूनच स्फोटक आणि सुप्रसन्न हसून परिसराला तजेला आणायचा. हे त्या अगदी पहिल्या भेटीच्या आणि त्यातूनही मुलाखतीसारख्या गंभीर प्रसंगीसुद्धा झालेलं नसेलच असं सांगवत नाही. एक मात्र खरं की, कानिटकरची कल्पना त्याच्या 'सांसर्गिक' हास्याशिवाय मला कधीच करता येत नाही. हा यशवंत कानिटकर म्हणजे 'यशवंत २४' किंवा 'यशवंत २५'.

१९६० साली पार्ले कॉमर्स कॉलेजात मी दाखल झालो आणि यशवंत बहुधा त्याच साली. माझी आणि यशवंताची खरी जानपहेचान या काळातली. ह्या नव्या कॉलेजमधले सहकारी बहुतेक तरुण, माझ्यापेक्षाही वयानं बरेच लहान होते. मीच त्यातल्या त्यात प्रौढ म्हणजे छत्तीस वर्षांचा! कॉमनरूममधले वातावरण तारुण्यसुलभ थट्टामस्करी, गप्पा, चहाटळपणा यांनी भरलेले असायचे. माझं घर जवळच असल्यानं वेळी–अवेळी हे सर्वजण माझ्या घरी टपकायचे. पार्ले कॉमर्सकॉलेजमधली चार वर्षं फार सुखाची व मजेची गेली आणि त्यामागचा एक फार महत्त्वाचा घटक यशवंत होता.

आपल्या स्वभावात दोन परस्पर विरोधी प्रवृत्ती वास करीत असल्याचं यशवंतानं म्हटलेलं आहे. एक चैनी तर दुसरी देशासाठी सर्वसंगपरित्याग करू इच्छिणाऱ्या व्रतीची. पार्ले कॉलेजच्या ह्या काळात मला प्रकर्षानं दिसली ती यशवंताची पहिली प्रवृत्ती किंवा राजस प्रवृत्ती आणि मलाही तिचं आकर्षण नव्हतं असं नाही. ह्याच पातळीवर आम्ही एकत्र आलो होतो आणि मजेत दिवस घालवीत होतो. तो जनसंघाचेही काम करतो हे मला कळलं होतं; पण त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या ह्या अंगाला फारसं महत्त्व द्यावं असं कधी काही घडलं नव्हतं

यशवंताच्या तल्लख विनोदबुद्धीची काही उदाहरणं अजूनही मला आठवतात. आमच्या कॉमनरूमच्या आतल्या छोट्या खोलीत आम्ही बसलेलो असताना वर्गाला उशीर होतो आहे म्हणून एक अध्यापिकाबाई अत्यंत घाईनं आत आल्या व त्याच गडबडीत त्यांनी केसातला सुकलेला गजरा भरदिशी सोडवून केराच्या टोपलीत टाकून दिला. हे पाहून यशवंता म्हणाला, 'हे हो काय कैकेयीसारखं?'

एकदा यशवंताचा चष्मा हरवला किंवा निकामी झाला होता. ह्या कॉमनरूममध्ये आमचं बोलणं चाललं होतं. चष्मा नसला म्हणजे कशी अडचण होते हे सांगताना यशवंता म्हणाला : कधी–कधी एकेका वस्तूच्या दोन प्रतिमा (डबल इमेज) दिसतात. उदाहरणार्थ, रस्त्यावर समोरून एक माणूस येत असला तर दोन दिसतात. कुणी तरी विचारलं, 'अशा वेळी मग तू काय करतोस?' यशवंता म्हणाला, 'माझी सायकल बरोबर दोघांच्या मधून नेऊन पुढं सटकतो!' यशवंताच्या विनोदबुद्धीचा हा तरलपणा अतिशय हृद्य होता.

पण त्या संभाषणानंतर लगेचच आणखी एक मजा झाली. तो आणि मी घरी परत

निघालो. कॉलेजच्या जवळच्या मैदानातून जात असताना समोरून खांद्यावर मोठे वासे घेऊन दोन कामकरी येत होते. माझे तिकडे लक्षही नव्हते. त्यांना टाकून थोडे पुढे आलो तेव्हा यशवंतानं मला विचारलं, 'देशपांडे, खरोखरच दोघं होते ना हो ते? की...'

अध्यापकांची आमची सहल एकदा महाबळेश्वरला गेली. आमच्यात नुकतेच इंग्लंडला जाऊन आलेले एक प्राध्यापक होते आणि इंग्रजी रीतीरिवाजांची त्यांच्यावर बरीच छाप पडलेली असल्यानं तसल्या गोष्टी ते अनेकदा सांगत असत. कानिटकर आणि इतर एक-दोघं त्यांच्या नजरेआड त्यांची चेष्टा करीत. त्या पार्श्वभूमीवर कानिटकरनं उच्चारलेलं वाक्य आपणा सर्व जातिवंत भारतीयांना माना डोलवायला लावील असं एक महावाक्यच आहे. सकाळची भ्रमंती करून दमले-भागलेले आम्ही जेवायला एका हॉटेलात गेलो. कानिटकर म्हणाला, 'जेवणाचे दोन प्रकार असतात एक टेबल-मॅनर्सचे आणि दुसरे पोटभर. आज कोणतं आहे?'


'यशवंत : ५०' ह्या पुस्तिकेत कानिटकर शाळा-कॉलेजात एकपात्री प्रयोग करीत असे असा उल्लेख आहे. पार्ले कॉमर्स कॉलेजच्या स्नेहसंमेलनातही विद्यार्थ्यांपुढं त्यानं एक एकपात्री प्रयोग करून दाखविला. त्यात मात्र अभिनयकलेपेक्षा त्याचा उत्साहच अधिक जाणवल्याचं मला स्मरतं.

एकदा संमेलनासाठी विद्यार्थ्यांची एक नाटिका त्यानं बसवून घेतली. तीत कुलकर्णी नावाच्या एका मुलाला स्त्री-पात्राचं काम होतं. त्या मुलाच्या नंतरच्या बोलण्या-वागण्यातून ही छटा बरेच दिवस जाईना. अशा रीतीनं कानिटकरचं दिग्दर्शन विलक्षण प्रभावी ठरलं!

अगदी अलीकडच्या एक-दोन पत्रांत स्वतःच्या आजाराविषयी अपरिहार्य तेवढेच उल्लेख आहेत, बाकी इतर अनेक गोष्टी. माझा मुलगा चंद्रहास काय करतो ह्या त्याच्या चौकशीला उत्तर म्हणून तो अर्थशास्त्र घेऊन एम. ए. झाला असं मी लिहिलं होतं. त्यावर त्यानं लिहिलं, 'दोन अर्थशास्त्रज्ञांचं एकमेकांशी कधी पटत नाही असं म्हणतात. म्हणजे तुमच्या घरात सारखाच कलह चालू असणार.' एकदा मला लिहिलेल्या पत्रावर पत्ता लिहून झाल्यावरही कोटी करण्यावाचून त्याला राहवलं नाही. १९-बी।ए असा माझ्या घराचा क्रमांक आहे. पाकिटावरच वरच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यात त्यानं लिहिलं, 'तुमच्या घराच्या पत्त्यावरही 'बी. ए.' म्हणजे कमाल झाली!'

अशा ह्या कानिटकरनं एक दिवस जाहीर केलं की आपण इंग्लंडला जाणार. (जनसंघाचं काम करायला की काय असं कुचेष्टेने त्या वेळी कुणी तरी विचारलंच.) आणि तो गेला. तो गेल्यावर त्याचा माझा एक-दोनदा पत्रव्यवहार झाला तेवढाच. माणसं लांब गेल्यावर संबंध टिकवणं मला एकूण जडच जातं.

पण तो ७७ साली भारतभेटीला आला तेव्हा सहकुटुंब माझ्याकडे जेवायला आला. जेवायला बसलो असताना त्याला सहजच 'तुमची तब्येत कशी छान झाली आहे' असं मी म्हटलं; पण ह्यावर त्यानं जे उत्तर दिलं ते काळीज कापत गेलं. शांतपणानं आपली मूत्रपिंड निकामी झाल्याचं त्यानं सांगितलं. नंतर म्हणाला, 'काय आठ दहा वर्षं मिळायची ती मिळतील. तेवढं जगून घेऊ.' मला पुढचा घास खरं म्हणजे गिळेना. पण कानिटकर शौर्यानं आणि धीरचित्तानं ही हकीकत सांगून दुसऱ्या विषयाकडे वळला म्हणून मीही काही न झाल्यासारखं दाखवीत टेबलावरच्या गप्पा तशाच चालू ठेवल्या. एका वेगळ्या कानिटकरचं मला पहिल्यांदा दर्शन झालं ते हे.



यशवंत आणि वि. ग.

¤

त्यानंतर त्याचं डायलिसिस, मूत्रपिंड-इत्यादींविषयी मधून मधून ऐकत होतो. एकदोन वेळा तो इकडं आला; पण त्याची माझी चुकामूक झाली. पण आपल्या जीविताासाठी जो प्रखर झगडा त्यानं दिला आहे किंवा देतो आहे त्याची कल्पना मला नव्हती. ती ह्या छोट्या पुस्तिकेनं आली आणि त्याच्या मनोधैर्यापुढं माथा नम्र करावासा वाटला.

ही पुस्तिका म्हणजे थोरल्या भावानं धाकट्या पण मित्रवत अशा भावाचं केलेलं सहृदय कौतुक आहे. शिवाय कानिटकरच्या आप्तमित्रांनी दिलेल्या त्याच्याविषयीच्या अनेक आठवणी तीत आहेत; पण रोगाशी झगडताना कानिटकरनं जे समर गाजवलं त्याची तपशीलवार हकीकत डॉ. सौ. प्रभा गोखले यांनी दिली आहे. ती सर्वांत महत्त्वाची आहे. ती अंगावर एका बाजूनं शहारे आणीत असतानाच दुसऱ्या बाजूनं कानिटकरच्या मृत्युंजय धीरोदात्ततेचं भव्य चित्र उभं करते. हे युद्ध संपलेलं नाही ह्याची विषण्ण जाणीवही मनाला व्यथित करते. दर काही क्षणांनी एक गिधाड येऊन मांसाचे लचके तोडून जात आहे अशा अवस्थेत खडकाशी बांधलेल्या प्रॉमीथिअसची जी स्थिती झाली असेल तीच कानिटकरची झाली आहे.

कानिटकरच्या स्वभावात जो यती आहे तो त्याला इथं उपयोगी पडला असावा. त्याला जर देशासाठी खरोखरच सर्वसंग

परित्याग करून फकिरी पत्करावी लागली असती तर जे हाल त्याने हसतमुखानं स्वीकारले असते तेच तो आता रोगाशी झगडताना सोशीत आहे. एका परीनं दैवानं त्याला हव होतं तेच दिलं आहे— पण वेगळ्या तऱ्हेवाईक पद्धतीनं. त्याला भारतात येऊन समाजकार्य करायच होतं; पण त्याच्या रोगानं त्याला साखळदंडांनी अमेरिकेला बांधून ठेवलं आहे. यतित्वाची स्वप्न पाहणाऱ्या कानिटकरला सावरकर, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून निश्चितच स्फूर्ती मिळालेली असणार. तेही असेच राजस आणि सात्त्विक ह्याच्या चमत्कारिक रसायनातून निर्माण झाले होते; पण कानिटकरचं दुर्दैव अधिक थोर! पण 'दुर्दैव' असं आपण म्हणायचं. पुन्हा तो भेटला की त्याच्या प्रसन्न हास्याचा स्फोट होणारच. त्याचीच मी आता क्षुधितासारखी वाट पाहतोय.

—स. ह. देशपांडे

## चांदण्याचे कवडसे

'चांदण्याचे कवडसे'— कविवर्य श्री. बा. भ. बोरकर याच्या काव्यमय व रसील्या लेखणीकुंचल्यातून शब्दचित्रबद्ध झाहलेल्या बत्तीस ललितलेखांचा संग्रह, 'माझा मौनवार', 'सहज सुदर वार्धक्य' 'मला येणारी पत्रे' 'हरवलेली अंगठी' हे काही लेख म्हणजे तर अलीकडील काळात दुर्मिळ वा बहुश: लुप्तप्राय होत चाललेला लघुनिबंध हा साहित्यप्रकार. फार दिवसांनी भेटलेल्या बालमित्राऐसा, 'चांदण्याच्या कवडशा'तून गुजगोष्टीनी विसावा देणारा.

पहिला लेख 'माझा मौनवार' याची सुरुवातीची 'एक गोष्ट तरी मी नियमाने पाळू शकतो आणि ती म्हणजे अनियमितपणा' अशी नर्म मिस्किलपणे कविवर्यांनी केलेली आहे. मौनवार पाळल्यामुळे हातवारे व अभिनय यावरच सारे निभावून नेताना काय काय विनोद घडले तेही अगदी सहज साभिपणी सांगून टाकले आहे. 'घरातल्या माणसाना खुणाच्या भाषेत विचारले, 'दूधवाल्या भैय्याने बिलाचे पैसे नेले का?' वस्तुतः किती सहज प्रश्न! पण हिंदी स्टुडिओतल्या नटीप्रमाणे तीनतीनदा तोच अभिनय करून देखील माझा आशय कुणाच्याच डोक्यात शिरेना. इतकी वर्षे माझ्याशी साहचर्य केलेल्या पत्नीला तरी कळावे? तेही नाही. त्या वेळी अशी चीड आली म्हणता तिची की हिच्यापेक्षा आपण एखाद्या मुक्या मुलीशी लग्न केले असते, तरी बरे झाले असते, असे मला वाटू लागले. पत्नीला (साभिनय) वरील प्रश्न विचारला, तेव्हा ती पाणी घेऊन आली. हायस्कुलात जाणाऱ्या मुलींना विचारले तेव्हा त्या दुधाचे पावेले घेऊन आल्या आणि फारसा शब्दसंग्रह पदरी नसलेल्या धाकट्या मुलाने मला तो बिनचूक ओळखून उत्तर दिले की, 'भैय्या पैसे घेऊन गेला. याच लेखात बायबलातील एक बोधकथाही जाता जाता कविराज आपल्या कानी घालून जातात, हे विशेष.'

पौराणिक कथेचा हृद्य दाखला देऊन कविराजांची पूर्वायुष्यातील ओढगस्तीची स्थिती, लेखनाच्या भावनिक गराड्यात असूनही, मातृपितृभक्ती, पाठच्या भावंडांसाठी कर्तव्यदक्षता, कुटुंबवत्सलता पाहून; सामान्यांना 'आपलेच चित्र' वाटावे असा 'संपत्तीचे पंख' हा लेख. 'सहजसुदर वार्धक्य'मध्ये बोरकरांचे वार्धक्यही कसे सहजसुदरतेने निटलेले असते, 'स्वाभाविक तारुण्याइतकेच अभिलक्षणीय वाटते.' याचा प्रत्यय वाचकास यावा.

'आनंदयात्री'तील 'कृष्णबाबा' हा गृहस्थ फारसा शिकलेला नव्हता. 'मनाचे श्लोक' आणि एखादे दुसरे मराठी स्तोत्र यापलीकडे त्याचे वाचन नव्हते; पण श्लोक म्हणताना आवाजाचे चढउतार कसे करायचे, हे सारे ते चांगले जाणत. त्याबाबतीत ते कसलेले नटच होते. श्लोकांचे भाडवल संपले की, बाराखड्यांची संथा त्याच ठसक्यात मुळीसुद्धा न कचरता ते साग्रसंगीत म्हणत आणि पूजेचा कार्यभाग उरकीत. लोकाचे समाधान होई आणि त्यांची पिशवी पोह्यानारळांनी भरून निघे. लोकाना आनंद वाटावा आणि आपण तो लुटावा, हा त्यांचा खाक्या होता. त्याच्यावर सांसारिक जबाबदाऱ्यांचा केवढा भार होता! पण मोराने आपला पिसारा लीलया वागवावा, तसा तो ते वागवीत. इतके दिवस आनंदाबद्दल मी खूप ऐकलं; वाचलं होतं; पण आनंदाचं मला प्रत्यक्ष दर्शन झालं आणि त्याचं मर्म समजलं, ते या कृष्णबाबामुळे. सारं जीवन हा एक आनंदमहोत्सव आहे आणि त्याची गंगोत्री आपल्याच अंतरात्म्यात आहे, याची साक्ष पटवणारा हा मला भेटलेला पहिला आनंदयात्री! आणि शेवटी, 'कस्तुरीच्या सहवासाने मातीलाही तिचा वास येतो म्हणतात. मला भेटलेल्या आनदयात्रीच्या सहवासामुळे माझ्याही ठिकाणी त्याचा सुवास गोळा झाला असणे शक्य आहे. केवळ तेवढ्यावरून माझे स्नेही मला आनदयात्री म्हणत असावे. 'कवी' म्हणून परमोच्च कीर्तिपदावर आरूढ होऊनही त्याचे ठायीची ही अभिजात विनम्रता पाहून मन थक होऊन जाते.

मन आणखी सुखावते, प्रसन्न पावते ती बोरकर याची सहजी सर्वत्र मिसळण्यातली कुटुंबवत्सलता पाहून.'ससाराची त्रिसूत्री' 'त्यांना घर नाही', खेळणी या लेखामधून हे विशेषत्वाने जाणवते. खेळणीमध्ये खूप वेळ घुमा असलेला पाहुणाही शेवटी राहवेनासं होऊन म्हणतो, 'तुम्ही कविलोकांनी व्यवहारापासून अलिप्त असायला हवं बुवा.' यावर 'व्यवहाराच्या चिखलातूनच आमच्या कलेची कमळं उगवतात; पण चिखल आणि कमळ यांच्यामध्ये उदंड जीवन भरलेलं असतं, हे त्याला बिचाऱ्याला कुठ माहीत होतं? आणि असं असून माझ्या कवितांचे उगम त्याला हवे होते!' हे कविमनातील नैसर्गिक उद्गार ऐकून ओळीओळींपुढे नकळत आपण नतमस्तक होत जातो. — —

'घन वरसे रे', 'पोएट्स पॉइंट', 'निळ्या खाडीच्या काठाला', हे लेख म्हणजे केवळ गद्यकविताच. 'पावसाळी दिवशी संगमाच्या दिशेने भावासह भटकायला जाताना', 'अवाक् होऊन पाऊस पहाताना', कवी बेभान होऊन गाऊ लागतो, 'घन वरसे रे। घन वरसे रे।' बोरकरांच्या कवितांमधीलच सारी उत्कटता, चैतन्य जणू लयतालसुरासह या अवध्या लेखामध्ये साकारले आहे. 'मेघदूत'मध्येही कविराजांचे इंग्रजी—संस्कृत या भाषांवरील प्रभुत्व, मराठीत रूपांतर करतानाचा सहज कलात्मक पदन्यास पाहून मन विस्मित होते.

'पुस्तकातल्या खुणा'मधील वाचनप्रियता

त्र बहुश्रुतता पाहून पटते की, म्हणूनच अशा लेखकांचे लेखन ही एक न संपणारी साधना आहे. 'स्वप्ने' ~~यात स्वप्न साधनेचे थोडे~~ बहुत फळ वाचकांसही चाखावयास मिळते' श्री. अरविंदबाबू (पाँडेचरी), महात्माजी' विनोबाजी, काका कालेलकर या थोर विभूतींजवळ वाचकही काही काळ जीवीच्या जिव्हाळ्याने जाऊन पोचतात–लेखकाचे बोट धरून. स्वातंत्र्यसंग्रामी, गोवामुक्ति-संग्रामी लेखनाइतक्याच मन:पूर्वकतेने तळपलेले बोरकरांऐसे कवी कोणत्याही काळी विरळाच !

श्री. बा. भ. बोरकर यांचेच 'सुशेगाद' या खास गोमंतकीय शब्दांत सांगायचे तर हे लेखन आपणही 'सुशेगाद'पणे वाचत रहातो. पुस्तकाचे शेवटचे पान केव्हा येऊन धडकते–कळत नाही–आणि पुस्तक संपले याची हुरहुरही वाटत रहाते. – –

'परत न आलेली पुस्तके'त त्यांनी म्हटल्याप्रमाणेच...'मला पुस्तक परत करायची आठवण राहात नाही अन् ते एकदा अंतरंगात शिरलं, म्हणजे माझ्यानं ते परत करवत नाही.' हुबेहुब असंच हे 'चांदण्याचे कवडसे' वाचताना–वाचून झाल्यावर वाटत रहातं. – –

आत्मनिर्भरता, आत्मसंयमन, आत्मपरीक्षण अशा मनोरम त्रिवेणीसंगमात 'चांदण्याच्या कवडशा'त आपण डुबत रहातो.

**–सौ. अंजली ठकार**

चांदण्याचे कवडसे<br>
लेखक : बा. भ. बोरकर<br>
मॅजेस्टिक प्रकाशन<br>
कि. २५ रु.

---

# रंगभूमी

## नसिरुद्दीनच्या तीन एकांकिका

वि. भा. देशपांडे

---

१४ जुलैला (शनिवारी) मुंबईच्या 'मोटले ग्रुप' ने तीन एकांकिका भरत नाट्य मंदिरमध्ये पेश केल्या. 'द बेअर' आणि 'द प्रपोजल' ह्या दोन एकांकिका चेकॉव्हच्या होत्या, तर 'हायने मांज लीप' ही जॉन दुनोमरची होती.

चेकॉव्ह या रशियन लेखकाला आपण ओळखतो ते प्रामुख्याने श्रेष्ठ दर्जाचा लघुकथालेखक या नात्याने. लघुकथांच्या बरोबरीने त्याने एकांकिका आणि नाटकांचेही लेखन केलेले आहे. 'इव्हॅनोव्ह', 'द वूड डेमन', 'द सीगल' ही त्याची नाटके प्रसिद्ध आहेत. यातली काही नाटके त्याने स्टॅनिस्लाव्हस्की या जगविख्यात नाट्यमहर्षीबरोबर केलेली होती. ह्या नाटकांप्रमाणेच काही एकांकिकांचे लेखन त्याने केले. 'द बेअर', 'द प्रपोजल' आणि 'द वेडिंग' ह्या तीन एकांकिकांचे लेखन एकेक वर्षाच्या अंतराने म्हणजे १८८८ ते १८९० या कालखंडात केले. (यातली 'द वेडिंग' नसिरुद्दीनने केलेली नाही) ह्या एकांकिकांचे लेखन करताना चेकॉव्हच्या डोळ्यांसमोर फ्रेंच पद्धतीचे फार्सिकल लेखन होते. तो विनोदाचा बाज पकडून रशियन वातावरणात बसतील अशा पद्धतीने त्याने एकांकिकांचे लेखन केले. ते लेखन रशियात त्या काळात लोकप्रियही झाले.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या एकांकिकांमधला विनोद अजूनही ताजा वाटतो. त्यातली मांडणी जरी जुनी किंवा बाळबोध असली तरी मानवी वृत्ति–प्रवृत्तींचे दर्शन चिरंतन वाटणारे आहे. त्यातला उपरोध आजही आपल्याला मनापासून हसवणारा आहे. याचा प्रत्यय 'द बेअर' आणि 'द प्रपोजल' यामध्ये आला. 'द बेअर' या एकांकिकेत एका विधवा स्त्रीची कथा आहे. नवरा गेल्यावर घरामध्ये ती सुतकी वातावरणात स्वत:ला कोंडून घेते. तिच्या नवऱ्याने अनेक आर्थिक उलाढाली (खरे तर उपद्व्याप) केलेले आहेत, ज्यांना या उपद्व्यापाचा फटका बसला आहे ते लोक विचारणा करण्यासाठी येऊ नयेत म्हणून ती पतिनिधनाच्या दु:खाचा मुखवटा धारण करते. तरीही एक व्यापारी तिच्या घरात येऊन आपल्या व्यवहाराविषयी आग्रहाने सांगतो. त्या स्त्रीशी भांडतो, ती पैसे देईपर्यंत तिथेच ठाण मांडून बसतो. प्रथम तो स्त्रीचा द्वेष करतो; पण अखेरीस तिच्या प्रेमात पडतो. या एकांकिकेचा प्रयोग दीर्घकाळ ध्यानात राहील तो नसिरुद्दीन शहाच्या स्वाभाविक अभिनयपद्धतीमुळे. त्याने त्या व्यापाऱ्याच्या भूमिकेतील अनेक छटा बारकाव्याने व्यक्त केल्या. विशेषत: व्यापाऱ्याच्या घरामध्ये आडदांडपणे घुसणे, ठाण मांडून टेबल–खुर्चीवर बसणे, स्त्रीचा द्वेष करणे आणि अखेरीस तिच्या प्रेमात पडणे या साऱ्या गोष्टी अतिशय सहजतेने केल्या. शरीराचा, आवाजाचा संवादफेकीचा वापर लक्षणीय स्वरूपाचा होता.

'द प्रपोजल' मध्ये लग्नाची मागणी. आणि त्या संदर्भात घडलेले नाट्य हे सूत्र आहे. एक तरुण लग्नाची मागणी घालण्यासाठी मुलीच्या घरी येतो. तिच्या बापाची आणि याची गाठ पडते. मागणीला आरंभ एकदम न करता दुसऱ्या विषयाला सुरुवात केली जाते. त्या विषयावरून वाद वाढत जाऊन त्या तरुणाला ती मुलगी घरातून हाकलून देते. नंतर तिचा बाप तिला सांगतो की, तो तुला लग्नाची मागणी घालायला आला होता, तेव्हा ती त्याला पुन्हा बोलावते. पुन्हा कोणाकडचा कुत्रा जातिवंत या विषयावर जोरदार वाद होतो. मघाची आवृत्ती होऊ नये म्हणून बाप दोघांचे हात हातात देऊन लग्न लावतो. ह्या दोन्ही एकांकिकांमधला उपरोधिक विनोद उत्तमपणाने व्यक्त झाला. स्त्री, प्रेम, विवाह ह्या गोष्टींकडे

पाहण्याचा निखळ दृष्टिकोन चेकॉव्हने प्रभावीपणाने मांडला आहे तो तितक्याच प्रत्ययकारीरीतीने कलावंतांनी प्रयोगातून पेश केला.

'हायने मांडा लीप' ही जॉन दुमोनरची एकांकिका तशी सांकेतिक, ढोबळ स्वरूपाची आहे. एक उंच कड्याचे ठिकाण. तिथे नवथर प्रेमवीर आपल्या जिवांचा अंत करण्यासाठी आलेले आहेत. त्यांच्या जीव देण्याच्या रेंगाळलेल्या अवस्थेत तिथे एक त्रिकूट येते. त्यातला नवरा दहा वर्षे संसार झाल्यावर बायकोला कंटाळून जीव देण्यासाठी आलेला आहे. त्याची बायको आणि भाऊ त्याला परावृत्त करू पाहातात, तरी त्याचा निश्चय कायम राहतो. तो कड्यावरून उडी घेतो. भाऊ आणि बायको काही वेळ दुःख व्यक्त करून त्याच्या आठवणी काढतात. ते दोघे एकमेकांशी लग्न ठरवतात आणि तेवढ्यात उडी टाकलेला नवरा जिवंत अवस्थेत परत येतो. नवथर प्रेमीयुगुल जीव देण्याचा आपला बेतही पुढे ढकलतात. विनोदी दर्शनाची ही एकांकिका मानवी वृत्तीचे काही पदर उलगडून दाखवते आणि काही प्रमाणात अंतर्मुखही करते.

तर अशा या तीन विनोदी एकांकिका केवळ इंग्रजी होत्या म्हणून किंवा नसीरने केल्या म्हणून 'थोर' होत्या असे नव्हे. नसीरची निवड, नाट्यअभिरुची, प्रयोगरीती, परिणामकारकता ह्या गोष्टी विशेष महत्त्वाच्या वाटल्या. इतक्या जुन्या एकांकिका काही सूत्र मनात बाळगून चोखपणे पेश करणे ही स्वागतार्ह गोष्ट आहे. या एकांकिकानिमित्ताने आरंभाला त्याने काही वाचनही केले. एखादा नट आपल्या गुणवत्तेच्या आणि लोकप्रियतेच्या बळावर प्रयोगाच्या आधी चक्क पुस्तकात पाहून वाचलेली पाने प्रेक्षकांना ऐकायला लावतो. तो म्हणेल त्या वेळेला प्रेक्षकाला प्रयोगाला यायला लावतो, हे फार महत्त्वाचे आहे. वेळात वेळ काढून नाट्यप्रयोग करतो, आपल्या मस्तीत ते पेश करतो हे त्याहून महत्त्वाचे !

¤

### पुरुषोत्तम बाळ यांचे निधन

पंचवीस-तीस वर्षांपूर्वी छोट्या-मोठ्या स्पर्धांतून काही नावे रंगभूमीवर ऐकू येऊ लागली. त्यामध्ये पुरुषोत्तम बाळ हे नाव होते.

बाळ हा चांगला दिग्दर्शक, नट होता; काही प्रमाणात लेखकही होता. 'गारंबीचा बापू' नाटकात त्याने काही प्रयोगात बापूची भूमिका केली होती. त्या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. 'अमृतवेल', 'त्या कातरवेळी' नाटकांचेही त्याने दिग्दर्शन केले. 'देवदास' नाटकावरून फार मोठा वादही झाला होता. असा कलाकार १८ जुलै ८४ ला निधन पावला. एक गुणी कलाकार या निमित्ताने गेला !

¤

### 'सख्खे शेजारी' शतकमहोत्सव

सई परांजपेलिखित आणि दिग्दर्शित 'सख्खे शेजारी' या नाटकाचा शतकपूर्ती-प्रयोगाचा समारंभ नुकताच मुंबईत संपन्न झाला. लेखन-दिग्दर्शन यावरोबरच कलावंतांचा सतेज, संपन्न अभिनय ही या नाटकाची महत्त्वाची जमेची बाजू आहे. अरुण जोगळेकर, सुहास जोशी, मंगेश कुलकर्णी, सतीश पुळेकर, मीना गोखले आणि संजीवनी बीडकर या कलावंतांचा यात मोठा वाटा आहे; पण या सर्वांना एकत्रित घेऊन नाट्यनिर्मिती करणारे मधुकर नाईक यांची कामगिरी तितकीच महत्त्वाची आहे. यांनी आतापर्यंत संस्थेच्या वतीने निर्माण केलेल्या नाट्यप्रयोगांचे (दुभंग, मुखवटे) शतकांहून अधिक प्रयोग घडलेले आहेत. 'सख्खे शेजारी' ही अशीच अनेक शतके गाठेल असा विश्वास आहे. ☐

# ओम् पुरी

## आक्रोश ते अर्धसत्य

नुकतेच ओम् पुरीला झेकोस्लोव्हाकियातील आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवात भाग घेणं ही भारताच्या दृष्टीनं नवीन बाब नाही; पण अशा महोत्सवात मानसन्मान मिळणं ही तशी नवलाचीच गोष्ट म्हणायला हवी.असा एक मान ओम पुरीनं अगदी नुकताच पटकावला. हा मान त्याला 'अर्धसत्य' मधल्या भूमिकेबद्दल मिळाला आहे. झेकोस्लोव्हाकियातल्या 'कार्लोव्हा व्हॅरी' चित्रपटमहोत्सवात त्याला सर्वोत्कृष्ट अभिनयाचा मान मिळाला. विशेष म्हणजे हा मान मिळवणारा तो फक्त तिसरा भारतीय. यापूर्वी पृथ्वीराज कपूरला 'आसमान महल' चित्रपटातल्या भूमिकेबद्दल, तर नर्गीस दत्तच्या 'मदर इंडिया' तल्या अभिनयाबद्दल तिला याच महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल गौरवण्यात आलं होतं.

चित्रपटातली 'व्यक्ती' असं अभिनेत्याचं स्वरूप नसतं, तर बरेचदा 'व्यक्तींचा' चित्रपट म्हणूनच बरेचसे चित्रपट ओळखले जातात. जसा आता स्मिता पाटीलच्या चित्रपटांचा परदेशात महोत्सव भरत आहे. ओम पुरीच्या चित्रपटांचा खास महोत्सव भरवण्याइतका ओम पुरी अजून नावाजला गेला नसला तरी, त्याच्या विविध भूमिकांबद्दल लिहिण्यासारखं मात्र खूप आहे.

अभिनेता/अभिनेत्री होण्यासाठी सुंदर चेहरा आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व हवंच असा एक अपरिहार्य निकष होऊन बसलाय. (काही जणांचा मात्र बरा चेहरा आहे म्हणूनच आपण सहन करतो.) अशा या झगमगाटाच्या दुनियेत, कुरूप जरी म्हटलं नाही तरी सुंदरही नसलेल्या ओम पुरीनं प्रवेश करून, उत्तम यशही मिळवून दाखवलंय.

'आर्ट फिल्म' हे लेबल टाळून बोलायचं म्हटलं तर, ओम पुरीनं आतापर्यंत वास्तववादी चित्रातच कामं केली आहेत. त्यामुळे त्याच्या या भूमिकांत सुंदर चेहरा असता तर तोच कदाचित एक मोठा दोष ठरला असता. अर्थात आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा

अभाव हे त्याच्या यशाचं कारण नसून चांगला अभिनय हे त्याचं कारण आहे.

'आक्रोश' ~~पासून सुरुवात केल्यावर,~~ आतापर्यंत ओम पुरीच्या भूमिका असलेले आणि आवर्जून नाव घ्यावे असे स्पर्श, मंडी, अर्धसत्य आणि जाने भी दो यारो हे हिंदी चित्रपट येऊन गेले. त्याचा 'भवनी भवई' हा गुजराथी चित्रपटही दूरदर्शनमुळं आपल्याला पाहायला मिळाला तर दूरदर्शनच्या 'सद्‌गती' मध्ये तो दिसला. ओम पुरीनं इतरही प्रादेशिक भाषांतल्या चित्रात काम केलं आहे; पण ते चित्रपट सर्वसामान्य मराठी प्रेक्षकांपर्यंत अजून तरी पोचलेले नाहीत.

हा रंगभूमीवरचा कलावंत गोविंद निहलानींच्या 'आक्रोश' द्वारा हिंदी चित्रपटसृष्टीत आला. यात त्यानं नायिकेच्या पतीचं (तो मुका आहे) काम केलं आहे चित्रपटभर तो एक अक्षरही न बोलता सत्ताधाऱ्यांविषयीची त्याची चीड, संताप आणि स्वतःची असमर्थता ज्या रीतीनं व्यक्त करतो, त्यानं अस्वस्थ होऊन जायला होतं. संताप ओकणारे त्याचे डोळे प्रामुख्यानं लक्षात राहतात आणि अभिनयात डोळ्यांनाही किती महत्त्व आहे हे लक्षात येतं.

ओम पुरीचे डोळे हाच त्याच्या अभिनयाचा महत्त्वाचा भाग आहे, हा समजही त्यानं 'स्पर्श' मध्ये खोटा पाडलाय. हा आंधळा शिक्षक–दुबे–आपल्याला चित्रपटभर जेमतेम दहा मिनिटंच दिसत असेल; पण पत्नी गेल्यावर, 'हॅपीली मॅरीड ? टू अ ब्लाइंड मॅन ?' म्हणणाऱ्या दुबेची अंतरीची वेदना, बायकोनं अंधत्वाबरोबरच पंगुत्वही दिल्याची विदारक जाणीव त्यातून बरोबर व्यक्त होते. दृष्टिहीन डोळ्यांची ती विचित्र हालचाल, स्वतःच्या असमर्थतेची चीड दाखवण्यात, त्या लहानशा दृश्यातही ओम पुरी यशस्वी झाला आहे.

ओम पुरी एका दृष्टीनं नशीबवान आहे. तो असा की, या लहान कारकीर्दीतही त्याला अगदी विविध प्रकारच्या भूमिका मिळाल्या. 'आक्रोश' मध्ये असहाय्य मजूर, तर 'स्पर्श' मध्ये आंधळा शिक्षक, 'मंडी' मध्ये वेश्यावस्तीत स्टुडिओ उभारलेला एक चालू फोटोग्राफर, 'जाने भी दो यारो' त मद्यपी कॉन्ट्रॅक्टर तर 'अर्धसत्य' मध्ये इन्सपेक्टर. 'भवनी भवई' त गाण्यातून कथा सांगणारा सूत्रधार आणि अस्पृश्य नायकाचा पिता असं ~~आजं स्वरूप दिसतं.~~

कारकीर्दीच्या सुरुवातीला इतक्या विविध प्रकारच्या भूमिका मिळाल्या, त्या उत्तम तऱ्हेनं करून दाखवल्या की, मग कुठल्याही 'टाइपा' चा शिक्का बसत नाही. असा 'टाइप' आपण बनू नये अशी काळजी अभिनेत्यानंही घ्यायला हवी. ओम पुरीमध्ये तो दूरदर्शीपणाही आहे आणि म्हणूनच 'अर्धसत्य' च्या यशानंतर, नोटांच्या थप्प्या बरोबर आणणाऱ्या इन्सपेक्टरच्या भूमिका त्यानं नाकारल्या. [एकामागोमाग इन्सपेक्टरच्याच भूमिका करणं त्याच्यातल्या अभिनेत्याला मानवण्यासारखं नव्हतं.

'मंडी' आणि 'जाने भी दो यारो' मधली त्याची कामं काहीशी विनोदी स्वरूपाची होती. 'मंडी' तला वेश्यांच्या मागंमागं करून त्यांचे हवे तसे फोटो काढणारा रामदयाल फोटोग्राफर, त्याच्या अतिसामान्य रूपामुळे आणि हलक्या प्रतीच्या भडक कपड्यांमुळे विशेष खुलून दिसतो.

'जाने भी दो यारो' तला मद्यपी कॉन्ट्रॅक्टर आणि एका प्रेतासाठी सगळ्यांनी घातलेला गोंधळ मला स्वतःला बिलकुल आवडला नव्हता. लहानशा शवपेटिकेला खरी मोटार समजून वागणारा हा कॉन्ट्रॅक्टर आणि मग 'महाभारता' वरच्या नाटकात शिरून, तशीच वेशभूषा करून हवे ते संवाद म्हणणारी ही पात्रं हा सगळाच प्रकार अगदी बालिश आहे. त्यामुळे या चित्रपटात ओम पुरी निष्प्रभच वाटतो. त्याच्या सहज अभिनयाला इथं वाव मिळाला नाही आणि एक वेगळी भूमिका एवढंच या भूमिकेचं महत्त्व राहिलं.

ज्या पारितोषिकामुळं या सगळ्या लेखाचा प्रपंच केला त्या पारितोषिकपात्र भूमिकेबद्दलच लिहिलं नाही तर ओम पुरीविषयीचं बोलणं अपूर्ण राहिलं असं म्हणावं लागेल. याचं कारण असं की, 'अर्धसत्य' मध्ये त्याला महत्त्वाची व्यक्तिरेखा होती. बाकीच्या सर्व चित्रपटांत त्याला गौण भूमिका होत्या; पण चित्रपट त्यानं साकारलेल्या 'अनंत वेलणकर' चाच आहे.]


भूमिका महत्त्वाची म्हणून त्याविषयी बोललं पाहिजे असं नाही, तर बोलायचं ते त्याच्या उत्कट अभिनयाविषयी. 'अर्धसत्य' चित्रपटानं व्यावसायिक उच्चांक मोडलेच; पण रसिकांची (बहुशः) एकमुखी वाहवाही मिळवली. तर ओम पुरीनं या चित्रपटाद्वारा अभिनेता म्हणून एक विशेष स्थान मिळवलं. याच भूमिकेसाठी त्याला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला.

या भूमिकेसाठी त्याला पूर्वतयारीही बरीच करावी लागली. मोटारसायकल शिकावी लागली, इन्स्पेक्टरच्या रुबाबात चालण्यासाठी तर बराच सराव करावा लागला. त्याच्याच शब्दात सांगायचं तर त्याची चाल एकदम 'ढिली' आहे. ताठ आणि ताठ्यात चालणं, त्याच्या दृष्टीनं नवीन; पण त्यानं साकारलेला इन्स्पेक्टर बघताना त्याच्या चालण्यात रुबाब आणि गुर्मी प्रकर्षानं जाणवते.

स्त्रियांची छेड काढल्यावर, त्याचा होणारा संताप, स्वतःच्या शौर्याचं पदक दुसऱ्याच्या गळ्यात पडल्यावर त्याला आलेली चीड, रामा शेट्टीसारख्या भ्रष्टाचाऱ्यासमोर वाकायला लागलं म्हणून निर्माण झालेला उद्वेग आणि एकंदर सर्वच परिस्थितीचा त्याला आलेला वीट, या सगळ्या छटा त्यानं अगदी बारकाव्यांनिशी दाखवल्या आहेत.

'चक्रव्यूहसे निकलनेके बाद मुक्त हो जाऊँ भलेही, लेकिन चक्रव्यूहकी रचना में फर्कही ना पडे' याची जाणीव झाल्यावर, ज्योत्स्नाजवळ थरथरत्या ओठानं त्यानं आपल्या असमर्थतेचा व्यक्त केलेला 'एहसास' हे सगळे प्रसंग एका कुशल अभिनेत्याचीच ओळख पटवतात.

अशा या उत्तम अभिनेत्याला आणि आपल्यातल्याच वाटणाऱ्या या निगर्वी माणसाला असंच यश पुढंही प्राप्त होईल, अशी इच्छा केली तर ती फारशी वावगी ठरणार नाही.



मनःचक्षूचे सामर्थ्य

विद्याची समस्या एक प्रकारे सोपी होती. कारण तिला तिच्या भावाशीच मुकाबला करावयाचा होता. सरोजचा प्रश्न जरा बिकट होता. तिचे लग्न होऊन दोन वर्षे झाली होती. एकूण तिचा संसार सुखाचा होता, तरी एका कारणामुळे ती स्वतःला फार अस्वस्थ करून घेत असे. ते म्हणजे तिच्या सासूबाईंचा रागीट स्वभाव ! एखाद्या अगदी क्षुल्लक गोष्टीमुळेही त्यांच्या रागाचा पारा एकदम चढत असे व त्यामुळे सरोजही आपले मनःस्वास्थ्य घालवून बसत असे.

□

लेखांक : सात । लेखक : कि. मो. फडके

# स्वहिताचे रक्षण

गौतम स्वतःला एक सरळमार्गी व सुस्वभावी माणूस समजतो.

त्याचा स्वतःबद्दलचा हा समज काही अनाठाई नाही. गेली बारा वर्षे तो एका शासकीय कचेरीत अधिकारी म्हणून काम करीत आहे. त्याच्या कामाचे स्वरूप असे आहे की, तो मनात आणेल तर त्याला रोज आपला खिसा नोटांनी भरगच्च भरणे सहज शक्य आहे; परंतु तो अतिशय संवेदनाशील व पापभिरु वृत्तीचा माणूस असल्यामुळे, त्याने कोणत्याही गैरमार्गाने कधी एक रुपयासुद्धा आपल्या खिशात घातलेला नाही. त्याच्या या प्रामाणिकपणाची त्याचे मित्र कधीकधी चेष्टा करतात, तरीसुद्धा त्याने आपला घोपटमार्ग सोडलेला नाही किंवा मित्रांच्या चेष्टेला त्याने कधी सात्त्विक संतापाने उत्तरही दिलेले नाही. तेव्हा तो सरळमार्गी व सुस्वभावी नाही असे कसे म्हणता येईल ?

परंतु गौतमच्या स्वभावाचे दुसरेही एक वैशिष्टय आहे. आपल्या व्यक्तित्वाच्या त्या दुसऱ्या वैशिष्टयाचीही गौतमला जाणीव आहे. इतकेच नव्हे तर, आपल्या व्यक्तित्वाचे ते दुसरे वैशिष्टय आत्मघातकी आहे, हेही तो मनमोकळेपणाने कबूल करतो. आपल्या व्यक्तित्वाच्या त्या आत्मघातकी वैशिष्टयाचे वर्णन तो, 'माझा भिडस्त व संकोची स्वभाव' असे करतो. 'भीड भिकेची बहीण' ही म्हण अगदी बरोबर आहे, असे तो अनेक वर्षे म्हणत आहे; पण चाळिशी जवळ आली तरीसुद्धा त्याच्या भिडस्त व संकोची स्वभावात काही बदल झालेला नव्हता.

आपल्या व्यक्तित्वाच्या आत्मघातकी वैशिष्टयाचे वर्णन करताना गौतम नेहमी 'भिडस्त' व 'संकोची' ही विशेषणे वापरीत असे, तरी वस्तुतः त्याच्या भिडस्त व संकोची स्वभावाच्या मुळाशी एक भीती ठाण मांडून बसलेली होती. ती म्हणजे 'लोक काय म्हणतील' याबद्दलची भीती ! या भीतीमुळे रोजच्या जीवनातील सर्वसामान्य प्रसंगांना तोंड देतानाही, गौतम कमालीचा चिंतातुर होऊन जात असे व अनेक वेळा तर तो आर्थिक नुकसानही सोसत असे.

समजा गौतमने आपल्या एखाद्या मित्राला सहकुटुंब जेवावयास बोलविण्याचे ठरविले असले, तरी त्या मित्राला प्रत्यक्ष फोन करण्यापूर्वी दहा वेळा गौतम आपला त्या मित्राला काय वाटेल असा विचार करीत बसून वेळ वाया घालवीत असे. तसेच कोणी मित्र अथवा नातेवाईक आजारी असेल तर त्याला भेटावयास जाणे किंवा एखादी नात्यातील अगर परिचित व्यक्ती निधन पावली, तर त्या व्यक्तीच्या कुटुंबातील मंडळींना भेटावयास जाऊन त्यांचे सांत्वन करणे या गोष्टी म्हणजे तर गौतमला मोठे संकट वाटत असे. कारण अशा प्रसंगी आपले वागणे अथवा बोलणे रीतीला धरून झाले नाही, तर लोक काय म्हणतील या कल्पनेने तो अर्धमेला होऊन जात असे !

गौतमच्या या स्वभावामुळे, आयुष्यात त्याने स्वतः तर कधी कोणाकडून पैसे उसने मागितले नव्हतेच; पण कोणाकडून कधी एखादे पुस्तक अथवा साधे वर्तमानपत्रसुद्धा वाचावयास आणले नव्हते. उलट त्याचे मित्र जेव्हा त्याच्याकडे पुस्तकेच काय पण पैसेही उसने मागत असत, तेव्हा त्यांना नकार देणे त्याला कधीच जमले नव्हते. कारण मित्रांना 'नाही' म्हटले तर त्यांना काय वाटेल व ते काय म्हणतील याची त्याला भीती वाटत असे आणि त्याने एखाद्या मित्राला एखादी वस्तू उसनी दिली असेल व ती वस्तू त्या मित्राने परत केली नसेल, तर तो त्याबद्दल आपल्या मित्राला काहीच बोलत नसे. त्यामुळे घरी परत न आलेल्या किती तरी वस्तूंवर गौतमने पाणी सोडले होते. त्याच्या या स्वभावामुळेच त्याचे व त्याच्या बायकोचे अनेकदा खटके उडत असत. बहुधा याच कारणामुळे गौतमने एक दिवस माझी गाठ घेऊन माझा सल्ला विचारला.

गौतमच्या चिंतातुरतेच्या व आत्मघातकी वर्तनाच्या मुळाशी, 'लोक काय म्हणतील' ही भीती रुजलेली होती, हे ओळखून मी

त्याला प्रथम अगदी सोपा उपाय करून पाहण्यास सांगितले. तो उपाय मी त्याला खालील पद्धतीने सुचविला.

'गौतम, तू डोळे मिटून स्वस्थपणे या आरामखुर्चीत बस. आता तुझ्या मनःपटलावर प्रथम असे चित्र रेखाटण्यास सुरुवात कर की, तुझा एक मित्र काविळीने आजारी असून तो बरेच दिवस अंथरुणाला खिळून आहे असे तुला समजले आहे. त्यामुळे त्याला भेटण्यासाठी तू त्याच्या घरी गेला आहेस. तू त्याच्या घराच्या दारावरील घंटा वाजविल्यानंतर थोड्याच वेळात त्या मित्राच्या मुलाने दार उघडून तुझ्याकडे पाहून तुला ओळखल्यामुळे तो, 'गौतमकाका आले आहेत' असे सांगत आत गेला आहे. लगेच तुझ्या मित्राची बायको बाहेर येते व तुला घरात घेऊन जाते. तुला पाहून, तुझ्या मित्राला बरे वाटले आहे. त्याच्या शेजारी बसण्यासाठी, तू त्या खोलीतील एक खुर्ची त्याच्या पलंगाजवळ ओढू लागतोस. त्या वेळी चुकून, पलंगाशेजारी ठेवलेल्या एका लहान टेबलाला तुझा धक्का लागतो व त्या टेबलावरील एक काचेचा ग्लास व काही बाटल्या इत्यादी गोष्टी धाडकन जमिनीवर कोसळून पडतात व फुटतात.

तुझ्या मित्राची बायको तेथेच असते आणि आवाज ऐकून तुझ्या मित्राचा मुलगाही लगेच त्या खोलीत येतो; परंतु तुझा मित्र, त्याची बायको किंवा त्यांचा मुलगा यांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे अस्वस्थ होत नाहीत अथवा कोणाच्याही चेहऱ्यावर राग किंवा नाराजी दिसत नाही. मात्र तुझ्या मित्राची बायको व त्यांचा मुलगा जमिनीवरील काचा वगैरे आवरून टाकण्याच्या कामाला लागतात.

थोडा वेळ बसून, मित्राच्या प्रकृतीची विचारपूस करून, तू त्याचा निरोप घेतोस. तेव्हा घरातील तिघेही जण तुला निरोप देतात. त्या वेळी कोणाच्याही चेहऱ्यावर, तुझ्याबद्दल कसलीही नापसंती दिसत नाही. सारांश,

तुझा चुकून टेबलाला धक्का लागल्यामुळे एक ग्लास, काही बाटल्या व इतर काही गोष्टी फुटल्या, या घटनेकडे त्या तिघांनीही पूर्ण दुर्लक्ष केले आहे.'

डोळे उघडल्यावर गौतमने एक निःश्वास सोडला आणि तो म्हणाला की, माझ्या सूचनेप्रमाणे त्याने त्याच्या मनःपटलावर जी चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न केला होता, ती चित्रे त्याच्या मनातील नेहमीच्या प्रतिमांहून अजिबात वेगळी होती. मी त्याला मनःचक्षूच्या सामर्थ्याने ही नवी चित्रे पाहण्याचा सराव करण्यास सांगून, त्याचा निरोप घेतला.

### विद्येची सोपी समस्या

दुसऱ्या दिवशी सकाळी, गौतमने मला फोन करून असे विचारले की, त्याच्या आजारी मित्राला भेटावयास जाण्याच्या प्रसंगासंबंधी, मी त्याला ज्या प्रतिमा त्याच्या मनःपटलावर रेखाटण्यास शिकविले होते, त्याच प्रकारच्या प्रतिमा त्याला त्याच्या जीवनातील अनेक प्रसंगांसंबंधीही आपल्या मनःपटलावर रेखाटणे शक्य नाही काय ? मी त्याला असे उत्तर दिले की, ही कल्पना त्याला सुचावी, याच हेतूने मी आदल्या दिवशी त्याला आपल्या मनःपटलावर प्रतिमा रेखाटण्याची एक विशिष्ट पद्धत शिकविली होती आणि ज्या प्रकारची प्रतिमासृष्टी तो आपल्या आजारी मित्राला भेटावयास जाण्याच्या प्रसंगाविषयी आपल्या मनःपटलावर उभी करू शकला होता, तशाच



प्रकारची प्रतिमासृष्टी त्याला, कोणाला घरी जेवावयास बोलविणे, निधन पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना भेटावयास जाणे अथवा एखाद्या मित्राने उसनी नेलेली वस्तू परत मागणे इत्यादी प्रसंगांविषयी, आपल्या मनःपटलावर उभी करता येईल. अर्थात मी त्याला असेही सांगितले की, तो माझ्याकडून शिकला होता त्या पद्धतीचे मर्म म्हणजे, त्याच्या बोलण्यात अथवा वागण्यात जरी काही चूक झाली, तरी लोक अजिबात कटू प्रतिक्रिया दर्शवीत नाहीत, अशीच प्रतिमासृष्टी स्वतःच्या मनःपटलावर उभी करणे.

मी शिकविलेल्या पद्धतीचे मर्म गौतमच्या मनावर चांगलेच ठसले. 'लोक काय म्हणतील' या आपल्या मनातील भीतीवर तोडगा म्हणजे, आपल्या मनःपटलावर मुद्दाम अशा प्रतिमा रेखाटणे की, लोक आपल्या बोलण्याविषयी किंवा वागण्याविषयी कोणतीही अप्रिय प्रतिक्रिया व्यक्त करीत नाहीत, ही कल्पना त्याला अतिशय आकर्षक व नाविन्यपूर्ण वाटली. साहजिकच त्याने माझ्याकडून शिकलेल्या या पद्धतीनुसार, आपल्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करण्यास प्रामाणिकपणे सुरुवात केली. नंतर दोन आठवड्यांनी मला फोन करून, त्याने एक आनंदाची बातमी सांगितली. तो म्हणाला की, दोन मित्रांनी त्याच्याकडून सुमारे एक वर्षापूर्वी उसन्या म्हणून नेलेल्या वस्तू, त्याने परत मिळविल्या होत्या व त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला होता.

ही झाली गौतमची कथा; परंतु वरील पद्धतीचा अवलंब करून, विद्याला जो अनुभव आला तो अधिक बोलका आहे. तीन वर्षांपूर्वी विद्याचे वडील वारल्यानंतर, तिच्या घरातील सर्व जबाबदारी तिच्या मोठ्या भावाच्या शिरावर पडली होती. तिच्या भावाचा स्वभाव मुळातच रागीट होता आणि लहान वयात सर्व कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर पडल्यामुळे तो कधीकधी फारच चटकन संतापत असे. उलट, विद्या अतिशय संवेदनाशील मुलगी होती. आपल्या मोठ्या भावावर सर्व कुटुंबाची जबाबदारी पडली होती, हे ओळखून ती घरात स्वतःकडे नेहमी पडती बाजू घेत असे. त्याचा परिणाम असा

झाला होता की, तिचे जीवन काहीसे खुरटल्यासारखे झाले होते. आपल्या मनातील किती तरी आशा–आकांक्षा, तिने घरात कधी कोणाजवळ बोलूनही दाखविल्या नव्हत्या; पण असा कोंडमारा ती तरी किती दिवस सहन करणार ?

एक दिवस, तिने तिच्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील नाटकात काम करण्याचे ठरविले. तिला माहीत होते की, तिने आपल्या मनातील विचार घरात बोलून दाखविल्याबरोबर तिचा मोठा भाऊ आकांडतांडव करणार होता. म्हणून तिने चार दिवस आपल्या मन.पटलावर अशी प्रतिमासृष्टी उभी करण्याचा सराव केला की, एक दिवस रात्री जेवण झाल्यावर तिने आपल्या मनातील बेत घरात बोलून दाखविला आहे; परंतु महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात होणाऱ्या नाटकात काम करण्याचा तिचा इरादा ऐकूनही तिचा मोठा भाऊ त्यावर कोणतीही अप्रिय प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही. तिचे सर्व बोलणे तो शांतपणे ऐकून घेतो; पण कोणत्याही प्रकारे तिच्या इच्छेविरुद्ध बोलत किंवा वागत नाही.

विद्याने चार दिवस आपल्या मन पटलावर वरीलप्रमाणे प्रतिमा रेखाटण्याचा सराव केल्यावर,एक दिवस रात्री जेवण झाल्यावर आपल्या मनातील बेत घरात बोलून दाखविला. प्रत्यक्षात असे झाले की, तिचा बेत तिच्या भावाला अजिबात आवडला नाही. त्याने आपली नापसंती रागारागाने बोलूनही दाखविली. तरी सुद्धा नेहमी दबकत, आपल्याकडे पडती बाजू घेऊन वागणाऱ्या विद्याने, आपल्या भावाशी वाद घातला. शिवाय तिने त्याला असेही सांगितले की, त्याने असे रागविण्याऐवजी तिला नाटकात काम करण्यास प्रोत्साहन दिले असते, तर तिला त्याच्याबद्दल अधिक आदर वाटला असता. तिच्या बोलण्याचे तिच्या भावाला आश्चर्य वाटले; पण अखेर विद्याला विरोध करणे बरोबर नाही, हे ओळखून त्याने विद्याच्या इच्छेविरुद्ध न जाण्याचा मार्ग स्वीकारला व विद्याने आपल्या मनातील बेत तडीस नेला.

विद्याच्या अनुभवावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे, तिच्या मन:पटलावर तिने रेखाटलेल्या प्रतिमा व तिच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेली घटना, यामध्ये बरीच तफावत होती. कारण प्रत्यक्ष जीवनात तिच्या भावाने तिचा बेत ऐकल्याबरोबर चिडून जाऊन तिला विरोध केला होता. तरीसुद्धा विद्याने तिच्या मन:पटलावर ज्या प्रतिमा रेखाटण्याचा सराव केला होता त्याचा परिणाम असा झाला होता की तिच्या भावाने तिला विरोध केल्यावर तिने माघार न घेता आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा शांतपणे पण नेटाने प्रयत्न केला. तिने आपल्या मनातील रंगभूमीची जी आराधना केली होती, त्यामुळे जीवनातील परिस्थितीला ती कच न खाता सामोरी जाऊ शकली.

विद्याची समस्या एक प्रकारे सोपी होती. कारण तिला तिच्या भावाशीच मुकाबला करावयाचा होता. सरोजचा प्रश्न जरा बिकट होता. तिचे लग्न होऊन दोन वर्षे झाली होती. एकूण तिचा संसार सुखाचा होता, तरी एका कारणामुळे ती स्वत:ला फार अस्वस्थ करून घेत असे. ते कारण म्हणजे तिच्या सासूबाईंचा रागीट स्वभाव ! एखाद्या अगदी क्षुल्लक गोष्टीमुळेही त्यांच्या रागाचा पारा एकदम चढत असे व त्यामुळे सरोजही आपले मन.स्वास्थ्य घालवून बसत असे. सरोजच्या या समस्येवर उपाय म्हणून, मी तिला मानसचित्रांचा उपयोग कसा करावा हे खालील प्रकारे शिकविले.

'सरोज, तू अगोदर डोळे मिटून शांतपणे या आरामखुर्चीत बस. आता तुझ्या मन:पटलावर असे चित्र रंगविण्यास सुरुवात कर की, सकाळचे १० वाजले आहेत. तू व तुझ्या सासूबाई दोघीच घरात आहात तुला एका मैत्रिणीचा टेलिफोन येतो. तू त्या मैत्रिणीशी फोनवर बराच वेळ बोलतेस व नंतर फोनचा रिसिव्हर खाली ठेवून तुझ्या कामाला लागतेस; परंतु लगेच तुझ्या लक्षात येते की, सकाळच्या कामाच्या वेळी तू तुझ्या मैत्रिणीशी इतका वेळ फोनवरून बोलत होतीस, हे तुझ्या सासूबाईंना अजिबात आवडलेले नव्हते. त्या तुला काहीच बोलत नाहीत, तरी त्यांच्या चेहऱ्यावरून असे स्पष्ट दिसत आहे की, त्या तुझ्यावर रागवल्या आहेत

### चार दिवसांनंतर

आता तू तुझ्या सासूबाईंचा रागवलेला चेहरा स्पष्टपणे तुझ्या मन:पटलावर चित्रित कर. त्यांच्या कपाळावरील आठ्या, तू समोर असूनही दुसरीकडे पाहणारे त्यांचे डोळे, थोडयाशा फुगलेल्या नागपुड्या व भाड्यांची आदळआपट, हे सर्व काही अगदी रेखीवपणे तुझ्या मन:पटलावर रंगविण्यास तू विसरू नकोस. एकदा त्यांचा तो रागवलेला चेहरा तुझ्या मन:पटलावर पूर्णपणे साकारला की, अगदी बारकाईने त्या चेहऱ्याचा तू अभ्यास कर. तुझ्या मन:चक्षूच्या मदतीने त्या चेहऱ्यावरील नापसंतीच्या सर्व खुणाचे नीट निरीक्षण कर. थोडक्यात म्हणजे, तुझ्या सासूबाईंच्या संतप्त चेहऱ्याचे सुस्पष्ट चित्र तू तुझ्या मन:पटलावर उभे कर व दोन मिनिटे त्या चित्राचा तू काळजीपूर्वक अभ्यास कर. आजपासून हा स्वाध्याय तू दिवसातून दोन वेळा करावयाचा सराव कर !'

मी शिकविलेली पद्धत सरोजला प्रथम काहीशी चमत्कारिक वाटली. तिचे म्हणणे असे होते की, तिला तिच्या सासूबाईंच्या रागीट स्वभावामुळेच तर मनस्ताप होत होता. तेव्हा परत सासूबाईंचा रागीट चेहरा मन पटलावर रंगवून, त्याचा बारकाईने अभ्यास करण्यात काय हशील ? तरीही केवळ एक प्रयोग म्हणून, तिने मी दिलेला गृहपाठ रोज दोन वेळा करून पाहण्याचे मान्य केले. सुदैवाने फक्त चारच दिवसांनंतर तिला मी दिलेल्या गृहपाठाचे फायदे स्वानुभवाने पडताळून पाहता येऊ लागले. कारण त्यानंतर जेव्हा एकदा तिच्या सासूबाईंच्या रागाचा पारा अचानक चढला, तेव्हा तिला नेहमी इतकी अस्वस्थता जाणवली नाही उलट, आपण इतक्या शांत कशा राहू शकतो, याचेच तिला आश्चर्य वाटले आणि काही आठवड्यानंतर तिने कबूल केले की, सासूबाईंच्या रागीट स्वभावामुळे ती आता आपले स्वत:चे मन:स्वास्थ्य घालवून बसत नाही.

सरोजच्या उदाहरणावरून असे समजण्याचे कारण नाही की, पुरुष नशीबवान असतात. कारण स्त्रियांना जसा या ना त्या प्रकारे सासुरवास सहन करावा लागतो, तसा तो पुरुषाना कधी सहन करावा लागत नाही. कारण पुरुषांच्या वाट्याला जरी कधी सासुरवास येत नसला, तरी त्यांनाही घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्या नाराजीला, विरोधाला व संतापाला तोंड द्यावे लागत असते कधी–कधी घरातील वडीलधाऱ्या मंडळींच्या नाराजीमुळे किंवा विरोधामुळे निर्माण होणाऱ्या समस्या पुरुषाना कशा जाचक ठरतात, हे जितेंद्रच्या उदाहरणावरून कळून येईल.

दहा वर्षांपूर्वी जितेंद्र पदवी–परीक्षा पास झाला व त्याने आपल्या वडिलांच्याच पुस्तके प्रकाशित करण्याच्या धंद्यात पदार्पण केले. चार वर्षांपूर्वी त्याने सध्याकाळी महाविद्यालयात जाऊन, व्यवस्थापनशास्त्रातील एक पदवीही मिळवून टाकली होती. पुस्तके प्रकाशित करण्याचा, त्याच्या वडिलानी चाळीस वर्षांपूर्वी सुरू केलेला धंदा, उत्तम चालला होता; परंतु अनेक वेळा जितेंद्रला त्याच्या वडिलांचे विचार, त्यांच्या योजना व काम करण्याच्या पद्धती अजिबात पसत पडत नसत शिवाय. काही लेखक, पुस्तकविक्रेते व छापखान्याचे मालक जितेंद्रला नगण्य समजून, तो काहीही म्हणाला तरी ते आपली कामे त्याच्या वडिलाकडून करवून घेत असत. अशा वेळी जितेन्द्रचे वडीलही, मधल्यामधे आपल्या मुलाची स्थिती कशी बिकट होत असेल, या गोष्टीकडे फारसे लक्ष देत नसत. तरीसुद्धा, जितेन्द्र कधी

कोणत्या बाबतीत वडिलांशी वाद घालीत नसे अथवा आपली मते त्यांना स्पष्टपणे सांगत नसे. अशा प्रकारे तो नेहमी आपल्या वडिलांचा मान राखण्याचा प्रयत्न करीत असे; पण त्यामुळे तो कित्येकदा मनातल्या मनात फारच अस्वस्थ होत असे.

जितेन्द्रच्या पुढील ही समस्या जास्त बिकट होण्यास आणखीही एक कारण होते ते म्हणजे त्याच्या स्वभावातील व त्याच्या वडिलांच्या स्वभावातील फरक! जितेन्द्रचा स्वभाव मुळातच काहीसा मृदू व शांत होता. उलट त्याच्या वडिलांचा स्वभाव मुळातच काहीसा कठोर व रागीट होता. त्यामुळे कोणतीही गोष्ट त्यांच्या मनाविरुद्ध घडली की, ते एकदम भडकत असत व तोंडाचा पट्टा चालू करीत असत. जितेन्द्रला त्यांचा हा स्वभाव माहीत असल्यामुळे तो नेहमी त्यांना वचकून वागत असे; परंतु त्यामुळे त्याला असेही वाटत असे की, त्यांच्या धंद्याच्या प्रगतीच्या दृष्टीने, काही अभिनव प्रकाशने बाजारात आणण्याच्या दृष्टीने व त्यांच्याकडील कर्मचारीवर्गाच्या हिताच्या दृष्टीने विचार केला, तर त्याने आपल्या वडिलांच्या रागीट स्वभावाला नेहमी भिऊन, कुढत बसणे काही योग्य नव्हते.

जितेन्द्र मला भेटावयास आला, तेव्हा त्याच्या मनात एक नवी योजना आकार घेऊ लागली होती. मात्र त्या योजनेसंबंधी वडिलांशी कसे बोलावे, हे त्याला समजत नव्हते. कारण आपल्या मनातील योजना वडिलांना सांगितली, तर ते त्या योजनेचा अजिबात विचार करणार नाहीत, अशी त्याची खात्री होती मी त्याला आपल्या समस्येला सामोरे जाण्यासाठी मन.चक्षूचा उपयोग करावयास कसे शिकविले, ते आम्हा दोघांमधील झालेल्या खालील संवादावरून कळून येईल.

## तू तसं का करत नाहीस?

मी : तुझ्या मनात सध्या कोणती योजना आहे?

जितेन्द्र : एक विज्ञानाचे शिक्षक आहेत. त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एक छोटेखानी पुस्तक लिहिले आहे, त्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत त्यांनी मला वाचावया दिली आहे. मी ते हस्तलिखित पुस्तक वाचून काढले आहे. माझे असे प्रामाणिक मत आहे की, त्या शिक्षकांनी आपल्या पुस्तकात सोप्या व चटकदार शैलीत, विद्यार्थ्यांना गोष्टीरूपाने आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीची ओळख करून दिली आहे. त्या शिक्षकांनी मला असेही सांगितले आहे की, अशाच प्रकारची आणखी पाच पुस्तके लिहिण्याचा त्यांचा विचार आहे. आम्ही आजपर्यंत अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित केलेली नाहीत; परंतु या नव्या क्षेत्रात पाऊल टाकण्यास काहीच हरकत नाही, असे मला अगदी मनापासून वाटते.

मी : मग तुझ्यापुढे अडचण कोणती आहे?

जितेन्द्र : मुख्य अडचण अशी आहे की, माझ्या डोक्यात एका नव्या क्षेत्रात पाऊल टाकण्याची जी योजना आहे, त्या योजनेतील सहा पुस्तके म्हणजे काही क्रमिक पुस्तके नव्हेत त्यामुळे मी जर माझ्या वडिलांना ही योजना सांगितली, तर त्यांना ती बिलकुल पसंत पडणार नाही.

मी : का बरे?

जितेन्द्र : पहिले कारण म्हणजे, माझ्याजवळ जे हस्तलिखित पुस्तक आहे, ते काही कोणा प्रथितयश लेखकाने अथवा प्रसिद्ध व्यक्तीने लिहिलेले नाही. दुसरे कारण असे की, या नव्या क्षेत्रात पाऊल टाकावयाचे म्हणजे आम्हाला थोडी आर्थिक जोखीमही पत्करावी लागेल आणि तिसरे कारण असे की, माझ्या नजरेसमोर आहेत तशा आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीची ओळख करून देणाऱ्या पुस्तकाबद्दल, माझ्या वडिलांना फारशी आस्था वाटणार नाही. म्हणून मी अजून त्यांच्याशी याविषयी काहीच बोललेलो नाही; पण केवळ त्यांच्या विरोधाला भिऊन, एक चांगले हस्तलिखित पुस्तक लेखकाला परत करून टाकून, एका नव्या क्षेत्रात पदार्पण करण्याची चालून आलेली संधी लाथाडावी, हे काही मला पटत नाही.

मी : असे आहे तर मग तू तुझ्या वडिलांना हे सर्व विचार सांगून का पहात नाहीस?

जितेन्द्र : तीच तर अडचण आहे. त्यांच्याशी मी हा विषय काढला की, ते मला धुडकावून लावतील किंवा माझ्या मनाला लागेल असे काही तरी बोलतील,

मी : ठीक आहे. प्रथम तू डोळे मिटून या आरामखुर्चीत स्वस्थपणे बस. आता तू तुझ्या मनःपटलावर असे चित्र रेखाटण्यास सुरुवात कर की, तू तुझ्या मनातील योजना तुझ्या वडिलांना सांगत आहेस, तुझे विचार एकल्याबरोबर तुझ्या वडिलांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्टपणे दिसू लागली आहे. अखेर ते तुला चिडून सांगत आहेत की• तुझ्या डोक्यातील योजना म्हणजे भिकेचे डोहाळे आहेत; पण तू धीर न सोडता तुझ्या वडिलांना, तुझी योजना अंमलात आणणे कसे व्यवहार्य आहे, ते समजावून सांगत आहेस. त्यांनी तुझ्या योजनेसंबंधी ज्या काही शंका बोलून दाखविल्या आहेत, त्या शंकांचे तू शांतपणे निरसन करीत आहेस. उदाहरणार्थ, ते म्हणतात की, तुझ्याजवळील हस्तलिखित पुस्तकाचे लेखक कोणाला माहीतसुद्धा नाहीत, त्यावर तू त्यांना असे समजावून सांगत आहेस की, त्या लेखकांनी लिहिलेले पुस्तक चांगले आहे आणि ते लेखक प्रसिद्ध आहेत की नाहीत हे पाहण्याऐवजी, त्यांनी लिहिलेले पुस्तक वाचून पाहणे अधिक योग्य होईल. थोडक्यात म्हणजे, तुझ्या वडिलांनी बोलून दाखविलेल्या सर्व अडचणींना तू समर्पक उत्तरे देत आहेस, असे चित्र तू तुझ्या मनःपटलावर तपशीलवारपणे रेखाटून काढ.

जितेन्द्र : (एकदम डोळे उघडून) तुम्ही सांगत होतात त्याप्रमाणे मी माझ्या मनःपटलावर प्रतिमा रेखाटण्याचा प्रयत्न करीत होतो; परंतु माझ्या मनात कोणता विचार आला ते मी तुम्हाला सांगू का?

मी : अवश्य सांग.

जितेन्द्र : माझ्या मनात असा विचार आला की, माझ्या वडिलांच्या सर्व शंकांना खरे म्हणजे एकच उत्तर देता येईल आणि ते उत्तर म्हणजे, त्यांच्याशी बोलताना, त्यांच्याहून मोठ्याने ओरडून, माझ्या हाताची मूठ टेबलावर दाणकन आपटून, त्यांना सांगणे की, कोणतीही गोष्ट त्यांना पटवून देण्याचा एकच मार्ग म्हणजे त्यांच्याहूनही मोठ्याने ओरडून आपले म्हणणे खरे करणे!

मी : ठीक आहे. मग तू तसे का करीत नाहीस?

जितेन्द्र : (आश्चर्यचकित होऊन) काय?

मी : तू तुझ्या मनःपटलावर असे चित्र रंगव की, तू तुझ्या वडिलांशी बोलताना एक वेळ अशी येते की, तू त्यांच्याहून मोठ्याने ओरडून, तुझ्या हाताची मूठ टेबलावर दाणकन आपटून, त्यांना सांगत आहेस की, त्यांना कोणतीही गोष्ट पटवून देण्याचा एकच मार्ग म्हणजे, त्यांच्याहून मोठ्याने ओरडून आपले म्हणणे खरे करणे!

जितेन्द्र : मी तसे करावे, असे खरोखरच तुम्हाला वाटते काय?

मी : अगदी खरोखरच मला तसे वाटते!

जितेन्द्र : (अडखळत अडखळत) पण... मला ते कसे जमणार? आजपर्यंत मी त्यांच्याशी कधीच अशा प्रकारे बोललेलो नाही.

मी : म्हणूनच तू तसे बोलत आहेस अशी प्रतिमा तू तुझ्या मनःपटलावर रेखाटण्याचा सराव कर.

जितेन्द्र : ठीक आहे. मी प्रयत्न करून पाहतो.

जितेन्द्रने माझा निरोप घेतला, तेव्हा त्याचा चेहरा काहीसा गोंधळलेला होता; पण मला त्यात काहीच आश्चर्य वाटलं नाही. मी त्याला त्याच्या मन.पटलावर जी प्रतिमा चित्रित करण्यास सांगि-

तली होती. ती प्रतिमा त्याच्या मृदू व शांत स्वभावाच्या चौकटीत बसत नव्हती व त्यामुळे तो थोडा गोंधळून गेला होता, यात काहीच नवल नव्हते.

सुमारे दोन महिन्यानंतर जितेन्द्रने मला असे सांगितले की, त्याच्या नव्या योजनेला त्याच्या वडिलांनी संमती दिली होती आणि त्यामुळे त्याचा आत्मविश्वासही शतपटीनी वाढला होता. हे सर्व कसे घडले ? असे जेव्हा मी त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला की, मी सांगितल्याप्रमाणे त्याने आपल्या मनःपटलावर प्रतिमा रेखाटण्याचे काम प्रामाणिकपणे केले होते. अर्थात, ते काम करणे प्रथम त्याला अवघड गेले होते तरीसुद्धा त्याने दोन आठवडे पुन्हापुन्हा प्रयत्न करून पाहिल्यावर. त्याच्या असे लक्षात आले होते की, ते काम काही अशक्य नव्हते. नतर एक दिवस त्याने आपल्या मनातील योजना जेव्हा त्याच्या वडिलाना बोलून दाखविली, तेव्हा अपेक्षेप्रमाणे त्याच्या वडिलांनी त्याला धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला. जितेन्द्रने प्रथम त्याच्या सर्व शकाना, शातपणे समर्पक उत्तरेही दिली. मात्र एक वेळ अशी आली की, त्याने आपल्या हाताची मूठ दाणकन टेबलावर आपटली व मोठ्याने ओरडून त्याना सांगितले की, कोणतीही गोष्ट त्याना पटवून देण्याचा एकच मार्ग म्हणजे त्यांच्याहून मोठ्याने ओरडून आपले म्हणणे खरे करणे !

जितेन्द्रने मला असेही सांगितले की, हे सर्व त्याने कसे केले याचे त्यालाही नंतर आश्चर्य वाटले; परंतु त्याच्या बोलण्याचा परिणाम असा झाला की, त्याच्या वडिलाच्या रागाचा पारा खाली आला आणि थोड्या वेळाने त्यांनी जितेन्द्रला त्याची योजना कार्यान्वित करण्यास समती तर दिलीच; पण नतर ते त्याला अधिक मानाने वागवू लागले किंबहुना त्या प्रसगानंतर त्या दोघामध्ये, एक नवे अकृत्रिम नाते निर्माण झाले.

घराच्या कामकाजासंबंधी जितेन्द्रच्या पुढे जी समस्या निर्माण झाली होती, तशाच प्रकारच्या अनेक समस्या सर्वसामान्य माणसाच्या नोकरी-व्यवसायातही निर्माण होत असतात. सर्वांच्या जीवनात नोकरी-व्यवसायाच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्याच्या मुळाशी, नेहमी काही त्याच्या वडिलाचा किंवा कोणा एखाद्या नात्यातील व्यक्तीचा स्वभाव नसतो उलट, दुसरी व्यक्ती अगदी परकी असते व तिच्याशी जुळवून घेणे एक प्रकारे अधिकच कठीण असते. अशा वेळी संवेदनाशील माणसाची कशी कुचबणा होते, याचे एक उदाहरण म्हणजे राधिका.

## राधिकातील बदल

दोन वर्षांपूर्वी राधिकाचे वडील सेवानिवृत्त झाले तेव्हा त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चागली नव्हती. सुदैवाने अगदी त्याच वेळी, राधिकाला एका खाजगी कंपनीत टायपिस्ट म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे तिला व तिच्या घरातील सर्वांनाच, केवढा मोठा आनंद झाला होता ! साहजिकच राधिका नोकरीवर रुजू झाली, तेव्हा ती अगदी खुषीत होती; परतु अवघ्या सहा महिन्यानंतर, तिच्या चेहऱ्यावरचा आनंद मावळला व ती नेहमी चिंताग्रस्त दिसू लागली

राधिकाच्या मन.स्थितीत हा बदल व्हावयास काही फार मोठे कारण घडले होते, असे नाही; परंतु नोकरी म्हटली की ज्या गोष्टी जवळजवळ अटळच असतात, त्यांच्याशी मुकाबला करणे तिला अतिशय कठीण जाऊ लागले. ती ज्या एका अधिकाऱ्याच्या हाताखाली टायपिस्ट म्हणून काम करीत असे, ते गृहस्थ फारच शिस्तप्रिय होते. राधिकाच्या हातून ज्या काही लहान-मोठ्या चुका होत असत, त्याबद्दल ते तिची चागलीच कानउघाडणी करीत असत. अशा वेळी राधिका एकदम अस्वस्थ होऊन जात असे व तिच्या हातून जास्तच चुका होत असत. शिवाय, ती रोज सकाळी कामावर जाण्यासाठी घराबाहेर पडली की, अगदी चिंताग्रस्त होऊन जात असे. कारण दिवसभरात आपले काम कसे होईल व आपले वरिष्ठ काय म्हणतील, याविषयी अनेक अप्रिय चित्रे तिच्या डोळ्यापुढे गर्दी करू लागत असत. या सर्वांचा परिणाम म्हणजे, कचेरीत पाऊल टाकल्यापासून ते कचेरीतून बाहेर पडेपर्यंत, ती तिच्या वरिष्ठाना भिऊन-भिऊन वागत असे.

तिने मला एकदा भेटावे, असे तिला तिच्या वडिलानी सुचविले होते. म्हणून एक दिवस ती मला भेटावयास आली. तेव्हा तिच्या मनातील अवास्तव भीती नष्ट करण्यासाठी मी तिला खालील सूचना दिल्या.

'राधिका, तू प्रथम डोळे मिटून स्वस्थपणे या आरामखुर्चीत बस आणि आता मी सागतो त्याप्रमाणे काही प्रतिमा तुझ्या मनःपटलावर रेखाटण्याचा प्रयत्न कर.

सकाळचे ११ वाजले आहेत. तुझ्या वरिष्ठानी तुला त्यांच्या केबिनमध्ये बोलविले आहे. तू त्यांच्या केबिनमध्ये गेल्याबरोबर, त्यानी तू टाइप केलेले काही कागद तुझ्यापुढे धरून, त्यातील एक एक चूक तुझ्या निदर्शनास आणून देण्यास सुरुवात केली आहे. हळूहळू त्यांच्या रागाचा पारा चढत जात आहे. बोलता बोलता त्याचा राग अनावर होऊन ते तुला असे म्हणतात की, तुला टायपिंग म्हणजे काय तेच कळत नाही व त्यांच्या मते तुला टायपिस्ट म्हणून नोकरीवर घेण्यात, कंपनीने भयंकर मोठी चूक केली आहे. आता ते तुझ्या भिकार कामाबद्दल त्यांच्या वरिष्ठांकडे एक सविस्तर अहवाल देणार आहेत. त्या अहवालाच्या शेवटी ते अशी शिफारस करणार आहेत की, तुला नोकरीवरून ताबडतोब हाकलून द्यावे. त्याचे असे ठाम मत आहे की, तुला नोकरीवरून तर काढून टाकले पाहिजेच पण शिवाय कंपनीने तुला असे सर्टिफिकिट दिले पाहिजे की ज्यामुळे जगात तुला कधी कोणी नोकरी देता कामा नये. कारण कोणतीही नोकरी करण्यास तू अपात्र आहेस. त्यांच्या मनातील ही कल्पना तडीस नेण्यासाठी काय वाटेल ते करावे लागले तरी ते करण्याची त्याची तयारी आहे. तशीच वेळ आली तर तुला धडा शिकविण्यासाठी ते स्वतः राजीनामा देण्यासही तयार आहेत !

एकूण प्रसग बाका आहे ! परंतु तुला वाईट वाटत असले तरी, तू नाउमेद झालेली नाहीस. तू आल्या प्रसंगाला, मन विचलित होऊ न देता तोंड देत आहेस आणि जर ही नोकरी गेलीच तर, तू जिद्द न सोडता नवी नोकरी शोधण्याचे ठरविले आहेस इतकेच काय, पण तुला कोणतीही नोकरी मिळाली नाही तर, तू तुझ्या टायपिंग करण्याच्या कौशल्याचा उपयोग करून, स्वतत्रपणे अर्थार्जन करण्याचे योजिले आहेस...'

मी वरील सूचना देत असताना डोळे उघडून राधिका हसत हसत मला म्हणाली की, मी तिला तिच्या मनःपटलावर जी चित्रे रेखाटण्यास सागत होतो, त्या चित्राप्रमाणे तिचे वरिष्ठ अधिकारी वागतील, अशी शक्यता जवळजवळ अजिबातच नव्हती. मी तिचे म्हणणे मान्य केले; परंतु तिला असेही विचारले की, जर समजा तिच्या वरिष्ठानी मी सूचित केलेला बेत खरोखरच तडीस नेला तर ती काय करणार होती ? त्यावर राधिका म्हणाली की, तशीच वेळ आली तर ती दुसरी नोकरी मिळविण्याच्या खटपटीला लागेल अथवा टायपिंगची कामे करून स्वतंत्रपणे अर्थार्जन करण्याचा मार्गही स्वीकारील, परंतु बहुधा तसे करण्याची वेळ येण्याचे कारण नव्हते. कारण या जगात तिला कधी कोणी नोकरी देणार नाही अथवा कोणतीही नोकरी करण्यास ती अपात्र होती वगैरे म्हणण्यात काही तथ्य नव्हते.

माझे काम झाले होते. राधिका माझा निरोप घेऊन निघून गेली. त्यानंतर चार महिन्यानी ती एक दिवस मला सहज भेटावयास आली व म्हणाली की, मी तिला तिच्या मनःपटलावर ज्या प्रतिमा रेखाटण्यास शिकविल्या होत्या, त्या प्रतिमांच्या तुलनेने, तिच्या

वरिष्ठ अधिकाऱ्याचे प्रत्यक्ष वागणं फारच सौम्य व समजूतदारपणाचे होते, असे तिला वाटू लागले होते. म्हणून तिच्या मनातील सर्व अवास्तव भीती नष्ट झाली होती व ती तिच्या कचेरीमध्ये अधिक मोकळ्या मनाने काम करू लागली होती. शिवाय, तिने मला असेही बोलून दाखविले की, मला भेटावयास येण्यापूर्वी, तिच्या मनात दुसरी नोकरी शोधण्याचा विचार वारंवार येत असे. कारण तिच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या टीकेला ती कंटाळली होती आता मात्र तिने तो विचार सोडून दिला होता, कारण तिला असे वाटू लागले होते की, दुसऱ्या नोकरीत असेच कोणी वरिष्ठ अधिकारी नसतील, याची काही खात्री नव्हती. उलट, तिला असे समजून चुकले होते की, तिच्या कंपनीचा व्यापार वाढत असल्यामुळे तिने त्याच कंपनीत राहणं तिच्या हिताचे होते. सारांश, खरोखरच दुसरी एखादी खूपच चांगली नोकरी मिळत असल्याशिवाय, हाती ती नोकरी सोडण्याचा विचार करण्यात काही अर्थ नव्हता.

राधिकाच्या मनातील भीती नष्ट करून, तिला स्वहिताचे रक्षण करण्यास शिकविताना मी वापरलेल्या पद्धतीची उभारणी एका तत्त्वावर केलेली आहे. ते तत्त्व असे की, माणस आपल्या मन:पटलावर, कोणत्याही संभाव्य संकटाबद्दल वाइटातील वाईट परिणाम रेखाटून, त्या परिणामांनाही आपण धैर्याने तोंड देत आहोत असे चित्र रंगवील, तर त्याच्या मनातील भीती हळूहळू नष्ट होत जाते. तसेच, आपल्या मन:पटलावरील प्रतिमांच्या तुलनेने, त्याला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्यक्ष घटना फारच कमी भयावह वाटू लागतात व त्यामुळे तो त्या घटनांना अधिक आत्मविश्वासाने सामोरा जातो.

या प्रकरणात माणसाला इतर माणसांबरोबर व्यवहार करताना जे प्रश्न भेडसावू शकतात त्यांच्याशी मन:चक्षूंच्या सामर्थ्याचा उपयोग करून मुकाबला कसा करावा व आपल्या स्वहिताचे रक्षण कसे करावे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात प्रत्येक माणसापुढील प्रश्नाचे स्वरूप वेगळे असते तरीसुद्धा, या प्रकरणातील पद्धतीचा तारतम्याने उपयोग करून तुम्हालाही, इतर माणसांबरोबर राहताना व काम करताना निर्माण होणाऱ्या समस्या, स्वहिताचे रक्षण करून हाताळण्यात अवश्य यश मिळेल. (क्रमशः) □

# नाट्यपंढरी

## □ कौतुक खुद्द गडकऱ्यांकडून !

माणूस सुखाचे क्षण, मनाच्या सादीत अगदी जिवाभावाने जपून ठेवतो. दु:खाचे विसरायचे म्हटले तरी विसरता येत नाहीत. ते जिव्हारीच बसलेले असतात. दु:खाची लक्तरे दडवून, सुखाची शालजोडी मिरविण्याची किमया माणसाला साधली आहे, म्हणूनच तो हसतो. नाही तर जन्मभर रडतच राहिला असता ! कलावंतांच्या जीवनात तर असे अनेक प्रसंग येतात. कारण त्यांचे भावविश्व मोठे हळवे असते.

नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी असे अनेक हळुवार क्षण, आपल्या 'बहुरूपी' त अचूक टिपले आहेत. अखेर गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' किर्लोस्कर संगीत मंडळीकडेच आले, म्हणून चिंतामणरावांना खूप आनंद झाला. नाटक बसविण्याची जबाबदारी त्यांच्याकडेच आली; पण भूमिका वाटताना मात्र खुल्या दिलाने 'वृंदावन' त्यांच्या वाटणीला येईना 'किर्लोस्कर' ही संगीत मंडळी ना, मग प्रमुख भूमिका गायक नटानीच करायला हव्यात चिंतामणराव गद्य नट ! नटवर्य कृष्णराव गोरे यानी ती भूमिका करावी, असाही एक सूर होता. ते उत्तम गायक नट होते; पण त्यांचे वय नि शरीरयष्टी वृंदावनाच्या भूमिकेला साजेशी नाही, असे खुद्द गडकऱ्यांचे मत होते. शिवाय त्यांना दम्याचाही विकार होता. 'माझे मनोगत वाणीने नि अभिनयाने समर्थपणे व्यक्त करणारा नट हवा, तरच मी नाटक देईन ! असा नाटककाराचाच हट्ट असल्याने नि त्यानीच चिंतामणरावांचे नाव सांगितल्याने, ती भूमिका त्यांच्या वाटणीला आली.

चिंतामणरावानी नाटक बसविण्यासाठी अपार कष्ट केले पुण्यप्रभाव खूप गाजले. त्यांची वृंदावनाची भूमिका उत्तम झाली. तरीही कौतुक झाले ते गायक कलाकाराचे ! त्यांचे सत्कार झाले. त्यांच्या छातीवर सुवर्णपदके लटकली; पण पुण्यप्रभावच्या यशात सिंहाचा वाटा असूनही आपले कोल्हटकर उपेक्षित राहिले, हे गडकऱ्याना खटकले. संगीत नाटक मंडळीत गद्यनटाविषयी असलेला सापत्नभाव त्यांना जाणवला. त्यांनी शंकरराव मुजुमदारांची (मालक) परवानगी घेऊन चिंतामणरावांचा सत्कार केला. मुंबईत पुण्यप्रभावाच्या प्रयोगाच्या वेळी, त्यावेळचे मुंबईचे पोलीसकमिशनर एडवर्डस् यांच्या हस्ते चिंतामणरावांना सोन्याचे घड्याळ दिले. गडकऱ्यांच्या रोजनिशीत त्याची नोंद आहेच.

(Presented a watch (Rs. 40) to Kolhatkar through Mr. Vincent, The Police Suptd of Bombay)

पण चिंतामणराव नम्रपणे नमूद करतात, 'पुण्यप्रभाव' च्या प्रयोगाचे वेळी हातातील एक सोन्याचे घड्याळ देऊन माझा सत्कार केला. पुढील आयुष्यात माझे लहान–मोठे अनेक सत्कार झाले; पण गडकऱ्यांसारख्या नाटककाराने स्वत:च्या खर्चाने माझा केलेला रंगभूमीवरील सत्कार, म्हणजे माझ्याकडून रंगभूमीची सेवा घडत होती, तिचे अधिकारी माणसाकडून झालेले कौतुक! जे मला पुढील आयुष्यात मार्गदर्शक, प्रोत्साहनपर असेच झाले.'

गडकऱ्यांची समृद्ध शब्दकळा वाणीवर चढविण्याचे भाग्य लाभलेले अनेक नट होते नि आजही आहेत; पण त्यांच्या पाच नाटकांचे पंचायतन प्रमुख भूमिकात पूजण्याचे भाग्य चिंतामणरावाना लाभले. (वृंदावन, घन:श्याम, साबाजी या तर त्यांच्या ओरिजनल भूमिका. मग सुधाकर नि कमलाकर साकार केले)

नानासाहेब फाटक, परशुरामपंत सामंत, श्री. जोगळेकर, मा. दत्ताराम, जयराम शिलेदार, गोपाळ बकरे अशा काही गुणवंतांनाही गडकऱ्यांच्या सर्व नाटकात प्रमुख भूमिकात उभे राहण्याचे भाग्य लाभले असण्याची शक्यता आहे. असे आणखीही काही थोर कलाकार असतील; पण मला आवर्जून आठवण येते, ती श्री. बसंतराव शिंदे नि मा. नरेश याची. वसंत शिंदे यांनी गोकुळ, कामण्णा, तळीराम, नूपूर नि जिवाजी हे गडकऱ्यांचे सर्व विनोदवीर आपल्या अभिनयचातुर्याने गाजविले आहेत. मा. नरेश तर असा भाग्यवान की गडकऱ्यांच्या पाचही नायिका (लीला, लतिका, कालिंदी नि वसुंधरा, शिवांगी, सिंधू) आपल्या अभिजात अभिनयाने संपन्न करण्याचे सौभाग्य त्याला लाभले. काही भूमिकात तर तो पूर्वसूरीच्या एक पाऊल पुढे गेला असे म्हटले तरी चालेल. गडकऱ्यांच्या नाटकाची पुण्याई पदरी असणारे कलावंत खरंच भाग्यवान !



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28



" ' शिकागो विमानतळावर आपण सव्वाचारऐवजी पावणेपाच वाजता उतरणार आहोत. आताच समजल्याप्रमाणे शिकागोच्या परिसरात अचानक बर्फ-वादळ आले आहे. त्यामुळे कदाचित् आणखीही उशीर होईल.... '
विमानाच्या कप्तानाची घोषणा ऐकली. अमेरिकेत उतरणे आता केवळ तासाभरावर आले असे लक्षात आले आणि बराच काळ मनात टोचणारे प्रश्न पुन्हा एकदा तीव्रतेने टोचू लागले....
मी जात आहे तो देश माझ्या देशाचा हितचिंतक मित्र आहे की नाही ? माझ्या देशाच्या दुष्काळप्रसंगी या देशाने कोटी कोटी टन धान्य धडाक्याने दिले आहे. बासष्ट साली, चिनी आक्रमणाचे वेळी, या देशाने माझ्या देशाला अति त्वरेने हवाई संरक्षण दिले आहे. पण हाच देश गेली पस्तीस वर्षे सतत पाकिस्तानच्या बाजूने झुकलेला आहे. खलिस्तानबाबत याची सहानुभूती लपून राहिलेली नाही. किंबहुना माझ्या देशाबद्दल या देशाच्या मनात एक प्रकारचा राग आहे, तो वेळोवेळी धुमसतो-प्रकट होतो.
हे असे का ?
हा देश प्रगत आहे, समृद्ध आहे, सुविधांचे शिखर जणू या देशाने गाठले आहे. आणि तरी याच देशात प्रचंड, निर्ढावलेली, तज्ञ अशी गुन्हेगारी आहे या देशात लोकशाहीचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे मोठेच महत्त्व आहे आणि तरीही, परदेशातील हुकूमशाही राजवटीच या देशाला विशेष आवडतात. येथील लोक खूप सुखात लोळताना दिसतात. पण शांत, निवांत समाधान त्यांना मिळाले आहे असे दिसत नाही. हे काय प्रकरण आहे ?...."

हे ' प्रकरण ' समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत...

**प्रा. स. शि. भावे**

अतिथी प्राध्यापक म्हणून नुकतेच भावे अमेरिकेत काही काळ राहून आले.
त्यांची नवी लेखमाला....

**माणूस, पुढील अंकापासून**

# ' अमेरिका ' नावाचे प्रकरण